म. ग्रं. सं. ठाणे
विषय ग्र-गो
सं. क. ५५५

REFBK-0020111



# आपला भारत ११

ग्रहालय, ठाणे.



REFBK-0020111

१

## भिन्नतेत या अभिन्न

भिन्नतेत या अभिन्न आज गाऊ आरती
लक्ष हस्त, लक्ष पाद, हृदय एक भारती ।
भिन्न वेष, भिन्न भाष, भिन्न धर्मरीती
भिन्न जात, भिन्न पंथ, तरीही एक संस्कृती ॥ १ ॥
भिन्न रंग, भिन्न ढंग, भिन्न भाव आकृती
भिन्न छंद, भिन्न बंध, आगळी कलाकृती ।
भिन्न वाणी, भिन्न गाणी, अर्थ एक वाहती
भिन्न शौर्य, भिन्न धैर्य, घोष एक गर्जती ॥ २ ॥
भिन्न भवन, भिन्न हवन भिन्न क्षेत्र मानिती
लहर लहर भिन्न तरी, एक गगन-माती ।
भिन्न तार, ताल तरी, एक मधुर झंकृती
कमलपुष्प हासते पाकळ्यांतुनी किती ॥ ३ ॥

राजा मंगळवेढेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम 20999
क्रमांक 5555
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
20999
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# करुनाडु कर्नाटक

राजा
मंगळवेढेकर

नितीन प्रकाशन
पुणे

## अनुक्रम :


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| कन्नड माता | ... | ५ | साक्षी - इतिहास | ... | १४ |
| लोक आणि लोकाचार | ... | ३१ | भाषा आणि साहित्य | ... | ४१ |
| कलाप्रिय कर्नाटक | ... | ५६ | स्थळयात्रा | ... | ६७ |
| विकासोन्मुख कर्नाटक | ... | ७८ | कन्नड लोकसाहित्य | ... | ८२ |
| संभाषण | ... | ८९ | कर्नाटक-गीत | ... | ९१ |



प्रकाशक

सौ. शुभा वसंत गोगटे

नितीन प्रकाशन

११८२ सदाशिव पेठ

पुणे - ३०

प्रथमावृत्ती

१७ जून १९७४



© राजा मंगळवेढेकर



किंमत

पांच रुपये

मुद्रक

शशिकान्त महादेव देव

सुलभ मुद्रणालय

२९१ शनिवार पेठ

पुणे - ३०

# कन्नड माता

ताये बार मोगव तोर कन्नडिगर मातेये
हरसु ताये सुतर काये नम्म जन्मदातेये ॥
नम्म तप्पनेनितो ताळ्वे
अक्करे थिंदेम्मनाळ्वे
नीनें कणा नम्म बाळ्वे
निन्न मरेयलम्मेवु
तनु कन्नड मन कन्नड नुडि कन्नडवम्मवु ॥

—माते ! हे कन्नड माते ! ये, आणि दर्शन दे !
माते, आशीर्वाद दे, तुझ्या लेकराचा सांभाळ कर, हे जन्मदात्री माते !
माते, तूच जन्मदात्री आहेस. वात्सल्यमयी आहेस. आमचे जीवनच तू आहेस. आम्ही तुला विस्मरणार नाही.
आमचे तन कन्नड आहे, मन कन्नड आहे, वाणी कन्नड आहे !

कन्नडिगाची अशी ही प्रिय व आदरणीय भूमी भारताच्या दक्षिण प्रांती आहे. भारतीय संस्कृतीचेच एक विलोभनीय रूप कर्नाटक संस्कृती नावाने प्रकट झालेले आहे. कर्नाटक संस्कृतीमध्ये जसे भारतीय रूप सामावलेले आहे, तसेच भारतीय संस्कृतीमध्ये कन्नड संस्कृतीचे प्रतिबिंब उमटलेले आहे. एकमेकाना पूरक अशीच त्याची देवाण-घेवाण आहे. भारतीय संस्कृती म्हणजे एक सुंदर विशाल, रमणीय असे नंदनवन आहे; त्यातील कन्नड-संस्कृती हे एक समृद्ध उपवन आहे !

या उपवनातील विविध शाखा शाखामधून कन्नड-संस्कृती बहरलेली आहे. कन्नड भाषेतील प्राचीन ग्रंथ, प्रचलित धर्म-पंथ, ज्ञान-विज्ञान, मंदिरे, वास्तु, शिल्प, शिलालेख, व विविध ललितकला, लोकजीवन, रीतिरिवाज, सण-समारंभ—अनेका-

नेक अंगानी कन्नड संस्कृती आपली वडीलकी सांगत आहे.

'तनु कन्नड मन कन्नड नुडि कन्नडवे म्मवु' असा सार्थ अभिमान गात असताना देखील 'बी. एम्. श्री' सारखे कन्नड आचार्य, कविवर्य आपले भारतीयत्व विस्मरत नाहीत. भारताची एकता आणि त्याची विराटशक्ती यावर त्याची अढळ निष्ठा होती. ते आपल्या एका काव्यात म्हणतात—

> ओंदे जनवागिहेवु-ओलि
> दोंदे भारव होरुवेवु ।
> निन्न हिंदिन भाग्यवेल्लव मरळि साधिसी मेरेवेवु ।
> निन्न धर्मामृतव शोधिसि बरडु लोकक्कॅरेवेवु ॥

—आम्ही एक राष्ट्र आहोत. आम्ही सर्व मिळून राष्ट्राचा भार उचलू. हे भारत माते, आम्ही आमच्या कठोर साधनेद्वारा तुझे प्राचीन वैभव तुला पुनरपि प्राप्त करून देऊ. तुझे धर्मरूपी अमृत या तहानलेल्या दुनियेला पाजू!

सांस्कृतिक व राजकीय दृष्टीनेही कर्नाटकच्या भूमीला प्राचीन इतिहास आहे.

सिंधूच्या खोऱ्यातील संस्कृतीशी कर्नाटक-संस्कृतीचा कशा प्रकारचा संबंध होता याची निश्चित माहिती जरी उपलब्ध नसली तरी येथील चित्रदुर्ग जिल्ह्यातील चन्द्रवल्लि नामक गावी सापडलेल्या प्राचीन अवशेषाच्या आधारे त्याचे मोहोंजोदडो व हडप्पा येथील अवशेषाशी साम्य असल्यामुळे दोहोत संपर्क, संबंध असावा असे तज्ज्ञाचे अनुमान आहे. फादर हेरास या विद्वानाचे तर असे मत आहे की, मोहोंजोदडो येथील एका शिलालेखात 'डोळ्याचे' जे चिन्ह आहे ते 'कन्नड जाती'चे प्रतीक आहे. 'खन' म्हणजे डोळा किंवा पाहणे कन्नन वरून कन्ननीर व पुढे कन्नडिग झाले असावे.

'कर्नाट' किंवा कर्नाटक असेही या भूमीला संबोधले जाई. कर्नाट किंवा कर्नाटक या भूमीचा प्रथम उल्लेख महाभारतामध्ये मिळतो. महाभारताच्या सभापर्वात 'कर्नाट' हा शब्द या प्रदेशातील राजाच्यासाठी वापरलेला आहे—

> कर्नाटा. कास्यकुट्टाश्च पद्मजाला. सतीनरा: ।

भीष्मपर्वातही 'कर्नाटक'चा उल्लेख आढळतो. त्यानुसार द्रविड, केरळ याप्रमाणेच कर्नाटक हा दक्षिण भारतातील एक प्रदेश आहे—

अथापरे जनपदा. दक्षिणा भरतर्षभ ।
द्रविडा: केरला: प्राच्या मूषिका वनवासिका: ॥
कर्णाटका महिषका विकल्पा मूषकस्तथा ।
झिल्लिका: कुंतलाश्चैव सौहृदा नभकानना: ॥

प्राचीनकाळी ' कर्नाटक ' व ' कुंतल ' हे शब्द बहुधा दक्षिण कर्नाटक व उत्तर कर्नाटक या प्रदेशासाठी वापरीत असावेत.

वरील श्लोकात वनवासिका, महिषका व कुंतल अशी नावे आहेत; ती क्रमश: वनवासी, म्हैसूर व उत्तर कर्नाटक या भागासाठी योजलेली आहेत. हे तिन्ही प्रदेश कन्नड भाषी प्रांतात आहेत.

पांडवांपैकी नकुल याने कर्नाटकातील पाच राज्ये जिंकली होती असाही उल्लेख महाभारतामध्ये आहे.



अजस्र नंदी – म्हैसूर

रामायण व महाभारत ही प्रसिद्ध भारतीय महाकाव्ये आहेत. महाभारता-

मध्ये 'कर्नाटक'चा उल्लेख जसा आढळतो, तसा रामायणामध्ये स्पष्ट रीतीने आढळत नाही. परंतु दक्षिणेतील अनेक ठिकाणाचे वर्णन आढळते—ऋषिका, माहिषिका, आंध्र, पुंड्र, चोळ, पाण्ड्य, केरल इत्यादी. अशोकाच्या शिलालेखातही 'ऋषिका'-चा उल्लेख आहे. हा कर्नाटकातीलच एक भाग आहे. 'माहिष्किा' हे प्राचीन नाव म्हैसूरचे असावे. रामायणात 'वैजयंतिका' हे नाव आहे. ते बहुधा वनवासी प्रदेशासाठी असावे.

'कर्नाटक' हे नाव रामायणात आढळत नाही याचे एक कारण असे सांगतात की, रामायणकाली गोदावरी व कावेरी या नद्याच्यामधील भूभागात विशेष लोकवस्ती नव्हती. तिथे घनदाट अरण्य होते, 'दंडकारण्य' म्हणून ते प्रसिद्ध होते.

प्राचीन कर्नाटकचा विस्तारही आजच्याहून वेगळा होता. नृपतुंग नावाच्या राष्ट्रकूट राजाने आपल्या 'कविराजमार्ग' नामक ग्रंथात म्हटले आहे—

> कावेरियिंदमागो
> दावरि वरमिर्दं नाडदा कन्नदोळ् ।
> भाविसिद जनपदं वसु
> धावलय विलीन विषय विशेषम् ॥

—कावेरी ते गोदावरीपर्यंत पसरलेला भूभाग म्हणजे 'कन्नड' होय. वसुधेच्या समस्त वैशिष्ट्यांनी युक्त असे हे जनपद विलसत आहे. याचा अर्थ, नृपतुंग राजाच्या कारकीर्दीत कावेरीपासून गोदावरीपर्यंत कर्नाटक प्रदेश विस्तारलेला होता. महाराष्ट्र व आंध्र अशा दोन राज्यांत नंतरच्या काळात गोदावरीचा दक्षिण भाग विभागला गेला. आजच्या महाराष्ट्रातील व आंध्रातील बराच प्रदेश तत्कालीन कन्नड राजवटीखाली होता. सातव्या शतकात पैठणच्या आसपासचा प्रदेश कन्नड भाषी प्रदेशात होता व पैठण हे कन्नडभाषी केन्द्र होते असा उल्लेख पद्योतनसूरी नामक एका जैन कवीने आपल्या 'कुवलयमाला' नामक काव्यात केलेला आहे. तसेच कन्नडचा महाकवी पंप याने आंध्र– तत्कालीन वैगिमंडल हे कन्नड भाषेचे व साहित्याचे मोठे केन्द्र होते असा उल्लेख केलेला आहे.

कर्नाटकला 'कन्नड' हे दुसरे नाव आहे. कन्नड हा शब्द 'करू' 'नाडु' अशा दोन शब्दांवरून बनलेला आहे. 'करू' म्हणजे मोठा किंवा उंच व 'नाडु' म्हणजे प्रदेश, करूनाडु– कन्नाडु– कन्नड असा शब्द तयार झाला.

'कन्नडदवेले' या आपल्या ग्रंथात श्री. शं. बा. जोशी यानी कन्नड भाषा बोलणाऱ्या लोकाचे अस्तित्व वैदिक काळापासून असल्याचे सागितले आहे. त्यांच्या मतानुसार मूळ 'कन्नाड' शब्दाचेच कालांतराने 'कन्नड' हे रूप बनले. कण् + नाडु यावरून कन्नडु. 'कण्' ही आर्यपूर्व द्रविडांची एक जमात होती. म्हणून 'कण्' जातीच्या लोकाचा देश– देश– नाडु, तो कन्नड. याचेच संस्कृत रूपातर 'कर्नाटक' असे झाले.

प्राचीन तमिळ ग्रंथामधून 'करूनाडर', 'करूनडर', व 'करुनाडगन' इत्यादी नावेही आढळतात. परंतु तमिळ बृहतकोशात 'कन्नड' असा देशवाचक शब्द आहे. कन्नड शब्द देशवाचक तसा जातिवाचकही उपयोगात आणला जातो. कन्नड लोक बोलतात ती भाषाही 'कन्नड' म्हणूनच ओळखली जाते. मराठीत याचेच रूपातर 'कानडी' असे झाले आहे. भाषाभेदामुळे होणारी गंमत संत तुकारामानी आपल्या एका अभंगाच्या चरणात अशी वर्णन केलेली आहे—

**कानडीने केला मऱ्हाटा भ्रतार ।**
**एकाचे उत्तर एका न ये ॥**

संत ज्ञानदेवानी तर विठ्ठलाला—

**'कानडा ही विठ्ठलु करनाटकु'**

म्हणूनच संबोधिले आहे.

आज अस्तित्वात असलेले 'कर्नाटक राज्य' १ नोव्हेंबर १९५६ रोजी भाषावार प्रांत पुनर्रचनेच्या वेळी साकार झालेले आहे. त्या वेळी याचे नाव 'म्हैसूर राज्य' असेच होते. परंतु लोकसभेच्या मान्यतेनुसार १ नोव्हेंबर १९७३ पासून पुनरपि कन्नड भूमी 'कर्नाटक' या नावाने संबोधिली जाऊ लागली. भाषावार प्रांतरचनेच्या पूर्वी इंग्रजी अमलापासून कर्नाटकाचे भिन्न भिन्न भाग शेजारच्या भिन्न भिन्न प्रदेशात विखुरलेले होते. म्हैसूर हे संस्थानच होते, बेळगावकडील भाग मुंबई इलाख्यात होता. गुल्बर्गाकडील भाग निजामच्या राज्यात होता. कानडा आणि बल्लारी हे जिल्हे मद्रास इलाख्यात होते. १ नोव्हेंबर १९५६ रोजी हे विखुरलेले कन्नडभाषी प्रदेश प्रथम एकत्र आले.

आजच्या कर्नाटक राज्याच्या चतुःसीमा पुढीलप्रमाणे आहेत. उत्तरेला महाराष्ट्र तर दक्षिणेला केरळ व मद्रास याची सोबत आहे. पूर्वेला आंध्राचा शेजार

आहे तर पश्चिमेला गोव्याचे सान्निध्य आणि दोनशे मैल लांबीचा समुद्रकिनारा लाभलेला आहे.

लांबी-रुंदीचा विचार केला तर कर्नाटक हे भारतीय संघ राज्यातील सहाव्या क्रमांकाचे मोठे राज्य आहे. याचे क्षेत्रफळ १,९१,७५७ किलो मीटर आहे.

कर्नाटक राज्याची लोकसंख्या २,९२,६३,३३४ इतकी आहे.

राज्यकारभाराच्या सोयीसाठी राज्याचे चार विभाग पाडलेले आहेत. राज्यात एकूण २३१ शहरे व २६,३७७ खेडी आहेत.

१ लाख किंवा त्याहून अधिक लोकवस्ती असलेली मोठी शहरे राज्यात ११ आहेत.

बंगलोर हे कर्नाटक राज्याच्या राजधानीचे शहर असून या शहराची वस्ती १६,४८,२३२ आहे. हुबळी–धारवाड ३,७९,५५५, म्हैसूर– ३,५५,६३६, मंगलोर २,१४,०९३, बेळगाव २,१३,८३०, गुलबर्गा १,४५,६३०, बेळ्ळारी १,२५,१२७, दावणगिरी १,२१,०१८, विजापूर १,०३,३०८, शिमोगा १,०२,७०२, व भद्रावती १,०१,३१५ अशी ही मोठी शहरे आहेत.

कर्नाटक राज्यातील साक्षरतेचे प्रमाण ३१.५४ टक्के आहे.

या राज्यात विविध जाती धर्मांचे लोक राहातात. त्यांत हिंदू बहुसंख्य आहेत. त्यांची एकूण संख्या २,०५,८२,८५३ आहे, आणि त्याखालोखाल मुस्लिम २३,२८, ३७६; ख्रिश्चन ४,८७,५८७, जैन १,७४,३६६ व बौद्ध ९,७७० अशी लोकवस्ती आहे. भौगोलिक दृष्टीने ( १ ) खालाटी किंवा समुद्र-किनारपट्टीचा प्रदेश, ( २ ) घाट किंवा मलेनाडु, ( ३ ) दक्षिण मैदानी प्रदेश, व ( ४ ) उत्तर मैदानी प्रदेश असे साधारणपणे चार स्वाभाविक विभाग पडतात.

समुद्र-किनारपट्टीची लांबी २०० मैलांची असून हा घाटाखालचा प्रदेश आहे. सह्याद्रीचे अनेक फाटे या प्रदेशात घुसलेले असून त्यामुळे हा भाग जंगलमय बनलेला आहे. सह्याद्रीतून उगम पावलेल्या काळी, गंगावळी, तदडी, शरावती ह्या नद्या या प्रदेशातून वाहातात. कारवार, कुमठा, होनावर, अंकोले, भटकळ ही बंदरे या नद्यांच्या समुद्र-मुखावरच आहेत. भात, सुपारी व नारळ हे या भागातील मुख्य पीक आहे. समुद्र-सान्निध्यामुळे मच्छिमारीचा व नौका बांधणीचा व्यवसायही जोरात चालतो.

या भागात सरासरी २,५०० मिलिमिटर पाऊस दरवर्षी खात्रीने पडतो. निसर्ग सौंदर्याने नटलेला रमणीय असा हा भाग आहे.

' मलेनाडु ' म्हणजे पर्वतीय-डोंगराळ प्रदेश. सह्याद्रीच्या डोंगराची उंची सर्वत्र समान नाही. उत्तरेस ती दोन ते तीन हजार फूट उंच आहे, तर दक्षिणेस ती सहा हजार फुटाच्याही वर उच्च आहे. या भागातील डोंगरावरून मलप्रभा, घटप्रभा, तुंगभद्रा, कावेरी, पेन्नार या नद्या उगम पावलेल्या आहेत आणि त्या पूर्ववाहिनी आहेत. या भागात जंगल पुष्कळ असून त्यात सागवान, शिसवी, चंदन इत्यादी वृक्षाची रेलचेल आहे. कापूस, हळद, मिरची व तंबाखू ही पिके इथे विशेष प्रमाणावर होतात. भात व कॉफी, नारळ व सुपारी याचे उत्पन्नही बरेच होते. वृक्षाच्छादित पर्वत, पाण्याचे धबधबे, खोल दऱ्याखोरी यामुळे हा भाग सुंदर आहे.

दक्षिण मैदानी प्रदेश असंख्य अशा विविध दऱ्याखोऱ्यांनी विभागलेला आहे. पावसाचे प्रमाण पश्चिमेकडून पूर्वेकडे कमी कमी होत जाते. या भागात वार्षिक सरासरी २० ते ३० इंच पाऊस पडतो. कर्नाटकातील ' तळ्याचा प्रदेश ' म्हणून हा भाग प्रसिद्ध आहे. या भागात बरेच जलाशय आहेत. येथील मुख्य पीक भात व रागी असले, तरी खोऱ्यातून नारळी-पोफळीचे उत्पन्नही होते.

उत्तर मैदानी प्रदेश हा मलेनाडूच्या पूर्वेला राज्याच्या दक्षिणोत्तर असा पसरलेला आहे. कृष्णा नदीच्या काठावरच्या ह्या प्रदेशात रायचूर, बागलकोट, विजापूर, गुलबर्गा, बिदर हा भाग येतो. येथे सुपीक काळी जमीन असून ज्वारी, गहू व कापूस ही मुख्य पिके होतात. पावसाचे प्रमाण कमी आहे.

कर्नाटकची भूमी खनिज उत्पन्नाच्या दृष्टीने खूपच श्रीमंत असून अक्षरशः सुवर्णभूमी आहे. कोलार येथील सुवर्णाच्या खाणीतून भारतात मिळणाऱ्या सुवर्णाच्या ऐंशी-टक्के सुवर्ण मिळते ! म्हणून या भूमीला ' चिन्नदनाडु '— म्हणजे स्वर्ण-देश असे म्हणतात. लोह, मॅंगेनीज, क्रोमाईट, अभ्रक इत्यादींचे वैपुल्य आहे.

कर्नाटक राज्यातील जंगल-विभाग हा एकूण क्षेत्रफळाच्या मानाने लहान —१२ टक्के आहे. परंतु उत्पन्नाच्या दृष्टीने फारच समृद्ध आहे. भारतातील जंगल-संपत्तीच्या उत्पादनाचे प्रमाण चौरस किलोमीटर मागे सरासरी ७२० रुपये आहे. पण तेच कर्नाटकमध्ये २,८०० रुपये आहे.

सुवर्णाप्रमाणेच चंदनाची देखील ही भूमी आहे.

कृष्णा आणि कावेरी या दोन मुख्य नद्यांनी व त्याच्या अनेक उपनद्यांनी

कर्नाटकच्या भूमीची तहान भागवलेली आहे. काळी नदी, शरावती, नेत्रावती, तुंगभद्रा इत्यादी नद्यांवरील प्रकल्पही सिद्ध होत आहेत.

जमीन, हवामान, पिकाची विविधता या बाबतीत कर्नाटकाची अपूर्वाई प्रसिद्ध आहे.

विविध तऱ्हेचे पक्षी, पशू येथील जंगलात विपुल आहेत. हत्तीसाठी म्हैसूरची ख्यातीच आहे. वाघ, सिंह, काळवीट, हरिण इत्यादी श्वापदाचे सरक्षण केले जाते.

औद्योगिक आघाडीवरही कर्नाटक अग्रेसर आहे. बंगलोर ही प्रचंड उद्योग नगरीच आहे. व्यापाराच्या क्षेत्रात कर्नाटक प्राचीन काळापासूनच एक व्यापारी केन्द्र म्हणून प्रसिद्ध आहे. टॉल्मीच्या ग्रंथात बादामी, इंडी, कळकेरी, मुद्गल, पट्टदकल्लु, बनवासि, चिम्मळगी, एल्लापूर, पसगे इत्यादी तत्कालीन कर्नाटकातील प्रमुख-स्थानाच्या व व्यापार-व्यवसाय केंद्राचा उल्लेख आहे.

एका प्राचीन ग्रीक प्रहसनात कर्नाटकातील मंगळूरजवळील मल्पे या बंदराच्या संबंधित एक दृश्य आहे. हे प्रहसन दुसऱ्या शतकातील आहे.

कर्नाटकचा कोणी एक राजा ग्रीकच्या सुंदर, लावण्यवती राजकुमारीला इकडे पळवून घेऊन आला. तो राजा मल्पे या दक्षिण कन्नड जिल्ह्यातील होता. त्याला मल्पे नायक म्हणून संबोधिले जात असे. ग्रीक राजकन्येला पळवून आणल्या-नंतर तिचा शोध करीत तिचे आप्त वगैरे संबंधी इकडे आले. त्यानी मल्पे नायक याला मधुपान करून राजकन्येला सोडवून घेऊन गेले. अशी त्या प्रहसनाची कथावस्तू आहे. हे प्रसहन ग्रीक-भाषेत असले तरी त्यातही ' पगडेयाट ', ' पान ', ' लहले ' गप्पाटप्पा इत्यादी कन्नड शब्द आढळतात. यावरून एवढे निश्चित होते की कर्नाटकचा ग्रीक इत्यादी बाह्य देशाशी संबध होते; व ते प्रामुख्याने व्यापारी संबंध होते.

कर्नाटकची भूमी जशी समृद्ध, सुपीक आहे, सृष्टीसौंदर्याने नटलेली आहे, तशीच तीर्थस्थाने, धारातीर्थे, कलाकौशल्य इत्यादींनी शोभलेली आहे, विशिष्टाद्वैत मताचे प्रतिपादक श्री. रामानुजाचार्य, द्वैतवादाचे प्रवर्तक मध्वाचार्य, वीरशैव धर्म-प्रचारक बसवेश्वर हे सर्व थोर धर्मात्मे येथेच होऊन गेले. पुरंदरदास, प्रभुदेव, अक्क महादेवी, चेन्नबसव, अल्लमप्रभु, सिद्धराम, कनकदास, जगन्नाथदास यांच्या-सारखे श्रेष्ठ संत, कुमारव्यास, पंप, रन्न, सर्वज्ञ यांच्यासारखे महाकवी या भूमीने

भारताला दिले आहेत. बादामी, हळेबीड, श्रवणबेळगोळ, पट्टदकल्लू, बेलूर, हंपी, ऐहोळे, इत्यादी विख्यात प्राचीन शिल्पमूर्ती, मंदिरे, यानी गजबजलेली कलास्थाने कर्नाटकात आहेत. कर्नाटक संगीताची जोपासना येथे झाली. प्रसिद्ध जोग, गिरसप्पा व गोकाक हे धबधबे येथेच आहेत.

आजच्या कर्नाटक राज्यात पुढील १९ जिल्हे आहेत—

| | | | |
|---|---|---|---|
| (१) बेंगलोर | (२) बेळगाव | (३) बेल्लारी | (४) बिदर |
| (५) विजापूर | (६) चिकमगलूर | (७) चित्रदुर्ग | (८) कुर्ग |
| (९) धारवाड | (१०) गुलबर्गा | (११) हसन | (१२) कोलार |
| (१३) मांड्य | (१४) म्हैसूर | (१५) उत्तर कर्नाटक | (१६) रायचूर |
| (१७) शिमोगा | (१८) दक्षिण कर्नाटक | | |
| (१९) तुमकूर | | | |

कर्नाटक राज्याची प्रमुख राज्यभाषा 'कन्नड' आहे. भारतीय प्रमुख भाषांमध्ये 'कन्नड' भाषेला मानाचे स्थान आहे. कन्नड ही साहित्यसंपन्न भाषा आहे.

आर्यावर्त आणि दक्षिणापथ यांच्यामध्ये 'कर्नाटक'चे स्थान एखाद्या स्नेह धाग्यासारखे आहे! दक्षिण–उत्तर भारताचा भ्रातृभाव व एकता याची प्राचीन काळापासूनच कर्नाटक जोपासना करीत आलेला आहे!

□ □

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 20799 दि.
क्रमांक ... नोंद दि.
5455 2/8/99
ग्रंथ संग्रहालय ठाणे
20799

# साक्षी–इतिहास

कर्नाटक राज्याला प्राचीन, विस्तृत इतिहास आहे. चित्रदुर्ग जिल्ह्यातील चन्द्रवल्ली नावाच्या गावी उत्खननात प्रागैतिहासिक कालातील वस्तूंचे अवशेष मिळालेले आहेत. लोखंड, पितळ, इत्यादी धातूंची भांडी व शस्त्रे, सोन्या–चांदीचे दागिने, मनुष्य व पशू यांच्या शिल्पाकृती इत्यादी उपलब्ध प्राचीन अवशेषांच्या अधारे त्या काळच्या संस्कृतीचा अंदाज करता येतो.

या अवशेषांप्रमाणेच प्राचीन शिलालेखांचाही उपयोग इतिहास जाणून घेण्यासाठी होत असतो. कर्नाटकात प्राचीन शिलालेख खूपच आहेत. ताम्रपटही बरेच उपलब्ध आहेत.

सम्राट अशोकाचा शिलालेख ब्राह्मी लिपीत आहे. त्यावरून असे अनुमान काढतात की, त्या काळी ब्राह्मी लिपी अधिक प्रचारात असावी. तसेच मौर्य राजघराण्याची सत्ता दक्षिणेत कर्नाटकापर्यंत येऊन भिडलेली होती हे देखील सिद्ध होते.

बेलूरजवळ 'हल्मिडि' येथील उपलब्ध शिलालेख हा कन्नड लिपीतला प्रथम शिलालेख मानला जातो. 'हल्मिडी'–शिलालेखा'चा काळ इ. स. ४५० समजण्यात येतो.

याशिवाय बादामी, श्रवणबेळगोळ इत्यादी ठिकाणचे शिलालेख व विजयनगरच्या राजवटीसंबंधीची ताम्रपत्रे ऐतिहासिक दृष्टीने मोलाची आहेत.

'मराठी'चा पहिला उपलब्ध शिलालेख देखील कर्नाटकातील श्रवणबेळगोळ येथील गोमटेश्वराजवळ आहे. हा शिलालेख इ. स. ९८३ मधील असून त्यावर 'श्री. चावुण्डराजे करवियले' असे एक वाक्य आहे !

चित्रदुर्ग येथील उत्खननात व अन्यत्रही बरीच जुनी नाणी सापडलेली आहेत. त्यावरूनही निरनिराळ्या राजवटींचा बोध होतो.

जुनी मंदिरे, भवने, लेणी, इत्यादी प्राचीन वास्तूंचा, कलाकृतींच्या साहित्याचा

देखील इतिहासाचा मागोवा घेण्याच्या कामी फार उपयोग होतो.

कर्नाटक प्रदेशाबद्दल विद्वानाचे असे मत आहे की, ज्ञात इतिहासाच्याही



जोगचा धबधबा

पूर्वकाळी या भागात मनुष्यवस्ती होती. ही माणसे वानरसदृश होती व ती नैसर्गिक गुहामधून राहात होती, असे सांगतात. चन्द्रवल्लीप्रमाणेच मलप्रभा व तुंगभद्रा यांच्या खोऱ्यात अतिप्राचीन अश्मयुगीन दगडी उपकरणाचे नमुने सापडलेले आहेत. घटप्रभेच्या काठी व बेळगाव जिल्ह्यातही उत्तर अश्मयुगातील दगडी उपकरणाचे नमुने मिळालेले आहेत. कृष्णेच्या खोऱ्यात मौर्य व आंध्र यांच्या काळातील रंगीत नक्षीदार मृण्मय पात्रांचे अवशेष मिळालेले आहेत. कोन्नूर, बादामी, ऐहोळ येथील भव्य दगडी स्मारके ही मौर्य काळातील असावीत असा अंदाज आहे.

प्राचीन कन्नडिग लोक दोन भिन्न वंशाचे होते. एक वंश द्रविडाचा व दुसरा द्रविडपूर्व लोकाचा. पुढे त्याचा आर्यांशी संबंध आला. त्याच्यात प्रगती होऊ लागली. कालांतराने ते आर्यांच्या वर्णव्यवस्थेत समाविष्ट होऊन क्षत्रिय बनले.

प्राचीन काळी कर्नाटक प्रदेशाचा अंतर्भाव 'चोळ' देशात होत असे. त्यामुळे 'चोळमंडलम्' असे नावच या प्रदेशाला पडले होते.

त्या आधी मौर्यांच्या सत्तेखालीही काही भाग होता.

**मौर्यकाल**

पहिला भारतीय सम्राट चंद्रगुप्त मौर्य याने नंदवंशाचा निःपात करून आर्य चाणक्याच्या साहाय्याने मगधाचे साम्राज्य जिंकले व उत्तरेत दिग्विजय करून आपल्या साम्राज्याची सीमा दक्षिणेत कर्नाटकापर्यंत भिडवली. उत्तरवयात चंद्रगुप्ताने राज्यत्याग करून जैनपरंपरेनुसार इ स. पू. ३०० मध्ये तो जैन साधू भद्रबाहू याच्याबरोबर म्हैसूरजवळील कल्वार येथे आला. नंतर श्रवणबेळगोळच्या निकटच 'कळवप्पु' नावाच्या ठिकाणी राहून त्याने तपस्या केली, अशी आख्यायिका आहे,)

(चंद्रगुप्ताचा नातू देवानाम् प्रिय अशोक ह्याचे चिरस्मरणीय शिलालेख येथील ब्रह्मगिरी, चित्रदुर्ग, मास्की इत्यादी ठिकाणी उपलब्ध आहेत. अशोकाच्या राजवटीच्या वेळी हा प्रदेश विख्यात होता. त्याच्या शिलालेखात रठिक, पिटिनिमा व सूतियपूतो हे नामोल्लेख मिळतात. 'रठिक' हा शब्द बहुधा राष्ट्रकूटाचे पूर्वज 'रट्ट' यांच्यासाठी वापरलेला आहे. त्याची मातृभाषा कन्नड होती. पिटिनिका व सूतियपूतो हे सातवाहनाचे पूर्वज असावेत. प्रसिद्ध बौद्धधर्मग्रंथ 'महावंश' यातील बाराव्या अध्यायात अशोकाने धर्मप्रचारासाठी भिक्षूंना महाराष्ट्र, महिषमंडल व बनवासी येथे पाठविले होते, असा उल्लेख आहे.) त्यात गोदावरी व कृष्णा या नद्यामधील प्रदेशाला 'महाराष्ट्र' असे म्हटलेले आहे. यावरून तत्कालीन महाराष्ट्र आजच्या महाराष्ट्राहून वेगळा होता असे दिसते. तत्कालीन महाराष्ट्र हा कर्नाटकचाच एक भाग होता. इतकेच नव्हे तर प्राचीन काळी कर्नाटकालाच 'महाराष्ट्र' म्हणून ओळखले जाई, असाही प्राचीन उल्लेख आढळतो. आजच्या महाराष्ट्रातील बरीचशी गावे तत्कालीन कर्नाटकात होती. उदाहरणार्थ, मुंबणि ( आजची मुंबई ) ठाण, नागौन, सोपारा ( शूर्पारक ), इत्यादी गावे कन्नड सामंत राजा उत्तर शिलहार याच्या वेळी प्रसिद्ध बंदरे होती. नृपतुंगाच्या एका शिलालेखावरून 'पुणक'

( पुणे ), पंढरपूर आदी गावे कर्नाटकात होती असे दिसते. याचा अर्थ असा की प्राचीन काळी कर्नाटकाच्या विस्तार बराच होता.

सातवाहन

मौर्यांच्या नंतर सातवाहनांची राजवट कर्नाटकावर आली. मौर्यांनी कर्नाटकाला भारतातील राजकीय परिस्थितीने प्रभावित केले होते; सातवाहनांनी त्याला स्वतंत्र अस्तित्व मिळवून दिले. त्यांच्याकाळी कर्नाटकाचा विस्तार झाला.(सातवाहनांच्या काळची नाणी; मुद्रा उपलब्ध आहेत. यानाच ' शतकर्णी ' अथवा ' शालिवाहन ' असेही म्हणतात) हे कन्नड भाषी होते की आंध्र असा एक प्रश्न विद्वानांच्या पुढे आहे. काहींनी याना ' आंध्रभृत्य ' असे म्हटले आहे. सातवाहनांचे साम्राज्य नर्मदा–गोदावरीपासून कृष्णा–तुंगभद्रेपर्यंत पसरलेले होते. त्याच्याही खाली म्हणजे म्हैसूर विभागावरही त्यांची सत्ता होती. कर्नाटकातील ' कुंतल ' नामक भाग सातवाहनांचा विशेष आवडता होता. सातवाहन राजे स्वतःला ' कुंतलस्वामी ' ही उपाधी लावून घेण्यात भूषण मानीत असत. या राजवंशात हाल, सातवाहन, गौतमीपुत्र शतकर्णी, पलुयामी आदी राजे महान पराक्रमी, विख्यात होऊन गेले. सातवाहनांची राजधानी आजच्या महाराष्ट्रातील ' पैठण ', तत्कालीन ' प्रतिष्ठान ' नगरी येथे होती.

सातवाहनांच्या पतनानंतर त्यांचे वंशज व सामंत यांनी कर्नाटकाच्या विविध भागांवर आपआपली सत्ता स्थापण्याचा प्रयत्न केला. अशा राजवंशांमध्ये चुटु, बाण, आळुप, सेन्द्र, नळ आणि पुन्नाड हे विशेष प्रसिद्ध झाले.

चुटु

चुटु राजवंशाने वनवासी प्रदेशावर राज्य केले. चुटु म्हणजे छोटे किंवा कनिष्ठ. हे मानव्य गोत्री ब्राह्मण होते. सातवाहनांचे मांडलिक व नातेवाईकही होते. सातवाहन साम्राज्याचा दक्षिण विभाग सांभाळण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. पुढे सातवाहनांच्या पतनकाळाचा यांनी फायदा उठवला व हे स्वतंत्र झाले. चुटूंनी सुमारे १५० वर्षे राज्य केले. वैजयंती नगरी येथे चुटूंची राजधानी होती. उत्तर कन्नड, चितळदुर्ग या जिल्ह्यात त्यांची नाणी आणि कान्हेरी, वनवासी, मलवल्ली येथे यांचे शिलालेख सापडले आहेत. त्यात हरीतिपुत्र विष्णुस्कंद ( विष्णुकद ), चुटुकुलानंद सातकर्णी व त्याचा नातू शिवस्कंद वर्मा ( शिवस्कद नागश्री ) ही नावे प्रामुख्याने आढळतात.

पल्लव वंशातील राजाने चुटूंचे राज्य जिंकून घेतले. कदंब राजवंश या चुटु वंशाच्या एका शाखेतूनच उदयाला आला, असे एक मत आहे.

**कदंब**

कर्नाटकातील प्रसिद्ध राजवंशामध्ये कदंबाचे स्वतंत्र स्थान आहे. चुटु राजवंशाशी कदंबाचा संबंध होता. 'हेही मानव्य गोत्राचे होते. दोघांचीही राजधानी वैजयंती पूर–वनवासी–येथे होती. म्हणून त्यांना 'वैजयन्तीपुराधीश्वर' असे म्हटले जाई. यांची राज्यभाषा प्राकृत होती.



रूपदर्शिनी – शिल्पाकृती बेलूर

कर्नाटकामध्ये कदंबाची राजवट तिसऱ्या शतकाच्या उत्तरार्धात स्थापित झाली होती. कदंबाच्या मूळपुरुषासंबंधी भिन्न मते आहेत. एका शिलालेखात मुक्कण्ण अथवा त्रिलोचन याला कदंबाचा मूळपुरुष म्हणून उल्लेखिले आहे, तर दुसऱ्या एका शिलालेखात मयूरवर्मा यास कदंबाचा मूळपुरुष म्हटले आहे. काही असो; कदंब कन्नड भाषिक होते व ते वनवासीचे होते. त्याच्या कारकीर्दीतील नाणी सापडली असून त्यावर सिंहाचे चिन्ह अंकित केलेले आहे. ते ' वानरध्वज ' होते.

इ. स. २८० मधील मयूरवर्मा याचेच नाव मूळपुरुष म्हणून उल्लेखण्यासारखे आहे. तो प्रतापी पुरुष होता. तो ब्राह्मण होता असे मानले जाते. पल्लवाना जिंकून त्याने कांची नगर हस्तगत केले होते. त्यानंतर त्याने कर्नूल जिल्ह्यातील श्री पर्वता-वर आक्रमण केले व तेथील बाणाना पराभूत केले. चंद्रवळ्ळी येथील एका शिला-लेखावरून असे कळते की, त्याने त्रैकूट देश, पारियात्रा, शखस्थान, पुन्नाड व सयिंद्रक येथील राजाच्या आणि पल्लव, आभीर–व मोखरी याचाही पराभव केला होता. याचे राज्य दक्षिणेला शिवमोगपासून कांचीपर्यंत आणि उत्तरेला माळव्या-पासून गयेपर्यंत पसरलेले होते. हा सम्राट म्हणून ख्याती पावला होता व याने अश्वमेध यज्ञही केला होता.

मयूरवर्माचा पुत्र काकुत्स्थ वर्मा नावाचा होता. हा देखील मोठा पराक्रमी राजा झाला. याच्या कन्याची लग्ने गुप्तवंशातील व अन्य राजवंशातील राजकुमाराशी झाली होती. हा प्रजाहितदक्ष राजा होता. याने ताळगुंदच्या प्राणेश्वर देवालयातील कल्याण मंडपाची स्थापना केली होती.

याच्या पश्चात जे राजे झाले, त्यात मृगेश वर्माचे नाव प्रसिद्ध आहे. काकुत्स्थ वर्माचा हा नातू. हा न्यायप्रिय शासक होता.

कदंबाचे राज्य सहाव्या शतकापर्यंत स्थिर होते. सातव्या शतकापासून त्याचा प्रभाव क्षीण होऊ लागला व गंग राजाचा प्रभाव वाढू लागला. लहान लहान राजानीही उठाव केले. त्यामुळे ७ ते १० शतकाच्या कालावधीत कदंबाचा प्रभाव राहिला नाही. परंतु पुन्हा १० ते १४ शतकापर्यंत कदंबानी आपला थोडा फार प्रभाव पाडला. त्यानंतर मात्र त्याचा अस्तच झाला.

**बाण**

बाण अथवा महाबली राजवंशाचे लोक स्वतःला बलि चक्रवर्तीच्या वंशातील

मानतात. बाणाचे राज्य पहिल्या शतकापासून दहाव्या शतकापर्यंत होते. कोलार, कडप (आंध्र), तिरुवल्लम (उत्तर आर्काट), वनपूर व महाबलिपूरम (तमिळनाडू) ही स्थाने बाणाच्या राज्यात होती. बाणाचा संबंध कदंब व चोळ राजघराण्याशी होता. कालांतराने त्यानी गंग राजाशीही संबंध स्थापित केले. पंधराव्या शतकापर्यंत बाण वंशाचे नाव प्रसिद्ध होते.

**आळुप**

तुळुवनाडु (दक्षिण कन्नड जिल्हा), हैवनाडु (उत्तर कन्नड जिल्हा), कोकण व पश्चिम पर्वतीय प्रदेश या भागावर आळुप वंशी राजानी पहिल्या शतकापासून पंधराव्या शतकापर्यंत राज्य केले. त्याच्या राज्याला 'आळ्वखेडा' असे म्हटले जाई. ग्रीक विद्वान टॉलेमी याने याला 'ओलेखोर' म्हटले आहे. आळुपवंशीय राजामध्ये आळुप राजासंबंधी माहिती मिळते ती अशी— ह्या राजाने इ. स. ४५० मध्ये राज्य केले. त्याच्या आधीच्या राजाची माहिती उपलब्ध नाही. त्यानंतर ६७५ ते ७०० पर्यंत चित्रवाहन नामक राजाने राज्य केले. त्यानंतर ११९३ ते ११५५ या काळात प्रसिद्ध असा कवी भुजबल आळपेंद्र नावाचा राजा होऊन गेला.

विजयनगरच्या राज्यस्थापनेच्या वेळी वीरकुलशेखर नावाचा आळुप राजा राज्य करीत होता. विजयनगर राज्याचा संस्थापक व वीरकुलशेखर यानी मिळून कर्नाटकाच्या इतिहासात एका नवीन अध्यायाला प्रारंभ केला. वीरकुलशेखराने विजयनगरच्या राजाचे मांडलिकत्व स्वीकारून देशाच्या एकतेला बळ पुरविले.

**गंग**

कर्नाटकच्या इतिहासात गंग राजाना एक महत्त्वपूर्ण स्थान आहे. त्याचे राज्य म्हैसूरच्या मध्यात आणि दक्षिणेत होते. हे शूर, शालीन होते. त्यांनी राज्य विस्तारही केला. भारतीय राजकारणात कर्नाटकाला स्थान प्राप्त करून देण्यात कदंबाप्रमाणेच गंगानाही श्रेय दिले जाते. त्याच्यामुळेच येथील राजकीय परिस्थितीला स्थिरता आली.

गंगाचा वंश प्राचीन असून पद्मनाथ नावाचा त्याचा मूळपुरुष होता. माधव आणि दडिग हे त्याचे पुत्र. हे कडपा जिल्ह्यातील गंग पेरुरु गावचे राहाणारे. जैन साधू सिंहनंदी याच्या काळी राजकीय क्षेत्रात याचा प्रभाव पडू लागला. माधवाचे दुसरे नाव होते कोंगुणिवर्मा. याने सिंहनंदीच्या साहाय्याने इ. स. २५० मध्ये 'गंगवाडि' राज्याची स्थापना केली. चौथ्या शतकापर्यंत गंगांची राजधानी

कुवलयपुर—म्हणजे कोलार येथे होती. नंतर कोंगुणिवर्माचा नातू हरिवर्मा याच्या कारकीर्दीत कावेरीच्या काठी असलेल्या ‘ तलकाडु ’ नगरीत राजधानी नेली. गंग राजे जैनधर्मावलंबी होते. परंतु हरिवर्माचा पुत्र विष्णुगोप याने वैष्णव धर्म स्वीकारला होता. विष्णुगोप राजाचा नातू अविनीत हा गग राजामध्ये अत्यंत प्रख्यात झाला. तो विद्वान, उदार व न्यायप्रिय राजा होता. पुन्नाडचा राजा स्कंधवर्मा याच्या कन्येशी याचा विवाह झाला होता.

याचा पुत्र दुर्विनीत याला कन्नड साहित्यामध्ये मानाचे स्थान आहे. याने संस्कृत कवी भारवी याच्या ‘ किरातार्जुनीय ’ काव्याच्या पंधराव्या सर्गावर कन्नड-मध्ये टीका लिहिली आहे. हा शूर होता, पल्लवाच्या राज्यापर्यंत याने आपला राज्य-विस्तार वाढवला.

याच्या पश्चात भूविक्रम राजाचे नाव उल्लेखनीय आहे. याने विळिंद येथे पल्लवाचा पराभव केला होता. ७२६ ते ८०१ या कालावधीत गंग राजा श्रीपुरुष झाला. या वेळी गंग राज्य अत्यंत उत्कर्षावर पोचलेले होते. यानेही युद्धात पल्लवाना पराभूत केले होते. याच्यामुळेच गंग-राज्य हे ‘ श्री-राज्य ’ म्हणून प्रख्यात झाले.

यानंतरचे गंग राजे प्रभावहीन निघाले. राष्ट्रकूट व चोळ राजाचा प्रभाव वाढू लागला. परिणामी ११ व्या शतकाच्या प्रारंभीच गंग राजवट क्षीण झाली; परंतु १६ व्या शतकापर्यंत तिचे अस्तित्व कसेबसे टिकून होते. त्यानंतर हे राज्य विजय-नगरच्या साम्राज्यात विलीन झाले.

**नोळम्ब**

नोळम्ब आणि पल्लव याचा संबंध होता. नोळम्ब हे ‘ नोळम्बवाडी ’चे शासक होते. हा प्रदेश तुमकूर व चित्रदुर्ग जिल्ह्यात येतो. नोळम्बाधि उर्फ मंगळ हा या घराण्यातील पहिला राजा. गंग राजा शिवमार हा जेव्हा सैगोट्ट राष्ट्रकूटाकडून पराभूत झाला तेव्हा नोळम्ब हे राष्ट्रकूटाचे सामंत बनले. दहाव्या शतकात ‘ नन्नि ’ नामक राजाच्या कारकीर्दीत नोळम्बानी स्वतंत्र राज्यस्थापना केली. अकराव्या शतकापर्यंत नोळम्बाचा प्रभाव वर्धिष्णु होता. त्यानी चोळ राजा राजनरेन्द्र याचे सहाय्य मिळवून त्याचा प्रतिनिधी या नात्याने यानी कर्नाटकच्या विविध भागांवर राज्य केले.

**बदामीचे पश्चिम चालुक्य**

कर्नाटकातील प्रसिद्ध राजवंशापैकी हा एक आहे. पाचव्या शतकापासून ते

आठव्या शतकापर्यंत चालुक्य उन्नतावस्थेत होते. नंतर पुनः दहाव्या शतकापासून बाराव्या शतकापर्यंत याचे प्रामुख्य राहिले.

चालुक्यांचे प्राचीन नाव ' चळुक्य ' होते. सातव्या शतकात ' चालुक्य ' हेच नाव प्रचलित झाले. हे उत्तरेकडून दक्षिणेत आले असे सागतात. परंतु काही विद्वानाच्या मते हे मूळचे कर्नाटकीच आहेत. चालुक्याचा पहिला राजा जयसिंह झाला. याने युद्धात राष्ट्रकूटाचा पराभव केला होता; पण पल्लवाशी लढत असताना हा मारला गेला.

याचा पुत्र पुलकेशी प्रथम इ. स. ५५० मध्ये गादीवर आला. याने पल्लवाचा पराभव करून वातापी हस्तगत केली व तिथेच आपली राजधानी ठेवली. या शूराने खूप राज्यविस्तार केला. याला कीर्तिवर्मा-प्रथम व मंगळेश असे दोन पुत्र होते. कीर्तिवर्माने ५६६ ते ५९८ पर्यंत राजा केले. त्यानंतर मंगळेश गादीवर आला. त्याने कलचुरींना जिंकले होते. रेवतीद्वीप ताब्यात घेतले होते.

याच्या मृत्यूनंतर कीर्तिवर्मा प्रथम व मंगलेश याच्या पुत्रामध्ये राज्यासाठी तंटा सुरू झाला. त्यात कीर्तीवर्माचा पुत्र पुलकेशी द्वितीय याचा जय झाला. याने ६०९ ते ६४९ पर्यंत राज्य केले. याच्या कारकीर्दीत पश्चिम चालुक्याची कीर्ती चोहोकडे पसरली. कदंबाचा पराभव करून त्याची राजधानी वादामी याने हस्तगत केली. तुळुव, आलुप, गंग व मौर्य यानाही यानी जिंकले होते. त्याशिवाय लाट, मालव आणि गुजरातमधील राजाना याने आपले माडलिक राजे बनवले. यानी कनौजच्या सम्राट हर्षवर्धनाचाही युद्धात पराभव केला होता. या विजयामुळेच याने ' सत्याश्रय ' ही उपाधी धारण केली होती. याने कोसल, कलिंग व पिष्टपूरपर्यंत मजल मारली होती. पल्लव राजा महेन्द्रवर्मा याचा याने पराभव केला होता व चोळ, चेर आणि पाड्य याच्या बरोबर मैत्री जोडली होती.

पुलकेशी-द्वितीय याने दोन वेळा पल्लवाचा पराभव केला होता, पण त्याच्या-कडूनच नरसिहवर्मा नावाच्या पल्लव राजाकडूनच हा शेवटी मारला गेला. याच्या नंतर चालुक्य राजवट उताराला लागली.

ह्यूएनत्संग याने पुलकेशी द्वितीय याच्या राज्याचे वर्णन केले आहे.

विक्रमादित्य द्वितीय याच्या काळी पुनश्च पश्चिम चालुक्याचे वैभव वाढले. ७५४ मध्ये राष्ट्रकूट राज्य दुर्गसिह याने कीर्तिवर्मा—द्वितीय याचा पराभव करून चालुक्यांचे राज्य संपविले.

पूर्व चालुक्याचे राज्य वेंगी येथे होते. पुलकेशी प्रथम यानेच आपला भाऊ विष्णुवर्धन याला वेंगी येथे राज्याभिषेक करून चालुक्याचे राज्य स्थापन केले होते. हे राज्य ११ व्या शतकापर्यंत चालले. कन्नडचे प्रख्यात कवी पंप यानी वेंगी दरबारी राहूनच ‘ विक्रमार्जुनविजय ’ या काव्याची रचना केली.

राष्ट्रकूट

भारतीय इतिहासात राष्ट्रकूट साम्राज्याचा महत्त्वपूर्ण उल्लेख आढळतो. कर्नाटकच्या इतिहासातही त्याना स्वतंत्र असे स्थान आहे. त्याचे मूळ स्थान लट्ट नुरु ( लातूर ) हे असावे. अशोकाच्या शिलालेखात ‘ रथिका ’चा उल्लेख आहे. त्यावरून ‘ रथिक ’ म्हणजेच हे ‘ राष्ट्रकूट ’ होत, असे काही विद्वानाचे अनुमान आहे.

राष्ट्रकूटाच्या शिलालेखात एक मोठ्या नागराचे चिन्ह दिसते. पूर्व चालुक्यानी राष्ट्रकूटाचा उल्लेख कृषक जातीमध्ये केलेला आहे. म्हणून हे प्रारंभी कृषक असण्याचीही शक्यता आहे. नागराच्या चिन्हाशिवाय गरुडाचे चिन्हही त्याचेच मानले जाते. राष्ट्रकूटाच्या राज्याला ‘ रट्टवाडा ’ असे म्हटले जाते. त्याची राजधानी प्रारंभी नासिक जिल्ह्यातील मोरखण्डी— मयूरखंडी येथे होती. नंतर ती मान्यखेर — मान्यखेड – येथे नेण्यात आली.

ऐतिहासिकदृष्ट्या दंतिवर्मा अथवा दंतिदुर्ग-प्रथम हा राष्ट्रकूटाचा पहिला राजा होय. दंतिदुर्ग-द्वितीय याच्या काळी, म्हणजे इ. स. ७५४ च्या सुमारास राष्ट्रकूट–राज्याचा विस्तार होऊ लागला. हा मोठा पराक्रमी राजा होता. उत्तरेत माही— नर्मदेपर्यंत, पूर्वेला महानदी व दक्षिणेला कांचीपर्यंत याने राज्य वाढवले. परंतु आयुष्याच्या संध्याकाळी प्रजेचा विश्वास आणि गौरव यापासून याला वंचित होऊन राज्य सोडावे लागले.

याच्या पश्चात चुलता कृष्ण-प्रथम गादीवर बसला. कृष्ण राजाच्या कारकीर्दीतच वेरूळच्या कैलास लेण्याची निर्मिती झाली.

याच्या नंतर झालेल्या राजामध्ये गोविंद-तृतीय याच्या नावाचा उल्लेख होतो. याने गुजरातवर आक्रमण केले होते व विंध्य पर्वताच्या आसपासच्या कित्येक राजाना आपल्या राज्यात समाविष्ट करून टाकले होते. गंग राजाशी राष्ट्रकूटानी अनेक लढे दिले. परंतु अमोघवर्ष अथवा नृपतुंग याने आपल्या कन्येचा गंग राजकुमार भूतुंग याच्याशी विवाह करून मैत्री जोडली. नृपतुंग इ. स. ८१५ ते ८७७ या काळात झाला.

२०११९

कृष्ण-तृतीय हा ९३६ ते ९६८ या काळात झाला. या कालावधीत राष्ट्रकूट-साम्राज्याची अधिक वाढ झाली. दक्षिणेत तंजावूर व उत्तरेत बुंदेलखंड इथपर्यंत हे साम्राज्य पसरले होते. पण हे वैभव फार काळ टिकले नाही. ९७३ मध्ये राष्ट्रकूट राजा कक्क किंवा कक्कळ हा चालुक्याच्या हातून मारला गेला. तेव्हा-पासून राष्ट्रकूटाच्या ओहोटीला सुरुवात झाली. इंद्र हा शेवटचा राष्ट्रकूट राजा होता. याने ९८२ मध्ये जैनधर्मानुसार सल्लेखन व्रताचे आचरण करून श्रवणबेळ-गोळ येथे अखेरचे दिवस कंठले.

दहाव्या शतकात चालुक्य राजा विक्रमादित्य अथवा विक्रमार्क याने पुन्हा जोर केला. ' विक्रम संवत् ' यानेच सुरू केला. पण कळचुरी, होयसळ, यादव याच्या वाढत्या प्रभावापुढे चालुक्य टिकले नाहीत.

### यादव

यादव खान्देशातून आले होते. त्याना ' सेउण ' असेही म्हणत. त्यानी कळचुरी व होयसळ याच्यावर स्वाऱ्या केल्या. नवीन माहितीनुसार हे मूळचे कोलार जिल्ह्यातलेच, पण आठव्या शतकात उत्तरेकडे गेले व बाराव्या शतकात परत आले. यादवामध्ये ' भिल्लम ' राजाचे नाव उल्लेखनीय आहे. याने देवगिरी ही राजधानी केली. त्याच्यापूर्वीच सेउणाची राजधानी सिंदिनेर—म्हणजे नासिक जिल्ह्यातले आजचे सिन्नर येथे होती. ११९० मध्ये होयसळानी भिल्लमचा पराभव केला. १३१८ मध्ये मुसलमानी आक्रमणापुढे रामचंद्र यादवाचा टिकाव लागला नाही.

### कळचुरी

याना ' कळभरी ' किंवा ' कळचुर्य ' असेही म्हणतात. हे हैहयवंशी होते. कळचुरी राजवंशाने भारतात बऱ्याच ठिकाणी राजसत्ता भोगली होती. कर्नाटकाच्या संदर्भात बिज्जळ नावाचा राजा उल्लेखनीय होऊन गेला. वीरशैव पंथाचे प्रवर्तक श्रीबसवेश्वर हे बिज्जळ राजाचे मुख्य मंत्री होते. दोघात स्नेहही होता. त्याच्या स्नेहासंबंधी अनेक कथा प्रचलित आहेत. बिज्जळाच्या पश्चात त्याचा पुत्र राममुरारी सोयीदेव याने ११६७ ते ११७६ पर्यंत राज्य केले. त्यानंतर त्याचा भाऊ संकम याने ११८३ पर्यंत राज्य केले. या वेळेपासून कळचुरींच्या पतनास सुरुवात झाली.

होयूसळ

होय्सळ हे कर्नाटकमधलेच होते. ‘ सोसेवुरु ’ म्हणजे आजचे अंगाडि हे त्याचे गाव. त्याना ‘ मलेपरोळ गंड ’ ही पदवी होती. यावरून ते तेथील मलेनाडु-पर्वतीय प्रदेशाचे राजे होते हे प्रकट होते.

पोय्सळ नावाचा होय्सळाचा मूळ पुरुष होता. त्याच्या पश्चात ११०२ मध्ये विनयादित्य प्रथम या राजाचे नाव येते. विनयादित्य– द्वितीय याचे काळी होय्सळाचे बल वाढले व स्वतंत्र झाले. त्या आधी ते चालुक्याचे मांडलिक होते. नंतर बल्लाळ, बिट्टिदेव हे राजे झाले. बिट्टिदेव अथवा विष्णुवर्धन हा शूर होता. प्रारंभी जैनधर्मानुयायी होता, पण नतर रामानुजाचार्यांच्या शिकवणुकीने प्रभावित होऊन वैष्णव बनला, आणि तेव्हापासून ‘ विष्णुवर्धन ’ हे नाव प्राप्त झाले. याच्या राज्याची सीमा दक्षिणेला मलबार व उत्तरेला हैदराबादपर्यंत होती.

याच्या पश्चात नरसिंह प्रथम या शांतिप्रिय राजाने ११४१ ते ११७३ पर्यंत राज्य केले. त्याचा पुत्र बल्लाळ द्वितीय याने राज्यविस्तार केला. याने उचंगि दुर्ग जिंकल्यानंतर कल्चुरी राजा संकमदेव व सेउण राजा भिल्लम याचा युद्धात पराभव केला.


( होय्सळाचा उत्कर्ष १२५४ पर्यंत झाला. परंतु त्यानंतर राज्याचे दोन भाग झाले. परंपरागत राज्याचा अधिपती नरसिंह तृतीय बनला आणि कोलार व तमिळ-नाडुमधील काही प्रदेश रामनाथ राजाच्या सत्तेखाली आला. हे दोघे होय्सळ राजे सम्राट सोमेश्वर याचे पुत्र होते.) १३०१ मध्ये वीर बल्लाळ तृतीय हा राजा गादीवर आला. याच्या काळीच मुसलमानी आक्रमणे सुरू झाली व १३४२ साली हा राजा मुस्लीम आक्रमकाशी लढताना तिरूचिरापल्लि येथे मारला गेला. त्याच्या पश्चात १३४२ ते ४६ पर्यंत विरूपाक्ष राजाने राज्य केले. त्यानंतर मात्र या राजवटीचा अस्त झाला. कर्नाटकाच्या इतिहासात होय्सळाना महत्त्वाचे स्थान आहे. १२ व्या शतकापासून १४ व्या शतकापर्यंत होय्सळानी राज्य केले. कर्नाटकची कीर्ती सर्वत्र पसरविली. पन्नास वर्षे मुसलमानाशी झगडून त्याना परत पिटाळले.

या प्रमुख राज्यवंशा व्यतिरिक्त,कर्नाटकमध्ये शिलाहार, सौंदत्ति, रट्ट, हानगल्ल व गोव्याचे कदंब, सिंद, गुत्त, सेनवार, शातर, सालुव, चंताल्व आणि कोंगाल्व या राजवंशानी राज्य केले.

चौदाव्या शतकापर्यंत कर्नाटकची राजकीय परिस्थिती अशी होती. त्यानंतर विजयनगरचे साम्राज्य हा गौरवशाली कालखंड येतो.

**विजयनगरचे साम्राज्य**

विजयनगरचे साम्राज्य ही भारतीय इतिहासातील एक गौरवशाली व अभिमानास्पद अशी घटना आहे. या साम्राज्याची स्थापना १३३६ मध्ये झाली होती अशी आख्यायिका आहे, पण इतिहासज्ञांच्या मते १३४६ मध्ये याची स्थापना झाली होती. या साम्राज्याचे संस्थापक हरिहर, बुक्क, कंपण, मारण व मुद्दप असे पाच भाऊ होते. यांच्या पित्याचे नाव होते संगम. म्हणून त्यांना संगम वंशज म्हटले जाते. या बंधूंनी विद्यारण्य स्वामींच्या साहाय्याने विजयनगरच्या साम्राज्याची स्थापना केली. भारतातील हिंदु साम्राज्यामध्ये विजयनगरचे साम्राज्य विख्यात



शिलारथ – हंपी

झाले ! १३४६ ते १७४६ हा याचा कालखंड. या अवधीत आपले अपार वैभव प्रकट करून हे चिरस्मरणीय झाले.

हंपी येथील विरुपाक्ष देवाचे हे संगम वंशज उपासक होते. त्याच्या ध्वजा-वरील चिन्ह वराह होते. चालुक्याचेही हेच चिन्ह होते. यावरून असे दिसते की संगम वंशज हे चालुक्याचे उत्तराधिकारी असावेत. विजयनगरच्या साम्राज्याशी कर्नाटक व आंध्र या दोन्ही प्रदेशाचा संबंध होता. प्रारंभी कन्नड भाषीयाचे अधिपती होते, नंतर तेलुगु भाषी शासक झाले. तथापी, सर्वांनाच ' कर्नाटक साम्राज्याधिपती ' अशा बिरुदाने गौरविले जाई.

या बंधूंनी मोठ्या शौर्याने मुसलमानी आक्रमणाला थोपवून धरले, बुक्कराय शूरवीर योद्धा होता. शत्रू त्याला घाबरून असे. विजयनगर साम्राज्याच्या स्थापने-नंतर वर्षभरातच १३४७ मध्ये बहामनी राज्याची स्थापना झाली होती. या दोन्ही राज्यात संघर्ष चाले. अखेरीस १५६५ मध्ये मुस्लीमानी हिंदूंवर विजय मिळविला. हरिहर-द्वितीय, देवराय, साळुव नरसिंह हे उल्लेखनीय राजे विजयनगरच्या गादीवर पुढे आले. १४७८ साली साळुव वंशाची स्थापना झाली. याच्या काळी विजय-नगरच्या इतिहासात नवीन अध्याय सुरू झाला. बहामनी सुलतानानी आक्रमण केले असता साळुव नरसिंह राजाने त्याच्याशी तह केला. पुढे त्याचा प्रभाव राहिलाच नाही.

परंतु याच सुमारास सेनापती नरस याने विजयनगरची राजगादी आपल्या ताब्यात घेतली. त्याच्या राजवंशाला ' तुळुव ' म्हटले जाते. त्याने अद्‌भुत असे शौर्य प्रकट करून श्रीरंगपट्टण येथे दुसरी राजधानी स्थापली. याच्या पश्चात वीरनसिंह व श्रीकृष्ण देवराय, हे राजे झाले. श्रीकृष्ण देवरायांच्या कीर्तीचा यशोध्वज सर्व भारतात फडकला. १५२० मध्ये त्यानी मुस्लिमाचा पूर्ण पाडाव केला. तसेच अनेक छोटे-मोठे राजे, सामंत याना आपल्या अमलाखाली आणले. याचे साम्राज्य श्रीलंकेपासून उडीसापर्यंत पसरले होते. यापूर्वी दक्षिणेत एवढे विशाल साम्राज्य कोणाचेच झाले नव्हते. श्रीकृष्ण देवराय हा एक उदार, विद्याप्रेमी, कलारसिक असा गुणवंत राजा होऊन गेला. याच्या दरबारात शास्त्री-पंडित-कवी-कलावंत आदी गुणवानांचा सत्कार होत असे. तेलुगु व कन्नड भाषाभाषी अनेक विद्‌वान त्याच्या सभेत होते. याच्या कारकीर्दीत तेलुगु आणि कन्नड साहित्याची बरीच उन्नती झाली. महाप्रभु वल्लभाचार्य याच्या दरबारी गेले होते व तेथे त्यानी आपल्या ' शुद्धाद्वैत ' मताचे

विवेचन केले होते. तेलुगुचे प्रसिद्ध कवी अल्लसानी पेद्दना याच्या दरबारी होते. श्रीकृष्णदेवरायाच्या आज्ञेवरूनच तिम्मण्ण कवीने कुमारव्यासाच्या कन्नड महाभारताचे अन्तिम सहा पर्व पूर्ण केले. व्यासराय पुरंदरदास हे संतकवी याच्या काळीच होऊन गेले.

श्रीकृष्णदेवरायाच्या कारकीर्दीतच यग्दार बेग नामक यात्रिक विजयनगरला आला होता. त्याने या साम्राज्याचे विस्तृत आणि सुंदर वर्णन लिहिलेले आहे.

श्रीकृष्णदेवरायाच्या पश्चात १५३० मध्ये अच्युतराय, नंतर आळिय रामराजु, सदाशिव हे राज्याधिकारी झाले. पण १५६५ मध्ये मुसलमानी आक्रमणात विजयनगरचा विध्वंस झाला व मुस्लीम राजवट सुरू झाली.

परंतु हिंदूंनी आपली राजधानी बदलली. प्रथम पेनुगोण्ड, नतर चंद्रगिरी व अखेरीस वेल्लूर येथे राजधानी केली. सुमारे ८० वर्षे मुस्लिमाशी टक्कर देत हे साम्राज्य उभे राहिले. या काळात वेंकट पतीदेव, श्रीरंगराय इत्यादी राजे झाले. त्यानंतर १६४६ मध्ये या साम्राज्याचा अस्त झाला.

त्यानंतर ल्हान, ल्हान माडलीक राजे, सामंत, सरदार आदींनी आपापल्या सामर्थ्यावर स्वतंत्र होण्याचा प्रयत्न केला. म्हैसूर व कळेदि—यालाच इक्केरी किंवा बिसनूर राज्यही म्हणतात—यानी स्वतंत्र राज्ये स्थापन केली. उम्मतूर, आत्रालिनाडु, एल्हंका, चित्रदूर्ग, निडगल्लु, चन्नपट्टण, कोडगु व कार्कळ येथे ल्हान ल्हान राजे होते. व मदुरा, जिंजी, तंजावर येथे त्याचे प्रतिनिधी राज्य करीत होते. हे सर्व राज्यलोभाने एकमेकात लढू लागले. कालातराने यापैकी काही मराठ्याच्या अधीन झाले, काहींना पुढे इंग्रजानी पराभूत केले.

**केळदि**

या राज्यातर्गत शिवमोग्ग जिल्हा, दक्षिण व उत्तर कन्नड जिल्हे यातील अधिकाश भाग, गुप्ति व आरग हा भाग होता. याची राजधानी प्रारंभी इक्केरी व नंतर बिदनूर येथे होती. शासक वीरशैव लिंगायत होते. चौडप्प हा या राज्याचा संस्थापक मानला जातो. हा श्रीकृष्णदेवरायाच्या सेनापतींपैकी एक होता. याच्यानतर सदाशिव नामक, वेंकटप्प नामक, शिवप्प नामक इत्यादी राजे झाले. १७६३ मध्ये हैदर अलीने बिदनूरचे राज्य म्हैसूर राज्यात समाविष्ट करून टाकले.

**म्हैसूर**

सतराव्या शतकात म्हैसूर राज्य शक्तिशाली होते. विजयनगर राज्याच्यावेळी

श्रीरंगपट्टण येथे तिरुमलराय नावाचा राज्य प्रतिनिधी होता. त्याच्या अधीन म्हैसूरचा राजा ओडेयर होता. यानेच पुढे तलकाडु कम्बंवाडि इत्यादी प्रदेश जिंकून तिरुणलराय याला श्रीरंगपट्टणहून हुसकून लावले. १६१० साली श्रीरंगपट्टण हाती घेऊन विजयनगरचा उत्तराधिकारी बनला. तेव्हापासूनच म्हैसूर राज्य हे कर्नाटक संस्कृतीचे एक केंद्रही बनले. विजयनगरच्या अस्तानंतर म्हैसूरचा प्रभाव आणखी-नच वाढला.

म्हैसूरच्या गादीवर कंठीरव नरसराज ओडेयर, दोड्डदेवराज ओडेयर व चिक्कदेवराज ओडेयर हे विशेष उल्लेखनीय राजे झाले. यानी म्हैसूर राज्य वाढवून बलशाली केले. चिक्कदेवराज याला ' अप्रतिमवीर ' असे म्हणतात.

याच्या पश्चात पुढील राजे तेवढे प्रभावी झाले नाहीत. तेव्हा चतुर सैनिक हैदर अली याने १७६१ साली म्हैसूरचा राज्यकारभार आपल्या हाती घेतला. हा मुत्सद्दी व न्यायप्रिय शासक होता.



टिपू सुलतान

हैदरचा मुलगा टिपू सुल्तान याने १७८२ ते १७९९ पर्यंत राज्य केले. टिपू साहसी वीर योद्धा होता. आपले राज्य हे दक्षिणेतले एक सामर्थ्यसंपन्न राज्य व्हावे अशी त्याची आकांक्षा होती व यासाठी त्याने नेपोलियनशी मैत्री जोडली होती. पण त्याला यात यश लाभले नाही. इंग्रजांशी त्याचे चार वेळा युद्ध झाले. चौथ्या वेळी त्याची राजधानी श्रीरंगपट्टण इंग्रजांच्या हाती पडली. टिपूही कामास आला. पण त्याने दाखवलेला पराक्रम अपूर्व होता. त्याला 'म्हैसूरचा वाघ' या गौरवनामाने आजही उल्लेखिले जाते.

टिपूच्या पश्चात इंग्रजांनी चामराज–आठवा याचा पुत्र कृष्णराज ओडेयर–तिसरा याला म्हैसूरच्या गादीवर बसवले. १८३१ ते १८८१ पर्यंत म्हैसूरवर इंग्रज प्रतिनिधींचे राज्य होते. १८८१ मध्ये चाम राजेंद्र ओडेयर याला राज्यावर बसवले. त्याच्या नंतर त्याच्या मातेने १८९४ ते १९०२ पर्यंत राज्य केले. १९०२ मध्ये श्रीकृष्णराज ओडेयर–चतुर्थ हा राजा झाला. याने पुष्कळच प्रजेच्या हिताची कामे केली. याच्या काळीच म्हैसूरला भारताच्या इंद्रपुरीचे स्वरूप प्राप्त झाले. हा विद्वान, उदार, न्यायप्रिय असा राजा होता.

याच्या पश्चात जयचामराज ओडेयर हा राजा म्हैसूरच्या सिंहासनावर बसला.

१९४७ साली भारत स्वतंत्र झाल्यावर म्हैसूर संस्थानही भारतीय संघ-राज्यात विलीन झाले.

भारतीय स्वातंत्र्य-लढ्यात कर्नाटकने पूर्णत्वाने भाग घेतला होता. १९२४ सालचे कॉंग्रेसचे अधिवेशन बेळगाव येथे महात्मा गांधीजींच्या अध्यक्षतेखाली भरले होते. 'कर्नाटकसिंह' गंगाधरराव देशपांडे, दिवाकर, निजलिंगप्पा, ना. स. हर्डीकर, इत्यादी कन्नड नेत्यांनी जनजागृती केली. देशासाठी कारावासही भोगला. अखेरीस स्वतंत्र भारतातील विशाल कर्नाटकचे कन्नडिगांचे मंगल स्वप्न साकार झाले !

□ □

# लोक आणि लोकाचार

कर्नाटक हा महाराष्ट्राचा जुना शेजारी असल्यामुळे कानडी माणसाबद्दल, त्याच्या देशाबद्दल व त्याच्या भाषेबद्दल मराठी माणसाला पुष्कळशी माहिती आहे. महाराष्ट्रात आजही कन्नड भाषिक गावे व लोक आहेत व कर्नाटकात मराठी भाषिक गावे व परिवार आहेत. दोन्ही प्रदेशात केवळ भौगोलिक निकटताच आहे असे नाही, तर भावनिक आत्मीयताही आहे. पुणे जिल्ह्यातील पुरंदरदासाला कर्नाटकाने आपला तुकाराम मानले. एवढे श्रेष्ठत्व दिले. आधुनिक काळात कविवर्य बेन्द्रे याना कन्नडने आपला महाकवी म्हणून गौरविले! आचार, विचार, संस्कृती याचा गाभा एकच आहे याचे दर्शन दोघानीही घेतले. कानडी—मराठी लोकात किती तरी सोयरसबंध पूर्वी झालेले आहेत, आजही होत आहेत. दोन्ही प्रदेशाच्या सीमेवरील लोक दोन्ही भाषा सफाईने बोलत असतात. कानडी माणूस मराठी बोलताना ऐकले म्हणजे त्याच्या विशिष्ट कानडी हेलामुळे तो कन्नड आहे हे चटकन लक्षात येते. सीमेलगतच्या मराठी लोकाच्या बोलण्यातही हा हेल जाणवतो. बाकी सर्वसाधारण कानडी माणसाची राहाणी, वेषभूषा, खाणेपिणे हे मराठी माणसासारखेच आहे.

कन्नड-जाती ही फार प्राचीन आहे, इतकी की हिचा संबंध 'पूर्व-द्राविडा'शी जोडला जातो. कर्नाटकात आर्यांना येऊनही शेकडो वर्षे लोटली. आर्य साहसी व व्यवहारकुशल होते. त्याच्या आचार-विचाराचा परिणाम कन्नड समाजावरही झाला. कर्नाटकात आजही प्रचलित असलेली चातुर्वर्ण्य पद्धती ही याचीच साक्ष आहे. कालातराने ह्या चार वर्णांचे स्वरूप नाना जाती व उपजाती याच्या रूपाने दिसू लागले. प्रदेश, संप्रदाय, आचार इत्यादी भेदामुळे एकाच वर्णात अनेक जातींचा उदय झाला. पंचद्रविड, पंचगौड इत्यादी ब्राह्मणामधील विभाग हे प्रदेशभेदामुळेच झालेले आहेत. याशिवाय देशस्थ, कोकणस्थ, कऱ्हाडे, तुळु, सारस्वत,

हविक इत्यादी जातिभेदही असेच निर्माण झालेले आहेत. त्यात होय्सळ, कर्नाटकी, बडगनाडु इत्यादी उपशाखाही उत्पन्न झाल्या. कर्नाटकातही कुंबार—कुंभार, कवाडिग—गवळी, चम्मार—चाभार, नेकार—कोष्टी, गाणित—तेली, चिप्पित—शिंपी, बडगि—सुतार, अक्कसाले—सोनार, कम्मार—लोहार, वर्तक—वाणी इत्यादी जाती पेशावरून निर्माण झालेल्या आहेत. धर्म-पंथ यावरूनही जातींचे वर्गीकरण केले जाते—जैन, बौद्ध, वीरशैव, माध्व, वैष्णव इत्यादी.

या जातीजमातींमध्ये उच्च-नीचतेचीही भावना आहे. जुन्या काळापासून उच्चता व नीचता ही ' बलगै ' व ' एडगै ' या शब्दांनी सूचित करण्यात येते.

या समाजात श्रुति, स्मृती, आगम, पुराण इत्यादींच्या नुसार अनेक प्रकारचे आचार-विचार प्रचलित झाले आहेत.

कर्नाटकामधील कुटुंबपद्धती ही प्रायः पितृप्रधान आहे. ज्येष्ठ पुत्र कुटुंब प्रमुख बनतो. परंतु कुरुब, बेड, वड्ड, गंग, होलेय, मादिग इत्यादी आदिम जाती-जमातीमध्ये मुलीला हा मान मिळतो. पुत्राऐवजी जमातापासून कुलपरंपरा गणली जाते.

बदलत्या परिस्थितीनुसार या जुन्या समाजाच्या चित्रातही नवीन रंग भरले गेले आहेत—जात आहेत. समाज बदलत आहे. प्राचीन काळात जाति, धर्म, संप्रदाय इत्यादींची बंधने संकुचित व कठोर नव्हती. उपजाती नव्हत्या. त्रैवर्णिकात रोटी व्यवहार चाले. बालविवाहाची प्रथा फार प्रचलित नव्हती. वैदिक, जैन व बौद्ध या धर्मांचा बोलबाला होता. परस्पर धर्माबद्दल सहिष्णुता होती. सातवाहन, कदंब व बादामीचे चालुक्य या राजांनी कर्नाटकात वैदिक धर्माला प्रोत्साहन दिले. यज्ञयाग पुष्कळ झाले.

मधल्या काळात बरेच बदल झाले, म्हणून याला क्रांतिकालच म्हणतात. या सुमारास वीरशैव व वैष्णव संप्रदायाचा विशेष बोलबाला झाला. गंग, राष्ट्रकूट, इत्यादी राजे प्रारंभी जैन होते; नंतर त्यांनी वीरशैव व वैष्णव धर्म स्वीकारला. त्याच्या प्रसाराला साहाय्य दिले. परतु मध्येच मुस्लिम धर्माची वावटळ आली. समाजावर हिचा आघात झाला. त्यानतर धर्म-संप्रदाय, आचार-विचार यांची आदोलने उभी राहिली. परिणामी परस्पर भेदभावाच्या भिंती उभ्या राहिल्या. नव्या-नव्या जाती व उपजाती निर्माण झाल्या. रोटी-बेटी व्यवहारावर निर्बंध आले. अर्वाचीन काळात या परिस्थितीतही बदल होत आहे.

गावच्या कारभारासाठी ग्रामपंचायतची प्रथा कर्नाटकात प्राचीन काळापासून आहे. ग्रामसभेत गावातील सर्व तऱ्हेचे लोक असत. त्याना 'महाजन' म्हणत असत.

मंदिराला समाजात विशेष महत्त्व असे. आजही मंदिर पवित्र मानले जाते. ते केवळ धार्मिक कार्यांचेच केन्द्र नसून संगीत, नृत्य, शिल्प आदी कलांचेही आश्रयस्थान आहे. प्राचीनकाळी मंदिरात सार्वजनिक समेलने होत असत; तिथे न्यायालय व विद्यालयही चाले.

कर्नाटकात जैन, बौद्ध, शंकर, वीरशैव आदी सर्व धर्मांचे व संप्रदायाचे मठ आहेत. धार्मिक तसे सामाजिक दृष्टीनेही याना महत्त्व आहे.

बसवेश्वरानी बाराव्या शतकात 'वीरशैव' नावाचा धर्मसंप्रदाय कन्नड भूमीत प्रतिपादन केला. तत्पूर्वी कर्नाटकात शैवमत प्रचलित होतेच, पण बसवेश्वरानी त्याचे परिष्करण करून ते नव्या स्वरूपात माडले. त्यानी वीरतेचा पुरस्कार केला. वर्णाश्रमावर टीका केली. जातीपातींचा निषेध केला. मूर्तिपूजेलाही तुच्छ ठरविले. त्याना नवसमाजाचा नेता व दुष्ट रूढीचा शत्रू मानले जाते. यानी स्त्रियानाही पुरुषाच्या बरोबरीने धर्मद्वार उघडून दिले. बसवेश्वरानी आपल्या अनुयायाना हृदयावर शिवलिंग धारण करण्याची आज्ञा दिली. शिवाच्या मानसपूजेवर भर दिला. चेन्नाबसव, अल्लमप्रभू, अक्क महादेवी, सर्वज्ञ अशी अनेक समर्थ माणसे या पंथाला लाभली. यानी कन्नडमध्ये सर्वत्र प्रचार केला. कन्नड भाषा व संस्कृती याच्या विकासात या वीरशैवाचा हविर्भाग मोठा आहे. कर्नाटकात जन्मलेला आणि कर्नाटकापुरताच मर्यादित राहिलेला असा हा पंथ आहे.

रामानुजाचार्य हे अकराव्या शतकात तमिळनाडूमधून कन्नडदेशी आले. इथे विष्णुभक्ती त्यानी रूढ केली. तेराव्या शतकात मध्वाचार्य कन्नड भूमीतच होऊन गेले. त्यानी द्वैताश्रयी विष्णुभक्ती इकडे वर्धिष्णु केली. शंकराचार्यांच्या मायावादाला विरोध करण्यासाठी वायुदेवाने मध्वाचार्यांच्या रूपात अवतार घेतला, अशी मध्व भक्ताची श्रद्धा आहे. मध्वाचार्यांना कन्नडमध्ये पुष्कळ अनुयायी लाभले. त्यानी मध्वसंप्रदाय सामान्य लोकापर्यंत नेला. माध्वमतानुयायी 'हरिदास' या नावाने आपला समूह करून कर्नाटकात सर्वत्र हिंडत असत आणि 'कीर्तने' गाऊन विष्णुभक्तीचा प्रचार करीत असत. त्यामुळे याना 'दासकूट' म्हणत असत. दासकूटाची परंपरा नरहरीतीर्थ याच्यापासून सुरू होते. व्यासराय, विजयदास, पुर-

दरदास, कनकदास हे संतकवी या परंपरेत होते. आजही भक्तमंडळीत ही परंपरा जिवंत आहे.



दसरा मिरवणूक–म्हैसूर

परक्या मुसलमानाच्या आक्रमणाची छाया कर्नाटकावर पडली ती चौदाव्या शतकाच्या सुमारास. इथली सत्ता बळकावण्याच्या इराद्याने त्याची अनेक आक्रमणे झाली. पण याचा उलटा परिणाम होऊन हिंदुधर्माच्या व राज्याच्या संरक्षणासाठी विजयनगरचे साम्राज्य निर्माण झाले. तथापि या राजानी सर्वधर्म समभावाचे धोरण ठेवले होते. बुक्करायाने जैन व वैष्णव याच्यामधला कडवटपणा व अढी दूर करण्याचे बरेच यशस्वी प्रयत्न केले होते. कपरायाने 'सर्वांनी सर्व देवता वंद्य मानव्या' असे आज्ञापत्रच काढलेले होते.

हे राजे जसे धर्मसहिष्णु होते तसेच विद्या व कलाचे रसिक भोक्ते होते. त्यामुळेच हंपी, हळेबीड, बेलूर, ऐहोळे, बादामी, श्रवणबेळगोळ इत्यादी ठिकाणची भव्य मंदिरे व शिल्पकाम आकारास आले.

दोन सहस्र वर्षांच्या कर्नाटकाच्या ज्ञात इतिहासावरून कन्नडिगाची श्रेष्ठ-प्रतीची बुद्धिमत्ता, शौर्य, कर्तृत्व व संगीत, नृत्य, चित्र, शिल्प इत्यादी ललित कलामधील त्याचे नैपुण्य याची साक्ष पटते.

बहुसंख्य कानडी लोकाचा मुख्य देव आहे पंढरीचा विठोबा. पंढरपूरचे विठ्ठलमंदिर होयसळ राजा विष्णुवर्धन यानेच बांधले आहे, असे म्हणतात. काही कानडी लोकाचे कुलदैवत जेजुरीचा खंडोबा देखील आहे. कर्नाटकची भूदेवता म्हणून सौंदत्ती जवळच्या एल्लम्म देवतेचा गौरव होतो. ही देवता डोंगरावर वसलेली आहे.

**वेशभूषा**

उत्तर कर्नाटकातील माणसाची राहाणी महाराष्ट्राला जवळची वाटावी अशी आहे, तर दक्षिणेकडली तमिळनाडूला जवळची दिसते.

कर्नाटकी पुरुष सामान्यपणे धोतर, ' पचे ', सदरा—' शरटु ', कोट, कमालु किंवा टोपी असाच पोषाख करतो. बेंगलोर-म्हैसूरकडे लुंगी— दाट्टी 'ची पद्धत विशेष आहे. फेटाही वेगळ्या धर्तीचा—विश्वेश्वरैयासारखा असतो. त्याला ' पेट्ट ' म्हणतात.

स्त्रियाचे नेसणे नऊवारी लुगडे—' सीरे ' तोळबुंदी, पाटल्या, वळे, कुड्या नत्तु, खड्याचे दागिने, नाकात ' बेसरी ', कानात ' हत्तकडकु ' कंबरपट्टा— ' ओडयाण, ' आगठी—' डंगुर, ' गळ्यात सर इत्यादी स्त्रियाची आभूषणे असतात. कन्नड स्त्रियाना फुलाचा षौकही फार आहे. त्याच्या केसात विविध तऱ्हेची फुले माळलेली दिसतात.

**खाणेपिणे**

कन्नड माणसाच्या खाण्यात भात हेच अन्न प्रामुख्याने असते. तादूळ हेच मुख्य पीक असल्यामुळे भात व तादळाचे इडली, डोसा, उत्तपम् ह्यासारखे पदार्थ करतात. तादळाची खीर व लाडू देखील करतात.

रोजच्या जेवणात भात—' अन्न ', आमटी—' हुळि ' किंवा ' साबार ',

कढी— ' सारू ', भाजी— ' पल्ल्य ', चटणी, लोणचे— ' उप्पिनकायि ', कोशिंबीर—' पच्चडि ', तूप—' तुप्प ' पोळी— ' गोदिरोट्टी ', भाकरी—रोट्टि ', इत्यादी पदार्थ असतात. जमखिंडी, विजापूर इकडील भागात ज्वारी, बाजरी, गहू ही पिके बरीच होतात. त्यामुळे त्या लोकांच्या जेवणात भाताचे प्रमाण तसे कमी असते. गव्हाची खीर, पुरणाची पोळी ही पक्वान्ने इकडे आवडीची. काही भागात तर आंबरसाबरोबर पुरणपोळी खातात. ' मांडे ' हे पक्वान्न स्वादिष्ट असते.

जेवणात चिंचेचे प्रमाण जास्त असते. सार चिंचेचेच असते. काही भागात तिखटाचा वापर जास्ती प्रमाणात केला जातो.

जेवताना केळीचे पान आडवे मांडतात. हिरव्यागार पानावर पांढऱ्या शुभ्र भाताची रास शोभून दिसते. स्वच्छही वाटते.

दूध—' हालु ', दही—' मोसरु ', ताक—' मज्जिगे ', लोणी—' बेण्णे ' इत्यादी स्निग्ध, पौष्टिक पदार्थही खाण्यात असतात.

चाली-रीती

चाली-रीती, लोकाचार याना एक परंपरा लाभलेली असते. कर्नाटकातही पारंपारिक लोकाचार आहेत.

मूल जन्मले की या चालीरीती सुरू होतात. मूल जन्मले म्हणजे भरमप्पाच्या देवळात चुरमुरे नेऊन ठेवतात. गावोगाव भरमप्पा असतो म्हसोबाप्रमाणे. हे चुरमुरे कोणी खायचे नसतात. खाल्ले तर अंग सुजते, अशी कल्पना आहे.

जातकर्म झाले म्हणजे पाचव्या दिवशी ' ऐदेशी '—पाचवीचा विधी होतो. या दिवशी रात्री कागद-लेखणी पूजा करून ठेवतात. सटवाई मुलाचे भाग्य लिहून जाते अशी श्रद्धा आहे. रात्रभर यल्लम्माचा जागर चालतो. यल्लम्मा ही कर्नाटकची आदिदेवता आहे.

बाराव्या दिवशी नामकरण विधी होतो. याला ' तोट्ल आकुदु ' म्हणतात—म्हणजे मुलाला पाळण्यात घालणे. या वेळी आप्तइष्ट जमतात. सुवासिनींना बोलावतात हळदी-कुंकू देतात. थाटाने नाव ठेवतात.

मूल वर्षा-दोन वर्षांचे झाले म्हणजे त्याचे जावळ काढतात.

सहाव्या-सातव्या वर्षी मुलाची मुंज करतात. हे सर्व विधी महाराष्ट्रातल्या विधीप्रमाणेच जवळ जवळ असतात.

मूल असताना रथसप्तमीच्या दिवशी उसाचे करवे, चुरमुरे, गाजराचे तुकडे यानी त्याला न्हाऊ घालतात. बोरन्हाण्याप्रमाणेच हा प्रकार.

**लग्नविधी**

पूर्वीच्या काळी वधू-वराची पसंती घरातील वडीलधारी माणसेच करीत असत. मुला-मुलींची वयेही लहान असत. बालविवाह सर्रास रूढ होते.

लग्न ठरले म्हणजे प्रथम बसतात ' यादी ' करायला. यादी करणे याला फार महत्त्व असते. या वेळी दोन्ही पक्षाकडची मंडळी बसून लग्नाच्या निमित्ताने देणीघेणी करणे, मानपान, हुंडा इत्यादी गोष्टीबद्दल वाटाघाटी करतात व ठरलेल्या गोष्टी यादीमध्ये मान्यवर त्रयस्थाच्या साक्षीने नमूद केल्या जातात.

लग्नाची तिथी शुभमुहूर्त पाहून ठरविली जाते. लग्न बहुधा मुलीच्या घरीच होते. त्यासाठी वरपक्षाचे वऱ्हाड वधू घरी येत असते.

सीमातपूजनापासून लग्नविधीला प्रारंभ होतो. या वेळी नवा पोशाख देऊन वर-पूजा श्वशुराकडून केली जाते. दोन्ही पक्षाकडील मंडळींचा परिचय एकमेकाना श्रीफळ देऊन केला जातो.

त्यानंतर जेवण होते. या जेवणाला ' माडे ' हे पक्वान्न असते. म्हणून याला ' माड्याचे जेवण ' असेच म्हटले जाते.

कर्नाटकात लग्नकार्यात किंवा अन्य शुभ कार्यात आळूची भाजी निषिद्ध मानलेली आहे. सणाला देखील ती करत नाहीत. मात्र, श्राद्धपक्षाला ती हवीच.

वधू-वराची अष्टाग न्हाणी, हळद लावणे, कंकण बाधणे, इत्यादी सर्व वैदिकपद्धतीचा लग्नविधी होतो. साडे-सुनमुख होते. सप्तपदी व लाजा-होम हा महत्त्वाचा विधी, लक्ष्मीपूजनानतर लग्न-सोहळा संपतो.

लग्नात-विविध विधींच्या वेळी स्त्रिया गीतेही म्हणत असतात. प्रदेश भिन्नत्वा-नुसार व जातीजमातीनुसार या विधींमध्येही थोडे फार भिन्नत्व आढळते.

**सण-समारंभ**

भारतात अन्य प्रातात जसे सण-समारंभ, उत्सव, व्रते आहेत, तसेच ते कर्नाटकातही आहेत. सण-समारंभ किंवा व्रतवैकल्ये याच्यामागे एक सास्कृतिक व सर्वस्पर्शी अशी शुभदृष्टी असते.

**उगादी पाड्वा**

कर्नाटकातील हा वर्षारंभाचा दिवस. चैत्र शुद्ध प्रतिपदेपासूनच नव-वर्ष सुरू होते. घरोघर गुढ्या उभारतात. कडू-निंबाचा मोहोर भक्षण करतात. मिष्ठान्न भोजन होते. संध्याकाळी बैलगाड्या सजतात. गावभर त्यांची ढोलेजग मिरवणूक निघते. शर्यतीही लागतात. शेतीच्या हंगामानंतरचा हा सण शेतकरीजीवनातही नवा आनंद, नवा उत्साह भरत असतो.

**चैत्रगौर**

चैत्र शुद्ध तृतीयेपासून अक्षय्यतृतीयेपर्यंत सोयीनुसार घरोघर स्त्रिया चैत्रा-गौरीचे हळदी-कुंकू-समारंभ करीत असतात. गौर सजवतात. तिच्या पुढची आरास पाहण्यासारखी असते. आंब्याची डाळ, भिजवलेले हरभरे सुवासिनींना देतात.

**वट-पौर्णिमा**

ज्येष्ठाच्या पौर्णिमेला सुवासिनी वट-सावित्रीचे व्रत करतात. दिवसभर उपास करून वटवृक्षाची पूजा करतात. सावित्रीप्रमाणे आपल्या सौभाग्याचे संरक्षण व्हावे अशी श्रद्धा असते.

**नागपंचमी**

कर्नाटकातील अत्यंत उत्साहाचा धामधुमीचा व आनंदाचा सण म्हणजे नागपंचमीचा होय. ह्यासाठी आधीपासूनच घरोघरी तयारी सुरू असते. लाह्या भाजतात, फुटाणे, डाळे तयार करतात. तंबिटाचे लाडू बनवतात. सासुरवाशिणी माहेरी येतात. घरोघर झोपाळे झुलतात. खोबऱ्याच्या वाटीच्या भिगऱ्या घेऊन मुले खेळतात. गाणी, गातात. वर्षा ऋतूचे दिवस ! निसर्गही हिरवागार, टवटवीत असतो; उत्साह भरतो.

इकडे नागपंचमी दोन दिवस साजरी होते. चवथीला स्त्रिया वारुळाला जातात. नागपूजा करून लाह्याची व चण्याची पुरचुंडी वाहतात. ही मुद्दाम वेगळी बनवलेली असते. त्यातील लाह्या-चणे कुणीही खायचे नसतात. खाल्ले तर अंगावर कोड फुटते अशी समजूत आहे. या दिवशी स्त्रिया उपवासही करतात.

पंचमीला पुरुष मंडळी नागपूजा करतात.

या सणानिमित्त घरोघर फराळासाठी चकली व लाहीपीठ केले जाते.

श्रावणी सोमवार, संपत शुक्रवार, शनिवार हे श्रावणातले वारही पाळले

जातात. प्रत्येक वाराच्या कहाण्या ऐकतात. पुरणावरणाचा स्वैंपाक करतात. संपत शुक्रवारी मृत्तीका घट कावेने रंगवतात व गौरी-म्हणून पूजतात. पुरणाची आरती करतात. आरती झाल्यावर घरातल्या मुलाबाळाना ओवाळतात आणि जी मुले बाहेर गावी असतात त्याच्या दिशेने अक्षता टाकतात. सर्वांचे मंगल, शुभ चिंतन करतात.

शनिवारी कण्या, भाकरी, अंबाड्याची भाजी असा बेत नैवेद्याला असतो.

श्रावणी पौर्णिमेला समुद्र, नदी, नाला या ठिकाणी जलदेवतेला नारळ अर्पण करतात.

**गौरी-गणपती**

भाद्रपदात सार्वजनिक गणेशोत्सवाची धामधूम असते. घरोघर गणपतीची प्रतिष्ठापना होते. सार्वजनिक ठिकाणी आरास करतात. विविध तऱ्हेचे कार्यक्रम होतात. मंत्रजागर सर्वत्र होते.

याच दिवसात गौरीचे आगमन होते. पंचपक्वान्नाचा नैवेद्य होतो. गौरीची आरासही पाहण्यासारखी असते. सुवासिनींचा हळदीकुंकू-समारंभ होतो.

अनंतचतुर्दशीला गणपतीचे विसर्जन होते. अनंताचे व्रत घेतले जाते. अनंताची पूजा सर्वत्र चालते.

**नाडहब्ब**

नवरात्राचे नऊ दिवस सर्व कर्नाटक भर ' नाडहब्ब 'चा उत्सव चालतो. हा इकडला राष्ट्रीय उत्सव मानला जातो. भुवनेश्वरी आदिमायेचे सर्वत्र पूजन होते. विजयनगरच्या साम्राज्यकाळापासून नाडहब्ब उत्सवाची प्रथा आहे. म्हैसूरच्या राजानीही ही परंपरा जतन केली. परंतु अलिकडच्या काळात कविवर्य बेंद्रे याच्या ' गेळेयर गुंपु '—मित्रमंडळाने त्यात नवीन प्राण ओतला. धारवाडला हा महोत्सव प्रथम सुरू केला, तो आता सर्व कर्नाटकातच नव्हे तर बाहेर जिथे जिथे कर्नाटकी मंडळी आहेत तिथे तिथे साजरा होऊ लागला आहे. त्यानी या उत्सवाला ज्ञान-सत्राचे व क्रीडामहोत्सवाचे स्वरूप दिले. लो. टिळकानी गणेशोत्सवाला जसे वळण दिले तसाच हा प्रकार. आता या वेळी विविध विषयावर व्यासंगी वक्त्याची व्याख्याने होतात. संगीत, नाट्य, नृत्य याचेही कार्यक्रम चालतात आणि विविध तऱ्हेच्या क्रीडास्पर्धा होतात. त्यातून किती तरी तरुण खेळाडू भाग घेतात. ' दसरा-स्पोर्टस् ' म्हणून हा क्रीडा महोत्सव विख्यात आहे.

सर्व मंदिरातून नवरात्र बसते. अखंड नंदादीप तेवतो. देव-देवतांना दहा-दिवस विविध अवतारानी सजवतात.

दसऱ्याच्या दिवशी शस्त्रपूजन, सीमोल्लंघन, मिरवणूक हा कार्यक्रम असतो. म्हैसूरचा दसरा-महोत्सव भारतात प्रसिद्ध आहे.

### दिवाळी

दिवाळी साजरी होते, पण दक्षिण कर्नाटकात विशेष नाही. नरकचतुर्दशी, लक्ष्मी-पूजन, पाडव पंचमी, भाऊबीज, अक्कन तदगी साजरी होते.

### संक्रांत

पौषात संक्रातीचा सण येतो. तिळगूळ देण्या-घेण्याची प्रथा आहे.

### शिवरात्र

शैवसंप्रदायाचा खूप मोठा प्रसार इकडे झालेला असल्याने माघात शिव-रात्रीचा दिवस सर्वत्र मोठ्या प्रमाणावर साजरा होतो. ठिकठिकाणी शंकराची यात्रा भरते. रथ-मिरवणूक निघते. उपास करतात, दुसऱ्या दिवशी शिवरात्रीचे पारणे होते.

### होळी

फाल्गुन महिन्यात होळीचा सण येतो. गावोगावी मोठ्या प्रमाणावर होळी होते. घरोघरीही होळीपूजन करतात. याशिवाय ठिकठिकाणी स्थानिक देवदेव-तांच्या जत्रा-यात्रा वेळोवेळी प्रतिवर्षी भरत असतात. त्यात बादामीजवळची बन-शंकरीची यात्रा व यल्लमाची यात्रा या विशेष प्रसिद्ध आहेत. यल्लम्माच्या यात्रेला लक्षावधी भक्त लाबलाबून येत असतात.

अशा प्रकारच्या जत्रा-यात्रानी लोकजीवनात नवा उत्साह येतो. ते आनंदी बनते.

□ □

# भाषा आणि साहित्य

कन्नड भाषा दक्षिणेतल्या चार-पाच द्राविडियन भाषापैकी एक आहे. अनेक शतकांमधून ती उत्क्रांत होत आलेली आहे. तिचे ग्रंथनिविष्ट होण्यापूर्वीचे स्वरूप प्रारंभ काळच्या शिलालेखातून दिसून येते. संस्कृत ही या देशातली अत्यंत प्राचीन भाषा. तिच्यामधून निर्माण झालेल्या भाषा या आर्य किंवा प्राकृत भाषा होत; पण त्या व्यतिरिक्त दक्षिणेतल्या तमीळ, तेलुगु, मल्याळम् व कन्नड या ज्या प्रमुख भाषा आहेत त्या खास द्राविडियन आहेत. 'तुळू' ही देखील एक त्यापैकीच भाषा असून ती कन्नडचीच एक बोली आहे. दक्षिण कर्नाटकात तुळूचा वापर केला जातो. तुळू व वरील चार भाषाना मिळून 'पंचद्राविड भाषा' असे म्हटले जाते.

कन्नड व तुळू याशिवाय 'कोडगू', 'तोड', 'कोट' व 'बडग' या बोलीही कर्नाटकात बोलल्या जातात: 'कोडगु' ही 'कूर्ग' भागात बोलली जाते. तोड, कोट, बडग ह्या नीलगिरीच्या वेगवेगळ्या भागात प्रचलित आहेत.

कर्नाटक हा कानडी भाषिकाचा देश. पाणिनीच्या सूत्रात व महाभारतात 'कर्नाट' शब्द आढळतो. विद्वानाच्या व व्युत्पत्तीकाराच्या मते कर्नाटक म्हणजे काळीभोर जमीन असलेला देश. करिनाडु शब्दावरून तो आला असावा. 'करि' म्हणजे काळी व 'नाडु' म्हणजे देश. पण काही विद्वानाचे एवढ्या व्युत्पत्तीवरून समाधान होत नाही. विजापूर वगैरे उत्तर कर्नाटकात काळीभोर जमीन आहे हे खरे, पण दक्षिणेकडे ती तशी नाही. तिथे पुष्कळच वैचित्र्य आढळते. तेव्हा 'करुनाडु'— 'उंच देश' अशीच व्युत्पत्ती ते मान्य करतात. करुनाडूचेच संस्कृतमध्ये कर्नाटक झाले. कन्नड भाषा द्राविडियन असली तरी तिच्यावर संस्कृतचा प्रभाव बराच पडलेला आहे.

ख्रिस्तपूर्व काळात केव्हा तरी तमीळ भाषा आली आणि त्यानंतर पुढे मग तिच्यापासून इतर दाक्षिणात्य भाषा निघाल्या असाव्यात. आज त्या प्रत्येकींना

स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व आहे. रचनेच्या दृष्टीने जरी तमिळ व कन्नड याच्यात साम्य असले तरी लिपीच्या दृष्टीने कन्नड व तेलुगु याच्यात साम्य आहे. बराच काळपर्यंत कानडी व तेलुगु या दोन लिपींमध्ये फारच थोडा फरक होता. या दोन्ही लिपींचा उगम अशोककालीन ब्राह्मी लिपीच्या दक्षिणी शाखेतून झालेला दिसतो. कन्नड वर्णमालेत ५२ वर्ण आहेत.

**प्राचीन काळ**

ख्रिस्त शतकापूर्वी कन्नड ही केवळ व्यवहाराची भाषा होती. पुढे हळूहळू ती शिलालेखात वापरली जाऊ लागली. पण ख्रिस्त शतकानंतर मात्र तिच्यात साहित्य-निर्मिती होऊ लागली. 'आपली भाषा प्राचीन आहे' अशा समजुतीने तिचा इतिहास लिहिला गेला नाही. पण आता पाश्चात्त्य दृष्टी व प्रमाणे उपयोगात आणल्यानंतर सुमारे पाचव्या सहाव्या शतकात कन्नड साहित्याचा प्रारंभ झालेला आहे असे मानले जाते. इ.स. ४५० चा हल्मिडी शिलालेख अत्यंत प्राचीन आहे. त्यात अळकदंब नामक राजाने विज अरस नामक व्यक्तीला दोन ग्रामे दान दिल्याचा उल्लेख आहे. शिलालेखाची भाषा संस्कृत-गर्भित आहे व तिच्यात केवळ वीस कन्नड शब्द आहेत.

इ. स. ७०० मधील बादामीतल्या शिलालेखात संस्कृत व कन्नड शब्द समसमान आहेत. शिवाय 'त्रिपदी' हा कन्नडचा वैशिष्ट्यपूर्ण छन्दही वापरलेला आहे.

याच सुमाराच्या श्रवणबेळगोळच्या शिलालेखातील भाषा प्राचीन कन्नड 'पूर्वद हळगन्नड' आहे.

या शिलालेखातून साहित्य नाही, परंतु साहित्यनिर्मितीची शक्ती कन्नड-मध्ये त्या वेळी निर्माण होत होती, असे दिसते.

त्यानंतर नवव्या शतकात लिहिला गेलेला 'कविराजमार्ग' हा एकमेव कन्नड ग्रंथ उपलब्ध आहे. हा नृपतुंग राजाने लिहिला असे म्हणतात, पण त्याच्या दरबारी असलेल्या श्रीविजय कवीने तो लिहून आपल्या आश्रयदात्याच्या नावाने प्रसिद्ध केला असे एक मत आहे. हा ग्रंथ अलंकारशास्त्रावर आहे. याचा अर्थच असा की यापूर्वी कन्नड काव्य—साहित्य निर्माण झालेले होते. याच ग्रंथात पूर्ववर्ती कवींची व गद्य लेखकाचीही नावे उल्लेखिली आहेत—

> **विमलोदय नागार्जुन**
> **समेत जयबंधु दुर्विनीतादिगळी।**

**क्रमदोळ् नेगळ्दिच गद्या**
**श्रमपद गुरुताप्रतीत केयुकोंडर ॥**

—विमल, उदय, नागार्जुन, जयबंधु व दुर्विनीत हे कन्नडचे प्रसिद्ध गद्य लेखक होते आणि—

**परस श्रीविजय कवी—**
**श्वर पण्डित चन्द्रलोकपाला दिगळा ।**
**निरतिशय वस्तु विस्तर**
**विरचने लक्ष्यं तदाद्य काव्यकेंदुम् ॥**

— श्रीविजय कवीश्वर, पाणित, चद्र व लोकपाल हे कवींमध्ये प्रसिद्ध होते. परंतु याचे साहित्य उपलब्ध नाही.

'दुर्विनीत' नावाचा जो उल्लेख आहे तो गंग राजा होता. तो विद्वानही होता. त्याचा राज्यकाल इ. स. ४७८ ते ५१३ पर्यंत मानला जातो. 'अवन्ती सुंदरीकथासार' नामक ग्रंथावरून कळते की सस्कृतचा प्रसिद्ध कवी भारवी हा दुर्विनीत राजाच्या दरबारात काही काळ होता. दुर्विनीत राजाने 'शब्दावतार' नावाचा व्याकरण ग्रंथ ग्रंथसस्कृतमध्ये लिहिला होता. त्याने गुणाढ्याच्या बृहत्कथेचे संस्कृत रूपातर 'वड्डकथा' त्यानेच केले होते, असे मानतात. याने कन्नडमध्येही ग्रंथरचना केली होती, पण ती उपलब्ध नाही.

'कविराजमार्ग'च्या लेखकाने 'कन्नड रामायणा'तील काही श्लोक उद्धृत केले आहेत. याचाच अर्थ असा की त्यापूर्वी कन्नड रामायणाची रचना झाली होती. ते रामायणही उपलब्ध नाही. 'कविराजमार्ग' या ग्रथाच्यापूर्वीच अलंकार व व्याकरणग्रंथही कन्नडमध्ये रचले गेले होते.

**'रन्नं वैयाकरण, जन्नंमेण् कवियोळगे वैयाकरणम् ।'**

— रन्न व्याकरणकार आहे, तर जन्न कवींमध्ये व्याकरणकार आहे, अशी ही उक्ती प्रसिद्ध आहे. यावरून हे सिद्ध होते की, तत्कालीन कवी केवळ काव्यशास्त्रातच पारंगत नव्हते तर व्याकरणशास्त्राचेही चागले ज्ञाते होते.

कन्नड साहित्याच्या विकासाच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे कालखंड मानण्यात येतात—

| | |
|---|---|
| (१) पंपपूर्व युग | (इ. स. ९५० पर्यंत) |
| (२) पंपयुग | (इ. स. ९५० ते ११५०) |

( ३ ) बसवयुग (इ. स. ११५० ते १५०० )
( ४ ) कुमारव्यासयुग (इ. स. १५०० ते १९०० )
( ५ ) आधुनिक युग (इ. स. १९०० च्या पुढे )

पंपपूर्व युगातील ' कविराजमार्ग ' ग्रंथाचा उल्लेख झालाच आहे. ' चंपू ' ह्या वाङ्मयप्रकाराचाही उल्लेख त्यात आढळतो.

जैन धर्माचा उदय झाल्यावर जैन साधूंना त्यांची धर्मतत्वे लोकभाषेत मांडावयाची होती, म्हणून त्यांनी कन्नड भाषेत बरेच कथा व नीतिवाङ्मय निर्माण केले.

**पंप-युग**

दहा ते बाराव्या शतकापर्यंतचा काळ म्हणजे महाकाव्याचा काल होय. यालाच ' चंपु-काव्य-युग ' म्हणतात. या काळात प्रामुख्याने पंडिती थाटाची रचना झाली. त्यामुळे या काळात व्यासंगही खूप वाढलेला होता.

महाकाव्य काळातला पहिला कानडी कवी म्हणजे ' पंप ' होय. हा जैन धर्माचा अभिमानी होता, पण याने वैदिक संस्कृतीचे सार घेऊन ' पंप भारत ' लिहिले आहे. याचे व्यक्तित्व फारच समतोल असले पाहिजे, कारण त्याचा ग्रंथ वाचल्यावरही तो जैन होता असे वाटत नाही. आपल्या सहजसुंदर काव्याने याने कन्नड काव्य-क्षितिज उजळून टाकले. पंप हा कन्नडचा आद्य कवी मानला जातो. चंपू काव्याचा जनकही हाच समजला जातो. ' सत्कवी ', ' महाकवी ' म्हणून याचा गौरव केलेला आहे. पंप कवीचे अनुकरण पुढे अनेकांनी केले. इ. स. ११०० मध्ये नागचंद्र कवीने ' रामचंद्र चरिते पुराण ' नामक रचना करून पंप-शैलीचे अनुकरण केले. तो स्वतःला ' अभिनव पंप ' म्हणवून घेत असे. तेलगूचा आदि कवी नन्नय भट्ट हा देखील पंपाची रचना पाहून मुग्ध झाला व असे म्हणतात की, ' पंप भारत ' पाहूनच याने तेलगूत महाभारत लिहिण्याचा संकल्प केला.

पंपाने ' आदिपुराण ' रचले. यात आदि तीर्थंकराचे चरित्र त्याच्या पूर्व-जन्मकथेसह लिहिलेले आहे. याच ग्रंथात, ' कर्मामुळे व गुणामुळे चातुर्वर्ण्य असेल, पण मूलतः मानव एकच आहे ' असे वचन आढळते. हजार वर्षांपूर्वी असे सांगणारा कवी केवढा द्रष्टा होता हे यावरून कळून येते. कन्नड साहित्यात हजारो ' वचने ' आहेत. त्यापासून पुष्कळच स्फूर्ती मिळते.

पंपाने ' विक्रमार्जुन विजय ' नामक काव्य लिहिले आहे. ' कविता गुणार्णव',

' प्रसन्न गम्भीर वचनरचनचतुर पुराण कवि ', ' सुकविजनमनो मानसोत्तन्सहंस ', ' सरस्वती मणिहार ' आदी पदव्यानी त्याला गौरविले आहे.

पंप अरिकेसरीच्या दरबारी होता. याचे गुरु देवेन्द्रमुनी होते. त्याची स्तुती श्रवणबेळगोळच्या एका शिलालेखात ' भारतीभाळभद्र ' म्हणून केलेले आहे.

यानंतर ' पोन्न ' नामक कवी उल्लेखनीय आहे. याने ' शातिपुराण ' लिहिले. याखेरीज ' भुवनैक रामाभ्युदय '— रामकथा, व ' जिनाक्षर— ' माले ' अशा आणखी दोन रचना पोन्न कवीच्या आहेत. पोन्नने सस्कृत रचना केली होती असेही मत आहे. याला अनेक पदव्या होत्या, त्यात ' कुरूळ गळ सवण '—' रसिक यति ' अशी एक होती !

पंप, पोन्न व रन्न या कवींना ' रत्नत्रय ' म्हणत असत. पोन्न नंतर रन्न हा विख्यात कवी झाला. याने ' अजितपुराण ', ' गदायुद्ध ' व ' रत्नकंद ' अशा तीन रचना केल्या. ' गदायुद्ध ' हे रन्नाचे काव्य श्रेष्ठ प्रतीचे मानले जाते. याला ' कृति-रत्न ' असेही नाव आहे.

दहाव्या शतकातील साहित्यकारात ' चावुडराय ' हा प्रमुख आहे. हा कवी आणि वीर होता. गंग राजा राचमल्ल याचा मंत्री होता. याला वीर मार्तंड देव अशी उपाधी होती. हा जैन धर्मी होता. यानेच गोमटेश्वराची भव्य मूर्ती घडवून घेतली. याची ' चावुण्डरायपुराण ' नामक रचना प्रसिद्ध आहे. हा गद्यग्रंथ आहे. प्राचीन ' वड्डाराधने ' या गद्यग्रथानतर याचाच उल्लेख होतो. यात चोवीस तीर्थं-कर आदी त्रेसष्ट शलाकापुरुषाची वर्णने आहेत.

यानतरचा कवी म्हणजे ' नागवर्मा—प्रथम ' याच्या ' कर्नाटक कादंबरी ' व ' छन्दोम्बुधि ' अशा दोन रचना प्रसिद्ध आहेत. याने आपल्या काव्यात वीररसा-बरोबर श्रृंगार रसाचाही उपयोग केला आहे; हे याचे वैशिष्ट्य मानतात.

इ. स. १०३० मध्ये ' दुर्गसिंह ' कवी झाला. चंपू शैलीत याने ' पंचतंत्र ' अनुवादिले. ' चन्द्रराज ' नावाचा कवी याच सुमारास झाला. ' मदन तिलक ' नावाची याची रचना प्रसिद्ध आहे.

श्रीधराचार्यांचा ज्योतिष शास्त्रावरचा ' जातक तिलक ' ग्रंथ १०४९ मधील असून फार प्रसिद्ध आहे. ' सुकुमार चरित्र ' हे चंपूकाव्य लिहिणारा ' शातिनाथ ' कवी १०६८ च्या सुमारास होऊन गेला. याला ' सरस्वती—मुखमुकुटम् ', ' सहज कवि ', ' चतुर कवि ' अशा गौरवउपाधी होत्या.

यानंतर -नागवर्माचार्य, नागचंद, धनसेन, ब्रह्मशिव, कर्णपार्य, दुसरा नागवर्मा हे विशेष कवी होऊन गेले. 'कंति' नामक पहिली कन्नड कवियित्रीही याच काळात झाली. 'कान्ति-हंपनसमस्येगळु' म्हणजे 'कंतिहंप समस्या' नावाची काही पदे उपलब्ध आहेत.

या काळाला 'चंपू-काव्य-काल' असेही म्हटले जाते.

**बसवयुग**

बाराव्या शतकाच्या मध्यकाळास 'बंडयुग' किंवा 'बसवयुग' असे



बसवेश्वर

म्हणतात. 'पूर्वभक्तिकाल' असेही म्हटले जाते. कारण या काळात 'जेडर दासिमरद', 'शंकर दासिमय्य', 'मेरे मिण्डय्य' 'सकलेशमादरस', 'अल्लम प्रभु', 'बसवेश्वर', 'अक्क महादेवी', 'चेन्नबसव', 'सिद्धराम' इत्यादी संतकवी किंवा 'वचनकार' होऊन गेले. यांची हजारो 'वचने' कन्नडमध्ये उपलब्ध आहेत. वचनवाङ्मय हे साधे, पण प्रभावी कन्नड गद्य आहे. बसवेश्वराची

वचने उत्कृष्ट आहेत. सरळ सोप्या भाषेत त्यांनी उपदेश दिला आहे. उपनिषदातील सारतत्त्व त्यात उतरलेले आहे. मानवतेची शिकवण त्यानी प्रभावीपणे दिली आहे—

लोकद डोंकु नीवेके तिद्दुविरि ?
निम्म निम्म तनुव संतैसिकोळ्ळि ।
निम्म निम्म मनव संतैसिकोळ्ळि ॥

—लोकाचे वाकडेपण तुम्ही कशाला दूर करता ?
आपआपले तन, आपआपले मन सुधारा !

देवलोक मर्त्यलोकवेंबुद बेरिल्लकाणभो ।
सत्यव नुडिवुदे देवलोक । मिथ्यव नुडिवुदे
मर्त्यलोक । आचारवे स्वर्ग । अनाचारवे नरक ॥

—देवलोक, मर्त्यलोक हे काही नाही बंधु, सत्य बोलणे हाच देवलोक आहे. असत्य बोलणे मर्त्यलोक आहे. आचार हाच स्वर्ग आहे. अनाचार हाच नरक आहे !

बसवेश्वर क्रांतिकारी होते. जातीपातीस त्याचा कट्टर विरोध होता.

अक्कमहादेवी ही भक्त कवियित्री बसवेश्वराच्या समकालीन होती. 'उडतडी' नावाच्या गावी ११६० च्या सुमारास ती होऊन गेली. हिची 'वचने' म्हणजे कन्नड साहित्याचा अलंकार होय ! तिने 'सती-पतिभाव' आपल्या रचनेतून चित्रित केला आहे. 'लिंग ( परमात्मा ) हा पती व शरण ( भक्त ) ही सती' हा तिचा संदेश आहे.

'अय्या नी केळिदरे केळु केळदिद्देडे माणु,
नानिन्न हाडिदल्लदे सैरिसलारनय्य । '

—स्वामी ! तुम्ही ऐका न ऐका, मी तुमची गीते गायल्याशिवाय राहू शकत नाही !

एका वचनात तिने म्हटले आहे की, 'पर्वताच्या शिखरावर घर बांधून रानटी प्राण्याना भिण्यात काय अर्थ आहे ? समुद्रकिनाऱ्यावर घर बांधून लाटांच्या आवाजाला व फेसाला कशासाठी भ्यायचे ? बाजारात घर बांधून गजबजाटाला कंटाळून कसे चालेल ? या जगात जन्मल्यावर स्तुती आणि निंदा ऐकून शांतच राहिले पाहिजे !'

अल्लमप्रभु हा ज्ञानेश्वराप्रमाणे मोठा ज्ञानी भक्त होता—

**' नानु घन तानु घनवेंब हिरियरुण्टे ?**
**जगदोळगे हिरियर हिरितनदिंदेनाय्तु ?**
**हिरिदु किरिदेंब शब्दवडगिदरे आतने शरण गुहेश्वरा । '**

—मी मोठा, मी मोठा म्हणणारे काय मोठे असतात? अशा मोठ्यांच्या मोठेपणाने या जगात काय झाले आहे?

ज्याच्यामध्ये लहान-मोठा हा भेदभाव नाही, तोच भक्त मोठा, हे गुहेश्वर! ' गुहेश्वरा ' हे संबोधन याच्या प्रत्येक वचनाच्या शेवटी येते!

चेन्नबसव हा बसवेश्वराचा भाचा होता. अल्लमप्रभुने याला ' महाज्ञानी ' म्हटले आहे. याने वीरशैव धर्माचे पुष्कळ कार्य केले. ' षटस्थल वचन ', ' करुणा-हसुगे ', ' मिश्रार्पण ' व ' कालज्ञान ' या याच्या रचना प्रसिद्ध आहेत.

आणखी पुष्कळ वचनकार कन्नडमध्ये होऊन गेले. श्रेष्ठ विचार सामान्य जनापर्यंत त्याना पटतील अशा भाषेत सांगण्याची पद्धती कन्नड वचन–साहित्यात आहे.

' हरिहर ', ' राघवांक ', ' केरेय पद्मरस ', ' नेमिचंद्र ', ' रुद्रभट्ट ', ' पाल्कुरिके सोमनाथ ', ' अग्गळ ', ' आचण्ण ', ' बंधुवर्मा ', ' देवकवी ', 'पार्श्व पंडित', ' सोमराज ', ' गुणवर्मा द्वितीय ', ' कमलभव ', ' आण्डय्य ', ' मल्लिकार्जुन', इत्यादी ' प्रबंध काव्य ' लिहिणारे कवी या काळात होऊन गेले.

त्याचप्रमाणे ' उदयादित्य ', ' कविकाम ', ' केशिराज ' हे रीतिग्रंथकार –कवी झाले. ' रट्टकवी 'ने ' रट्टमत ' ग्रंथ रचला. या काळात प्रबंधकाव्याव्यतिरिक्त रीतिसाहित्य व वचनसाहित्य याचाही विकास झाला. ' दाससाहित्य ' अथवा वैष्णव भक्तिसाहित्याचा प्रारंभही याच काळात झाला. एक प्रकारे हा ' जागरण काल 'च मानतात.

**कुमारव्यास युग**

पंधरा ते एकोणीस शतकापर्यंतच्या कालखंडाला ' कुमारव्यास युग ' म्हणतात. या काळात कर्नाटक राजकीय व सांस्कृतिक दृष्ट्या अत्यंत उन्नतशील झाला. पण उत्तरार्धात अवनतीही तेवढीच झाली.

विजयनगरचे साम्राज्य या काळात उत्कर्ष पावले होते. साहित्यकलेला प्रोत्साहन मिळाले. हे युग विशुद्ध ' देसिकाव्य '– कन्नड शैलीचे– मानले जाते.

विपुल साहित्यरचनाही या काळात झाली. विजयानगर, म्हैसूर येथील व अन्य राजांनी जरी आश्रय दिला होता तरी एकंदरीने विशेष रीतीने लोकच साहित्याकडे आकृष्ट झाले होते. वैष्णव साहित्याचा विकास याच काळात झाला.

वैष्णव साहित्याचा प्रारंभकर्ता म्हणून महाकवी कुमारव्यास याचे नाव घेतले जाते. कन्नड भक्तिसाहित्यामध्ये याचे स्थान श्रेष्ठ आहे. याच्या संबंधी अधिकृत अशी माहिती उपलब्ध नाही. जनश्रुतीनुसार याचे नाव नारणप्प होते. याने कन्नड महाभारत लिहिले म्हणून याला ‘ कुमारव्यास ’ म्हटले जाऊ लागले. ह्याच्या रचनेत द्वैत-अद्वैत–विशिष्टाद्वैत व भक्तिमार्ग, कर्ममार्ग आणि ज्ञानमार्ग अशा सर्व विचाराचा समावेश आहे.

कवीने आपल्या रचनेला ‘ कर्णाट भारत कथा मंजरी ’ असे नाव दिले आहे. याची अन्य लोकप्रिय नावे आहेत–‘ कुमारव्यास-भारत ’, ‘ भारतकथे ’, ‘ गदुगु भारत ’ व कन्नड भारत ’. हा महान भगवत् भक्त असल्यामुळे याच्या महाभारताचा नायक श्रीकृष्ण आहे.

कुमारव्यासाच्या महाभारताने प्रभावित होऊन कुमार वाल्मिकीने भामिनी षट्पदि छंदात ‘ तोरवे रामायण ’ व ‘ मैरावणन काळग ’ अशी दोन काव्ये लिहिली. याचे मूळ नाव नरहरी होते. विजापूरजवळच्या तोरवे येथे याचे वंशज आहेत. ‘ तोरवे रामायण ’ हे वाल्मिकी रामायणाचा कन्नड अनुवाद आहे. हा भक्तकवी होता.

श्रीकृष्णदेवरायाच्या दरबारी तिम्मण कवी होता. याने कुमारव्यास-भारताची उरलेली पर्वे लिहून पूर्ण केली. याने आपल्या ग्रंथाला ‘ कृष्णराय भारत ’ असे नाव दिले. श्रीकृष्णदेवराय हे ‘ कन्नडराज्यरमारमण ’ होते. त्यांनी आपल्या राज्यात कन्नड व तेलुगु दोन्ही भाषांना आदराचे स्थान दिले. तिम्मण कवी दोन्ही भाषात रचना करत असे. त्याला ‘ कर्णाटक कविकुल सार्वभौम ’ अशी पदवी होती.

चाटुविठ्ठलनाथ कवीने श्रीमद्भागवताचा कन्नड अनुवाद केला.

कन्नड ‘ जेमिनी भारत ’ कवी लक्ष्मीश याने लिहिले. हा सोळाव्या शतकात होऊन गेला. याला ‘ कर्णाट कविचूतवनचैत्र ’ व ‘ नादलोल ’ अशा पदव्या लाभल्या होत्या.

गोप व नागरस हे दोन उल्लेखनीय भक्तकवी या काळात झाले.

स्वामी नरहरितीर्थ याच्यापासून ‘ दाससाहित्याचा ’ प्रारंभ मानतात. या काळात श्रीपादराय, व्यासराय, पुरंदरदास व कनकदास याच्यासारखे श्रेष्ठ कवी

झाले. त्यामुळे दाससाहित्य विपुल निर्माण झाले. व्यासराय, पुरंदरदास व कनकदास हे दास साहित्यातील त्रिरत्न आहेत. त्यांच्या शिष्यपरंपरेत अनेक दास पुढे झाले व त्यांनी आपल्या वाणीने हे साहित्य लोकप्रिय केले.

पुरंदरदास हे कर्नाटकचे महान संत, हे जन्मले महाराष्ट्रात. पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धात, १४८४ मध्ये पुणे जिल्ह्यातील पुरंदर येथे त्यांचा जन्म झाला. पुरंदर-सासवड ही पंढरीच्या वाटेवरच येतात. पुरंदरदास महान भगवद् भक्त बनले. नामदेव, तुकाराम आदि संतांप्रमाणेच पुरंदरदासही हरीनामाचा महिमा गाणारे संत होते. नामस्मरणावर त्यांची विलक्षण गाढ श्रद्धा होती.

**ओंदे नामदलडगिदवो, आनंददिंद श्रुतिय आखिल वेदगळु ।**

या पदात त्यांनी आपली नामनिष्ठा व्यक्त केली आहे. ते म्हणतात—' केवळ एका हरिनामामध्ये आनंदरूप अशा सर्व श्रुतींचे व शास्त्रांचे सार साठविलेले आहे. ध्रुव, प्रल्हाद, अजामिळ या भक्तांचा उद्धार एका नामस्मरणानेच झाला. त्रिभुवनाला आधारभूत असे नामच आहे. अष्टादश ग्रंथ व मत्स्य, कच्छ आदी दशावताराचे सार देखील केवळ एक ' नाम ' आहे. संसारपीडितांना विरंगुळा देणारेही विश्वव्यापक असे हरिनामच आहे. म्हणून हे मनुजा ! भावशुद्ध अंतःकरणाने पुरंदर विठ्ठलाच्या चरणाचे अहर्निश चिंतन कर!'

कर्मकांडाचे अवडंबर पुरंदरदासांनीही धिक्कारले आहे.

**' स्मरणे वोंदु सालदे, गोविंदन**
**नाम वोंदु सालदे । '**

या गीतात ते म्हणतात, ' हे नरा, निष्कारण कर्म मार्गाचे अवडंबर माजविण्यापेक्षा करुणासागर अशा गोविंदाचे अखंड नामस्मरण कर; तेवढेच पुरे ! '

पुरंदरदासांनी नित्य भ्रांत अशा



संत पुरंदरदास

मनाला, त्याच्या चंचल लीलाना उद्देशून उपदेश केला आहे.

'ई शरीरद भ्रांति इन्नेके मनवे ?'

या गीतात ते म्हणतात—'हे मना, तू या देहावर इतका का मोहित झाला आहेस ?'

पुरंदरदासानी सुमारे साडेचार लक्षावर पद्यरचना केली असे म्हणतात. त्यानी लिहिलेले द्रौपदीवस्त्रहरण, सुदामचरित्र, परतत्त्वसार हे ग्रंथ व काही पदे अप्रकाशित आहेत. 'पुरंदरदासर कीर्तने' या शीर्षकाखाली त्याची काही पदे प्रसिद्ध झालेली आहेत. 'सळादि' म्हणूनही वरीचशी तत्त्वज्ञानात्मक रचना पुरंदरदासानी केली आहे.

पुरंदरदास जसे थोर सत होते तसेच ते श्रेष्ठ संगीततज्ज्ञही होते. 'कर्नाटक सगीता'चे जनकत्व पुरंदरदासानाच दिले जाते. संत, कवी व गायक असा त्रिवेणी संगम त्याच्या ठायी झालेला होता. आपल्या मधुर वाणीने पदरचना गाऊन त्यानी कर्नाटकात सर्वत्र भक्तीचा मळा पिकवला. कीर्तनाच्या द्वारे यानी दाक्षिणी संगीताला शास्त्रीय स्वरूप दिले. निरनिराळ्या राग-रागिण्याची खुमारी किंवा राग-सौंदर्य याची रसिकाना प्रचीती द्यावयाची असेल तर पुरंदरदासानी प्रचलित केलेली कीर्तनपद्धती आजही उपयुक्त मानली जाते. मराठी संताची रचना जशी 'तुका म्हणे', 'नामा म्हणे' अशा मुद्रेने शेवटी अंकित झालेली असते, तशीच याची पदे 'पुरंदर विठ्ठल' या नाममुद्रेने पूर्ण होतात.

सोळाव्या शतकातील वैष्णवभक्त कवीमध्ये कनकदासाचा उल्लेख आदराने करण्यात येतो. बाडव नावाच्या गावात एका धनगराच्या घरी याचा जन्म झाला. एका लढाईच्या प्रसंगी या संसारातील असारता पाहून हे विरक्त बनले. व्यासरायाचे शिष्यत्व पत्करले. पुरंदरदास व कनकदास हे दोघे सहपाठी—वर्गबंधू होते असे म्हणतात. 'कागिनेले' येथे कनकदासानी 'आदिकेशव' मंदिर उभारले. आदि-केशव हा त्याचा इष्टदेव. त्यामुळेही कनकदासाच्या कीर्तनात—पदात—'आदिकेशव' हे नामांकन आढळते. 'मोहन तरंगिणी', 'हरिभक्तिसार', 'रामध्यान चरित्रे', 'नळचरित्रे' व फुटकळ पदे अशी याची रचना प्रसिद्ध आहे.

याच्याशिवाय वादिराजतीर्थ, जगन्नाथदास, चामरस, निजगुणशिवयोगी, विरूपाक्ष पंडित, रत्नाकरवर्णी, षडक्षरदेव, तिरुमलार्य, चिक्कुपाध्याय, सिगराय,

संचिय होन्नम्मा, देवचंद्र कृष्णराज तृतीय, केंपुनारायण, मुद्दण, इत्यादी थोर साहित्यकार होऊन गेले.

यात ' सर्वज्ञ ' कवीचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. सोळा—सतराव्या शतकाच्या मध्ये हा होऊन गेला. हा खराखुरा ' जनकवी ' होता. संत कबीराना हिंदी साहित्यात जे स्थान आहे, तेच सर्वज्ञाला कन्नड साहित्यात आहे. याच्या चरित्रसंबंधी निश्चित माहिती उपलब्ध नाही. सर्वज्ञाची रचना ' वचनगळु ' म्हणून प्रसिद्ध आहे. याने त्रिपदी छंदाचा उपयोग समर्थपणे केला आहे. हा खास कानडी छंद आहे. सर्वज्ञाच्या त्रिपदीचे हे काही नमुने—

**आ देव ई देव मादेववेनबेड**
**आ देवर देव भुवन प्राणिगळि-**
**गाडवने देव सर्वज्ञ ।**

—ईश्वर माझा-तुझा नाही, तो सगळ्या प्राण्याचा आहे; सृष्टिकर्ता आहे. सृष्टीतील वैचित्र्य हे ईश्वराच्या कलेचे द्योतक आहे. ईश्वरासारखा अन्य कोणी शिल्पी वा कलाकार नाही.

**कल्लु कल्लने ओट्टि कल्लिनलि मनेकट्टि**
**कल्लमेल कल्ल कोळुव मानवरेल्ल**
**कल्लिनंतहरु सर्वज्ञ ।**

—दगडाचे मंदिर बाधून त्यात दगडाचीच मूर्ती स्थापणारा माणूस स्वतःच एक दगड ठरेल.

इ. स. १९००च्या पुढे आधुनिक युग सुरू होते. या काळाचे १९०० ते १९२०, १९२० ते १९४३ व १९४३ नंतरचा काळ असे तीन कालखंड काही जण कल्पितात. पहिल्या कालात आधुनिक कन्नड साहित्याचा अरुणोदय झाला. या २०-२५ वर्षांच्या काळात वर्तमानपत्री वाङ्मय, भाषांतरे व आधारित स्वरूपाचे लेखनच प्रामुख्याने झाले. ' मुद्रामंजुष ' या श्री. केंपुनारायण याच्या ग्रंथाने आधुनिक गद्यवाङ्मयाचा उदय झाला. या काळात बी. रामराव, आल्दूर, मुदविड्डु, मुळिये तिम्मप्पय्य, पजे मंगेशराव, एस. जी. नरसिंहाचार्य याच्यासारखे लेखक, एस् किट्टि, शांतकवि, एच्. नारायणराव, ' श्री—' बी. एम्. श्रीकंठय्या याच्या सारखे कवी आणि केरूर याच्यासारखे नाटक, कथा व कादंबरीकार ह्याचे साहित्य प्रसिद्ध झाले. १९२० च्या पुढचा काळ नव–जागरणाचा आहे. असह-

कारितेच्या चळवळीपासून राजकारण सामान्य माणसापर्यंत पोचले. तरुण पिढी-समोर नवा आदर्श दिसला. काही तरी नवे करण्याची प्रेरणा निर्माण झाली. यातूनच अनेक मौलिक प्रयत्न झाले. गद्यप्रकारात विविध शैलींचा विकास झाला. ' भावगीते ' अथवा ' गीतिकाव्य ' हा प्रकार सफल समृद्ध बनला. साहित्याची चौफेर उन्नती झाली व त्या द्वारा आधुनिक लोकजीवन अभिव्यक्त करण्याचा यशस्वी प्रयत्न घडला. या काळाला काही समीक्षकानी ' स्वर्णकाल ' म्हटले आहे. या काळातील लेखकामध्ये सर्वश्री मास्ती, गुण्डप्पा, श्री. पुट्टप्पा, व्ही. सीतारामय्या, द. रा. बेन्द्रे, राजरत्नम, मधुर चेन्न, रं. श्री. मुगळी, आदींचा उल्लेख विशेषत्वाने होतो. तिसरा १९४३ चा काळ हा पुनर्जागरणाचा काळ मानला जातो. नव-विचाराचा व आदोलनाचा प्रभाव ह्या काळातील साहित्यावर दिसतो. नवनवीन प्रयोग झाल्याचेही आढळते. अलिकडील कवितेला ' नव्य कविते '— नवकाव्य— म्हटले जाते.

आधुनिक काळात बी. एम्. श्रीकंठय्या याना केवळ ' श्री ' असेही म्हण-तात. यानी ' इंग्लिष गीतगळु 'ची रचना केली. त्याच्या पूर्वीही काहींनी शेक्सपीयर, मिल्टन, वर्डसवर्थ याच्या कविताचे कन्नड अनुवाद केले होते. ' श्री ' हे आधुनिक निर्माणशील वाङ्मयाचे अग्रणी म्हणावयास हरकत नाही. कर्नाटकाच्या एकीकर-णाच्या दृष्टीने भारतीय भूमिकेशी एकनिष्ठ राहून यानी कानडी अस्मिता जागृत केली. ' अश्वत्थामन ' ( नाटक ), ' पारसीकरु ', ' होगनसु गळु ', ' गदायुद्ध रुपक ' ( संग्रह ), ' इस्लाम संस्कृती ', ' कन्नडमातु तले येत्तुव बगे ', ' कन्नड कॅपिडी ' ( साहित्य—इतिहास ), ' भाषणगळु मत्तु लेखनगळु ' ( भाषण व निबंधसंग्रह ) इत्यादी त्याचे साहित्य प्रसिद्ध आहे.

' गेळेयरगुंपु ' ( मित्रमंडळ ) ची स्थापना करून द. रा. बेंद्रे ऊर्फ अंबिका-तनय दत्त यानी कन्नड काव्यात अर्वाचीनता आणली. बेंद्रे हे भावना व विचारसंपन्न कवी आहेत. त्याच्या काव्याने सर्व रसिकाचे लक्ष वेधून घेतले. गेळेयरगुंपुमधूनच अलिकडील कन्नडकाव्य उदयास आले.

' मुगिल—मल्लिगे ', ' उत्तरायण ', ' नमन ', ' संचय ', ' हृदय—समुद्र ', ' मुक्तकंठ ', ' सखी—गीत ', ' गंगावतरण ', ' नादलीले ', ' ' यक्ष-यक्षि ', ' अरळु—मरळु ', इत्यादी बेंद्रे यांची काव्यसंपदा प्रसिद्ध आहे.

पुटप्पा यानीही कन्नड कविता समृद्ध केली आहे. याचे वीस बावीस कविता-

संग्रह प्रसिद्ध आहेत. ' कोळलु ', ' नविलु ', ' कलासुंदरी ', व ' षोडशी ' या काव्यांतून पुटप्पा निसर्गकवी म्हणून दिसतात. ' प्रेमकाश्मीर ' मध्ये प्रणयगीते आहेत. ' पाक्षिकाशि ', ' किंकिणि ' व ' अग्निहंस ' मध्ये तात्त्विक स्वरूपाच्या कविता आहेत.

कन्नड कादंबरीचा प्रारंभ बी. वेंकटाचार व गळगनाथ यानी केला आहे. बंगाली कादंबरीकार बंकिमचंद्र व मराठी कादंबरीकार हरी नारायण आपटे याच्या कादंबऱ्याचा प्रभाव याच्यावर पडला होता. नंतरच्या काळात पुट्टण्णा, केरूर, य. गु. कुलकर्णी, पंजे मंगेशराव, अ. न. कृष्णराव हे कादंबरीकार पुढे आले. अ.न. कृष्णराव यानी सुमारे ३४ कादंबऱ्या लिहिल्या. पुट्टप्पा याची ' कानूरु सुब्बम्म हेग्गडति ' ही पर्वतीय प्रदेशातील जीवनावरील कादंबरी प्रसिद्ध आहे. सामाजिक कादंबरीकार म्हणून शिवराम कारंत विशेष प्रसिद्ध आहेत. ' कन्यावलि ', ' मरळिमण्णिगे ', ' बेट्टद जीव ' इत्यादी त्याच्या कादंबऱ्या लोकप्रिय आहेत. गोकाक, मुगळी, श्रीरंग, श्रीनिवास मूर्ती इत्यादी सफल कादंबरीकार झाले. के. वी. अय्यर याची ' शातला ' नामक ऐतिहासिक कादंबरी महत्त्वपूर्ण कलाकृती मानली जाते.

कन्नड कथासाहित्याचे जनक म्हणून मास्ती वेंकटेश अय्यंगार याना मानले जाते. मास्तींनी आपल्या कथासृष्टीत नवे आदर्श निर्माण केले. त्याचे अनेक कथा-संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यात ' रंगप्पन कथेगळु 'ला वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे.

आनंदकंद, श्रीस्वामी, गोपाळकृष्णरायजी, मुगळी, गोरूर, कोडगु गौरम्मा, नरसिंहाचार्य, देवुडु, क्षीरसागर, उषादेवी, वाणी, कात्यायनी एम. सीतरत्न, त्रिवेणी, सावित्रम्मा, कल्याणम्मा भारती इत्यादी जुने नवे—स्त्री व पुरुष कथाकारांनी कन्नड कथेचे दालन समृद्ध केले आहे.

नाट्यलेखनात टी. पी. कैलासम, श्रीरंग, कारंत, कस्तुरी इत्यादी नाटक-कारानी वेधक भर घातली आहे. कैलासमच्या नाटकाना श्रेष्ठ प्रतीचे साहित्यमूल्य आहे. परंतु कन्नड रंगभूमी बराच काळ प्रभावहीन अवस्थेतच होती. अलिकडे नवीन नवीन तरुण नाटककार नवे प्रयोग नाट्यलेखनात करीत आहेत. गिरीश कर्नाड हे उदयोन्मुख नाटककार आहेत. त्याचे ' हयवदन ' हे नाटक नव्या प्रयोगाची साक्ष देणारे आहे.

प्रवासवर्णन, चरित्र-आत्मचरित्र, ललित-निबंध, समीक्षा, इत्यादी विविध प्रकारानीही कन्नड साहित्य समृद्ध आहे.

'कस्तुरी', 'प्रबुद्ध कर्नाटक' ही मासिके, 'कर्मवीर', 'नवयुग', 'कठिरव', ही साप्ताहिके 'तायिनाडु', 'प्रजावाणी', 'संयुक्त कर्नाटक', 'नवभारत' ही दैनिके प्रसिद्ध होतात. यारिवाय आणखीही बरीच नियतकालिके कन्नडमध्ये प्रसिद्ध होत असतात.

□ □

# कलाप्रिय कर्नाटक

साहित्य, भक्ती, शौर्य, इत्यादी बाबतीत जसा कर्नाटक गुणवान आहे, तसाच नृत्य-नाट्य-संगीत-शिल्प इत्यादी क्षेत्रातही अग्रेसर आहे. कानडी माणूस रसिक आहे.

संगीत

भारतीय संगीतात 'हिंदुस्थानी संगीत' जसे प्रसिद्ध आहे, तसेच ' कर्नाटक संगीत 'ही विख्यात आहे. कर्नाटक-संगीत हे दक्षिण भारतीय संगीत म्हणूनच ओळखले जाते. ही सगीतपद्धती फार प्राचीन मानली जाते. भरतमुनीने तर म्हटले आहे की, ' भारताच्या दक्षिणेकडील लोकाना नृत्य आणि गायन, वादन यात फार आनंद वाटतो. त्याच्या गायनशैलीत मार्दव व अभिनयात सहजपणा आढळतो. '

कर्नाटक संगीत हिंदुस्तानी संगीताहून जुने मानले जाते. एवढेच नव्हे तर हिंदुस्थानी संगीताचे मूळ हेच आहे. मुस्लिम सस्कृतीच्या प्रभावानेही दक्षिण संगीतपद्धती उत्तरेत हिंदुस्थानी संगीतात रूपातरित झाली. दक्षिणेत मात्र हिने आपले मूळ शुद्ध स्वरूप कायम राखले आहे.

चालुक्य राजा सोमेश्वर याने दक्षिणात्य संगीताला ' कर्नाटक सगीत ' असे नाव दिले. कारण ते कन्नडमध्येच जन्म पावले आहे. पण याचा विकास विजयनगर–राजांच्या कारकीर्दीत विशेष झाला. या सुमारास संगीतशास्त्रावर अनेक ग्रंथही लिहिले गेले. ' मानसोल्लास ', ' रागविबोध ' हे प्राचीन ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

कर्नाटकचे प्रसिद्ध वैष्णव संतकवी पुरंदरदास यांनी अनेक कीर्तन-पदे रचून, गाऊन कर्नाटक संगीताची परंपरा वाढविली. त्यांना ' कर्नाटक संगीताचे पितामह ' असे म्हटले जाते.

आंध्रचे प्रसिद्ध गायक व संगीताभ्यासी–त्यागराज यानी पुरंदरदासापासूनच प्रेरणा

घेऊन तेलुगुमध्ये सुमारे चोवीस हजार पदरचना केली. त्यापैकी आज केवळ एक हजार उपलब्ध आहेत. त्यागराजानी विस्तृत रागरागिण्या पुनरुज्जीवित केल्या.

म्हैसूरच्या राजांनी कर्नाटक संगीताला प्रोत्साहन देऊन अनेक गायकांना राजाश्रय दिला.

त्यागराजाच्या शिष्यपरंपरेत सदाशिवराय व वासुदेवाचार्य यांची नावे उल्लेखनीय आहेत. वीणे-शेषण्णाजी व बिडारं कृष्णप्पाजी यानीही कर्नाटक संगीताची पुष्कळ सेवा केली आहे. आधुनिक काळात जय चामराज ओडेयर यानी अनेक पदे रचून गायली आहेत.



त्यागराज

लक्षणगीत, वर्णन, कृती, पदम्, जावळी, रागमालिका, पल्लवी इत्यादी कर्नाटक संगीताच्या रचनेचे मुख्य प्रकार आहेत.

कर्नाटक संगीताची शास्त्रशुद्ध व परंपरागत वाद्ये म्हणजे सरस्वतीवीणा, बासरी, मृदंगम् व नागस्वरम्.

कर्नाटकात हिंदुस्थानी संगीतात पारंगतता मिळविलेले गायकही आहेत. त्यात गंगूबाई हनगल, भीमसेन जोशी, मल्लिकार्जुन मन्सूर, बसवराज राजगुरु आदि गायक भारतविख्यात आहेत.

कर्नाटकातील हरिदासी पद्धतीच्या ‘ दासकूटा ’तील भक्तकवींनीही कर्नाटक संगीताची सेवा बजावली आहे,

जनसामान्यात, विशेषतः ग्रामीण लोकात कन्नड लोकसंगीत लोकप्रिय आहे. ‘ तत्व ’, ‘ कामसलेपद ’, ‘ मन्तेदेवरपद ’ इत्यादी लोकगीताचे प्रकार प्राचीन काळापासून चालत आलेले आहेत. ‘ तत्वगीत ’ एकतारीवर एक-दोघेजण म्हणतात. तर ‘ कामसलेपद ’ स्थानिक वाद्यांच्या साथीवर तिघेजण म्हणतात. ‘ मन्तेदेवरपद ’ दोघानी म्हणण्याचा प्रघात आहे.

नृत्य

आपला हर्ष, आनंद जसा गाऊन तसाच नाचूनही कन्नड लोक व्यक्त करतात. खेड्यापाड्यातून निरनिराळ्या जाती-जमातींच्या लोकात निरनिराळी नृत्ये प्रचलित आहेत. काही लोकनृत्ये सामाजिक स्वरूपाची आहेत, तर काही धार्मिक आहेत.

ग्रामीण जीवनात शेतीला प्राधान्य. तेव्हा साहजिकच शेती-व्यवसायाशी मनोरंजन, जत्रा इत्यादी संबंधित असतात. कापणी झाल्यावर शेतकऱ्यास फुरसद मिळते. अशा वेळी डोडावा जाती मधील नर्तकाच्या पायाना ‘ वालकत ’ नावाचे नृत्य स्फुरते. मग ते रंगिबिरंगी कपडे घालून तालबद्ध अंगविक्षेप करीत बेभान होऊन नाचतात.

मरियम्मा देवीची जत्रा कर्नाटकात विशेष प्रसिद्ध आहे. या देवीच्या उत्सवात दक्षिण कर्नाटकातील लोक ‘ पूजा कुणित ’ नामक नृत्य करतात. मरियम्मा देवीची अलंकारलेली मूर्ती एका नर्तकाने मस्तकावर धारण केलेली असते आणि बाकीचे नर्तक त्याच्या आजूबाजूला नाचत असतात. या नर्तकाच्या हातात मोठमोठ्या काठ्या असतात. त्याना रंगिबिरंगी कापड गुंडाळलेले असते. काठीच्या वरच्या अग्रावर एक धातूचे छत्र बसवलेले असते. नागस्वरम्, थम्बटे—म्हणजे ढोल व नगारा, या वाद्याच्या साथीवर, मूर्तीचा तोल सावरीत हे नृत्य चालते.

‘ असूरपूजा ’ नामक नृत्य पश्चिमेकडील मालेकुडी नावाच्या पहाडी लोकांत

रूढ आहे. घनदाट अरण्यातील देवीच्या मंदिरापुढील मैदानात युद्ध-नृत्याच्या धर्तीवर हे नृत्य चालते.



सुग्गीकुनीथा-नृत्य

पहाडी जमातीमध्ये कितीतरी असूर देवता आहेत. त्याच्या कथा आहेत. पूजाविधी आहेत. उत्सवाच्या वेळी एक पुजारी नृत्य करतो. या भयकारी देवता असल्यामुळे पुजाऱ्याची वेशभूषाही भयकर दिसणारी असते. पुजारीण देवतेची कथा सागते आणि असुर देवतेच्या देवळातील पुजाऱ्याने हाती तलवार आणून दिल्यावर नृत्याला विलक्षण गती चढते !

'वैद्यनृत्य' नागदेवतेच्या कृपेसाठी नागमंडपात करतात. हे धार्मिक नृत्य आहे.

परियाह, रानेयार, कुडवी जमातींच्या लोकातही विविध नृत्ये प्रचलित आहेत. कोलारकडील 'कोलट्टा' नामक नृत्याच्या वेळी रामायण व महाभारता-मधील कथागीते गायली जातात.

**नाट्य**

कन्नड नाट्याची परंपरा फार जुनी आहे. प्रारंभीच्या काळात संस्कृत नाटकेच राजदरबारी होत असावीत. 'कन्नड' नाटक असे सतराव्या शतका-पर्यंत उपलब्ध नाही. सतराव्या शतकातील चिक्कदेवराय राजाच्या कारकीर्दीतील

सिंगाचार्य यानी लिहिलेले 'मित्र विंदागोविंद' हे पहिले उपलब्ध कन्नड नाटक आहे. श्री. गोविंद पै याच्या मतानुसार केशिराज नामक लेखकाने १२६० च्या सुमाराला 'सुभद्राहरण', व 'प्रबोधचंद्र' ही दोन कन्नड नाटके लिहिली होती. ती उपलब्ध मात्र नाहीत.

चिक्कदेवरायानंतर म्हैसूरच्या राजांनीही नाटकाला प्रोत्साहन दिले होते. कृष्णराज ओडेयर-तृतीय याच्या काळी बरीच नाटके रंगभूमीवर आली. काही नाटक मंडळ्याही निघाल्या. राजवाड्याच्या बाहेर चंद्रशाळेत नाट्यप्रयोग होत असत. त्यात संगीत असे. वरदाचार्यांची 'शाकुंतल', 'मन्मथ–विजय', 'निरूपमा' इत्यादी नाटके लोकप्रिय झाली होती. उत्तर कर्नाटकमधील वेंकोबराव याची 'शिरहटि' कपनी व 'सदाशिवराय गरूड' कंपनी या कंपन्यानी कर्नाटकात नाटकाचे सर्वत्र प्रयोग सुरू केले. १९२१ च्या सुमारास गुब्बि वीरण्णा याची कंपनी व कोट्टारप्पा याची 'चामुंडेश्वरी' कंपनी अत्यंत लोकप्रिय नाटके करीत होत्या. बेंगलोरच्या अॅमॅच्यूर नाटक संघाच्या नाटकातून पंडित तारानाथ, बळ्ळारी राघवाचारी यासारख्या विख्यात अभिनेत्यानी कामे केली. टी. पी. कैलासम यानी कन्नड नाट्य समृद्ध केले आहे. कर्नाटकात 'यक्षगान' ही लोक-नाट्य कला फार प्राचीन आहे. म्हैसूरकडे 'बैलाटा' किंवा 'योड्डाटा' हा लोक-नाट्य प्रकार प्रचलित आहे. 'बैल' म्हणजे उघडी जागा–मैदान. 'बैलाटा' नाटके अशी मैदानात होतात.

आधुनिक काळात कन्नड रंगभूमीचे स्वरूपही बदलले आहे. नवीन नाटके, नाटककार, अभिनेते, नवीन नवीन प्रयोगक्षम नाटके करीत आहेत. गिरिश कर्नाड हे अशा तरुण नाटककारात विशेष उल्लेखनीय नाव. त्याचे 'हयवदन' हे नाटक बरेच लोकप्रिय ठरले.

### यक्षगान

कर्नाटकातील ही लोककला कोकणातील दशावतारी पद्धतीची आहे. कुठे कुठे 'दशावतार यक्षगान' असेच म्हटले जाते. कन्नड यक्षगान शक्तिदेवतेचा वरदहस्त लाभावा, कृपादृष्टी लाभावी या हेतूने सादर केले जाते. नवस फेडण्यासाठी यक्षगान सादर केले जाते. कार्तिक महिन्यापासून चैत्रापर्यंत ठिकठिकाणी यक्ष-गानाच्या प्रयोगाची धमाल उडालेली असते. हे दिवस शेतकऱ्याना फुरसदीचे असतात. 'यक्षगान' करणारी व्यावसायिक मंडळी असतात. 'कोल्लुरुमेळा',

'मारणाकट्टी मेळा', इत्यादी मंडळ्या प्रसिद्ध आहेत. ग्रामदेवतेच्या प्रागणात, धनिकांच्या अंगणात यक्षगानाचे प्रयोग चालतात.

याची कथा पौराणिक असते. त्या नाटकाला 'प्रसंग' म्हणतात. यक्षगानातही 'कूट' व 'आट' अशा दोन पद्धती आहेत. 'कूट' पद्धतीला 'ताळमद्दळे' असेही नाव आहे. ताळमद्दळे म्हणजे टाळ-मृंदगाच्या साथीवर जे सादर करण्यात येते ते. यात 'प्रसंग' गायन असते.

'आट' याला बैलाटम म्हणतात. मोकळ्या मैदानावर हे चालते. रात्र झाली की 'चेंडे' नावाचे वाद्य वाजविले जाते. ही प्रारंभकालीन सूचना. त्याच्या नंतर मृदंग घुमू लागतो. पाठोपाठ झाज वाजू लागते. धूपानी रंगभूमी दरवळते. सूत्रधार प्रवेश करून गणेशस्तुती करतो. याला 'भागवत' म्हणतात. हा गायक, वादक, नर्तक, अभिनेता असा बहुगुणी असतो. भागवताला रगपटापासून रंगभूमीपर्यंत मिरवणुकीने आणतात. त्यानंतर विदूषक विविध तऱ्हेचे चाळे करीत प्रवेश करतात व प्रेक्षकाना हसवतात. त्याना 'कोडंगी' असे म्हणतात. पाठोपाठ बाळगोपाळ नृत्य सुरू करतात. याला 'तेरे कुणित' असे म्हणतात. यावेळी भागवत नादी म्हणतो. गणपतीची लाकडी प्रतिमा रंगभूमीवर आणून माडतात. त्यानंतर स्त्रीवेषधारी दोन पुरुषनट गोकुळातल्या गोपी बनून येतात व कृष्णाच्या खोड्याविषयी प्रेमळ गाऱ्हाणी गीतामधून माडतात. मराठीतल्या गौळणीसारखाच हा प्रकार आहे. यानंतर पूर्वरंग संपून मुख्य 'प्रसंग' सुरू होतो. तत्पूर्वी मुख्य पात्रे चेंड्याच्या साथीवर 'बोड्डुलग' नामक नाच करीत येतात. भागवत मुख्य पात्राची ओळख करून देतो. या पात्राची रंगभूषा-वेषभूषा भडक व वेधक असते.

कर्नाटकच्या सर्व भागात यक्षगान लोकप्रिय आहे. अनेक कवी, नट, नर्तक आदींनीही चार-पाचशे वर्षांची कलापरंपरा जतन केली आहे.

**चित्र**

प्राचीन कालापासूनच कर्नाटक चित्रकलेविषयी विशेष प्रसिद्ध आहे. प्राचीन कन्नड साहित्यातही चित्रकलेसंबंधी विवरण आढळते. चालुक्य राजा पुलकेशी—द्वितीय हा सातव्या शतकात होऊन गेला. हा चित्रकलेचा अत्यंत प्रेमी होता. प्राचीनकाळी वेरूळ, अजंठा ही स्थाने चालुक्य, राष्ट्रकूट राजवटीखाली होती. त्यावेळी तेथील शिल्प व चित्रकलेची निर्मिती झाली असे सागतात.

जमखिंडीनजीक 'गोंबिगुड्ड'— म्हणजे चित्राचा पर्वत—येथे प्राचीन

चित्रकलेचे नमुने आहेत. बादामीच्या लेण्यांत व बेळगावमधील जैन मठातूनही चित्रकला पाहावयास मिळते. विजयनगर कालात हंपी व लेपाक्षी मंदिरात अनेक चित्रे रेखाटली गेली. पोन्न व रुद्रभट्ट या ग्रंथकारानी चीरगट्टी नामक विख्यात चित्रकाराचा उल्लेख केला आहे.



यक्षगान

विजयनगरनंतर म्हैसूरच्या राजानी चित्रकलेला चांगला आश्रय दिला. त्या काळी चित्रकलेचा विकासही झाला. श्रीरंगपट्टण येथे टिपू सुलतानाच्या 'दर्या दौलत' महालाच्या भिंतीवर अत्यंत रेखीव व आकर्षक अशी चित्रे काढलेली आहेत. कृष्णराज ओडेयर-तृतीय यानी आपल्या 'श्री तत्त्वनिधी' ग्रंथाला सुंदर कलात्मक चित्रानी सुशोभित केले आहे. विविधरंगी चित्रे त्यात आहेत. म्हैसूर येथील 'जगन्मोहन महाल' मध्ये तत्कालीन चित्रशैलीचे अनेक उत्कृष्ट नमुने आहेत. कृष्णराज-चतुर्थ यानी राजा रविवर्मा याचे दरबारात स्वागत करून त्याच्याकडून अनेक चित्रे तयार करविली. यानेच 'श्री चामराजेन्द्र कला-विद्यालय' स्थापन

केले व चित्र, शिल्प आदी शिक्षणाची सोय केली. या सुमाराम केशवय्या, वेंकटप्पा हे प्रसिद्ध चित्रकार झाले. आजही श्री नागराजु वीरप्पा, एस. एन. स्वामी, कृष्ण हेब्बार आदी चित्रकार प्रसिद्ध आहेत. विख्यात व्यंगचित्रकार श्री. आर. के. लक्ष्मण हे देखील कर्नाटकीच आहेत.

**रंगोली**

कर्नाटकातही घरापुढचे अंगण सडासंमार्जन करून विविध रांगोळ्यांनी सुशोभित करण्याची प्रथा आहे. दिवाळीसारख्या सणावाराला तर रांगोळ्याची



रंगोली

विशेष शोभा दिसते. मंदिरे, घरातील देवघर, फार काय चुली-स्वयंपाकघरदेखील रागोळ्यानी सजवले जाते. कर्नाटकात रागोळीला 'रंगोली' असे म्हणतात. शिरगोळ्याची बारीक भुकटी यासाठी बहुतेक ठिकाणी वापरली जाते. ठिपके देऊन मग रागोळीच्या विविध आकृत्या रेखल्या जातात. काही ठिकाणी तांदळाची पातळ पिठी व चुनखडीदेखील वापरतात. ही रागोळी कापसाच्या वातीने, चिंधीने अथवा बोटानीही स्त्रिया रेखतात. या प्रकारात विविध रंगही वापरतात. घराच्या सारवलेल्या भिंतींवरही आकृत्या काढतात. नागपंचमीसारख्या विशिष्ट दिवशी नागाच्या आकृत्या काढतात तर मेजवानीच्या वेळी पानाभोवती सुरेख वेलबुट्ट्या चितारतात. महालक्ष्मीच्या आगमनाच्यावेळी घरभर पावले काढतात. ठशांच्या साहाय्यानेही विविध प्रकारची रंगोली रेखतात.

**वास्तु-शिल्प**


कर्नाटक वास्तुकला व शिल्पकला या प्रांतातही प्राचीन काळापासूनच ख्यात आहे. अनेक प्राचीन वास्तुकलेचे व शिल्पाचे नमुने अवशेष रूपाने आजही सर्वत्र पाहायला मिळतात. कर्नाटकमध्ये जी मंदिरे बांधली गेली आहेत ती—कदंब, गंग, होयसळ व विजयनगर राजानी जुन्या शास्त्रीय वास्तू पद्धतीनुसार बांधून घेतली आहेत. या राजानी वास्तू व शिल्प या कलाना पुष्कळच उत्तेजन दिले.

शिल्पकलेच्या संदर्भात तज्ज्ञाचा अभिप्राय असा आहे की, केवळ भारतीयच नव्हे तर विश्वशिल्पकलेत कन्नड शिल्पकलेला मानाचे व गौरवाचे स्थान आहे. कर्नाटकच्या शिल्पकलेतील मौलिकता व नूतनता आजही याची साक्ष देत आहे.

कर्नाटकातील प्राचीन मंदिरामधून शिल्पकलेचे सुंदर नमुने आढळतात. 'वनवासि'चे मंदिर फार प्राचीन काळच्या शिल्पकलेची आठवण करून देते, परंतु कर्नाटकाच्या शिल्पकलेचा वास्तविक विकास अशोकाच्या व सातवाहनाच्या काळात झाला. ते जैन व बौद्ध धर्मविस्ताराचे युग होते. बौद्ध-चैत्यालय, विहार व लेणी या काळात निर्माण झाली.

ऐहोळे, पट्टदकल्लू व बादामी येथील मंदिरे प्रसिद्ध आहेत. कदंब व चालुक्य याच्या राजवटीत शिव आणि विष्णू याची मंदिरे निर्माण झाली. कदंब राजवटीत जैन शैलीचा प्रादुर्भाव झाला. गंग राजवटीत या शैलीचा प्रसार सर्व कर्नाटकभर झाला. होयसळाच्या कारकीर्दीतही ही कला भरभराटीत होती. विजयनगरच्या

काळात या कलेत नवीन शैलीचा विकास झाला व तिच्यावर दक्षिणेतील द्राविड शिल्पकलेचा प्रभाव लक्ष वेधून घेऊ लागला.



रंगनाथस्वामी मंदिर

कदंब, गंग अथवा जैन, चालुक्य, होयसळ व विजयनगर अशा पाच प्रमुख शैलींनी कर्नाटकमधील शिल्प नटलेले आहे.

चालुक्य शैलीतील मंदिरे उत्तर कर्नाटक, बादामी, ऐहोळे, पट्टदकल्लू, लकुण्डि, कूकनूर, इट्टिगी, कुरुवट्टि इत्यादी ठिकाणी आढळतात. चालुक्य शैलीतील मंदिराची रचना विमान ( गाभारा ), मुखमंडप, महाद्वारावर गोपूर, हजारा व द्वार-मंडप अशा पाच भागात केलेली असते. ‘ कग्गलु ’ ( ग्रनाईट ) पत्थर यासाठी वापरतात.

कर्नाटकच्या शिल्पकलेत जैनधर्मीयानी मोठीच मौलिक भर घातलेली आहे.

श्रवणबेळगोळ येथील ५६ फूट उंचीची, अखंड शिलेची गोमटेश्वराची सुंदर मूर्ती ही एक थक्क करणारी गोष्ट आहे ! एणूरची मूर्ती ३५ फूट उचीची आहे. गंग राजा राजमल्ल याचा मंत्री चावुडराय याने १० व्या शतकात अरिष्टनेमी नामक शिल्पीकडून मूर्ती तयार करविली असे सागतात.

राष्ट्रकूट सम्राट कृष्ण याच्या काळी वेरूळची लेणी, तर चालुक्य राजा पुलकेशी याच्या काळी अजंठ्याची लेणी व चित्रकला झाली असे सागतात. बेलूर, हळेबीड, सोमनाथपूर येथील शिल्पात व मूर्तींत कन्नड संस्कृती, धर्म, इतिहास याचे दर्शन घडते.

हंपी अथवा विजयनगरमध्ये दोन हजार मंदिरे होती असे सागतात. आज काही मदिराचे भग्नावशेष फक्त दिसतात. हंपी येथील ‘ शिलारथ ’ पाहून मन मुग्ध होते !

विजयनगरच्या मंदिरामध्ये अत्यंत प्रसिद्ध मंदिर आहे विजयविठ्ठलाचे. याची तुलना वेरुळच्या कैलास मंदिराशी केली जाते. कृष्णदेवरायाच्या काळी या मंदिराच्या कामाला सुरुवात झाली आणि अच्युतराय व सदाशिवराय याच्या काळी ते पूर्ण झाले. या मंदिराचे शिल्पसौंदर्य अपूर्व आहे !

जकणाचारी, दासोज, मदुवण्ण इत्यादी कन्नड शिल्पशास्त्रींची नावे विख्यात आहेत.

**कलाकुसर**

बंगलोरची रेशमी वस्त्रे, साड्या जेवढ्या प्रसिद्ध आहेत तेवढ्याच म्हैसूरच्या चंदनी व हस्तीदंती वस्तू विख्यात आहेत. या वस्तूंवरील नाजुक नक्षीकाम पाहून आश्चर्य वाटते. गोकाकची रंगीत लाकडी खेळणी वेधक असतात. सोन्या–चांदीची व खड्याची आभूषणे उत्कृष्ट होतात.

□ □

# स्थलयात्रा

कर्नाटकचे लोकजीवन व कालजीवन जसे वेधक आहे, तसेच स्थलदर्शनही प्रेरणादायी आहे. प्राचीन पुण्यक्षेत्राप्रमाणे आधुनिक तीर्थक्षेत्रेही येथे आहेत.

**बंगलोर**

कर्नाटकची राजधानीच या देखण्या शहरात आहे. दक्षिणेतील एक महत्त्वाचे स्थळ बंगलोर आहे. रेल्वे, बस वा विमान या मार्गाने बंगलोरला जाता येते. भौगोलिक दृष्ट्या हे शहर दक्षिणेत जवळ जवळ मध्यवर्ती वसलेले आहे. सर्व ऋतू येथे सुखदायक वाटतात. शहरात अनेक भव्य व सुंदर वास्तू उभ्या आहेत. सचिवालयाची नवीन वास्तू प्रेक्षणीय आहे. तिला 'विधानसौद' म्हणतात. शासकीय मध्यवर्ती वाचनालय अद्यावत आहे. शासकीय वस्तुसंग्रहालय, टाऊन हॉल, श्रीकृष्णराजेन्द्र मार्केट, रवीन्द्र-कलाक्षेत्र, दि इंडियन इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, दि गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक, विश्वेश्वरअय्या इंडस्ट्रिअल अँड टेक्नॉलॉजिकल म्युझियम इत्यादी संस्थांच्या वास्तू व त्यांचे कार्य उद्बोधक आहे.


बंगलोर शहराची रचना आकर्षक आहे. प्रशस्त रस्ते आणि उद्याने आहेत. 'गार्डन सिटी'—उद्याननगरी, असेच बंगलोरला म्हटले जाते. 'कब्बन पार्क' या लोभस हिरव्यागार उद्यानाचा परिसर सुमारे दीड मैलाचा आहे. बँड स्टँड, संगमरवरी चबूतरा, म्युझियम, ग्रंथालय अशा विविध सोयी येथे आहेत.

'लालबाग' हे बंगलोरमधील आकर्षक स्थळ आहे. हैदरअली व टिपू सुलतान यानी ही विशाल बाग म्हैसूरच्या महाराजाना नजर केली होती, असे म्हणतात. नानाप्रकारचे वृक्ष व लता येथे आहेत. चिडियाघर, मुद्दाम बनविलेल्या टेकड्या व वाहते झरे, पुष्करिण्या, कारंजी मन मोहून टाकतात.

दरवर्षी येथे फुलांचे लोभस प्रदर्शन भरते. येथील 'काच-घर' ही प्रेक्षणीय आहे. 'गंगाधरेश्वर मंदिर', 'नन्दीश्वर मंदिर', चामराज वाडियारचा पुतळा,

केम्पेगौडा टॉवर, राजमहाल, कुमार पार्क, टिपूचा किल्ला, रसेल मार्केट इत्यादी स्थळेही पाहण्यासारखी आहेत.

बंगलोर नगरी जशी उद्याननगरी आहे, तशी 'उद्योगनगरी' देखील आहे. नव्या-जुन्याचा जसा येथे संगम दिसतो तशीच सृष्टीसौंदर्य व मानवी श्रम याचा



विधानसौद—बंगलोर

मेळ आढळतो. 'भारत इलेक्ट्रॉनिक्स', 'हिंदुस्तान मशीन टूल्स', 'इंडियन टेलिफोन इंडस्ट्रीज', हे उद्योग व प्रसिद्ध विमान कारखाना येथे आहे. 'रमण रिसर्च इस्टिटयूट', 'इंडियन इन्स्टिटयूट ऑफ सायन्स' इत्यादी विख्यात वैज्ञानिक संशोधन केन्द्रेही येथे आहेत.

## म्हैसूर

कर्नाटकमधील आखीव रेखीव अशी ही पूर्वीची राजनगरी आहे. संस्थान विलीन झाले, पण त्या गतवैभवाच्या खुणा सर्वत्र दिसतात. याला 'भारताची इन्द्र-पुरी' असे म्हटले जाते. राजमहाल, उद्याने, मंदिरे भव्य व कलापूर्ण आहेत. म्हैसूरच्या महाराजाचा राजमहाल विशाल असून विविध तऱ्हेच्या दालनानी व कक्षानी युक्त आहे. प्रत्येक द्वार, छत, कमान कलापूर्ण नक्षीकामाने अलंकृत केलेली आहे. विवाह मंडपामध्ये दसऱ्याच्या वेळी होणाऱ्या महोत्सवाची चित्रे आहेत. ही चित्रे एवढी सुंदर व जिवंत आहेत की पाहणाराला दसरा महोत्सवाची मिरवणूकच पाहात आहोत असे वाटते.

नगरीच्या बाहेर 'चामुंडी हिल' नावाची टेकडी आहे. टेकडीवर म्हैसूरच्या राजघराण्याची कुलदेवी 'चामुण्डी' अथवा 'दुर्गा' ह्या देवीचे मंदिर आहे. टेकडी-

वर पाषाणाचा प्रचंड, भव्य नन्दी आहे. हा नन्दी सुमारे सोळा फूटाचा असून एका अखंड शिळेतून कोरलेला आहे.

टेकडीवर दुसरी अनेक मंदिरे व तलाव आहेत. ‘ ललित महाल ’ नावाचा भव्य राजवाडा मार्गावरच आहे. तसेच महाराजाचा ‘ समर पॅलेस ’ ही येथे आहे. उन्हाळ्यात या वास्तूत महाराज राहातात.

दसऱ्याचेवेळी देवीचा फार मोठा उत्सव म्हैसूर शहरात साजरा होतो. त्यावेळी महाराज हत्तीवर सोन्याच्या अंबारीतून मिरवणुकीत भाग घेतात. आणखी-ही पुष्कळ आकर्षणे असतात. म्हैसूरचा दसरा सर्व भारतात विख्यात आहे.

येथील ‘ प्राणीसंग्रहालय ’ व विविध प्रसिद्ध चित्रकाराच्या चित्राचा संग्रह असलेली जगन्मोहन पॅलेसमधील ‘ आर्टगॅलरी ’ प्रेक्षणीय आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

वृन्दावन बाग



भारतरत्न विश्वेश्वरैया

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २०११९

म्हैसूर शहरापासून बारा मैलावर कृष्णराज सागर नावाचा प्रचंड बंधारा आहे. याची लांबी सुमारे सव्वा मैल असून जलाशयाचे क्षेत्रफळ ५० चौरस मैल आहे. यातील पाण्याने तत्कालीन म्हैसूर संस्थानातील भूमी समृद्ध करण्याची ही योजना होती.

कृष्णराज सागराच्या जवळच 'नंदनवन' नावाची सुप्रसिद्ध वृन्दावन बाग आहे. धरणातील पाण्याचा उपयोग करून या उद्यानात नाना तऱ्हेच्या रंगीबिरंगी फुलाबरोबरच विपुल कारंजीही बनवलेली आहेत. आणि त्यातही विविधरंगी विद्युत दीपाचा वापर केलेला आहे. हे उद्यान पाहून मन मुग्ध होऊन जाते. ही कर्तबगारी मोक्षगुंडम् विश्वेश्वरय्या याची आहे. हे कोलार जिल्ह्यातले. इंजिनियर झाल्यावर अनेक उच्च पदावर यानी काम केले. मुख्य इंजिनियर, म्हैसूर व जयपूर संस्थानचे दिवाण म्हणूनही यानी काम केले. म्हैसूरचे मुख्य इंजिनियर असतानाच यानी कृष्णराय सागराचा बंधारा बाधला, व वृन्दावन बाग तयार केली. म्हैसूरच्या रेखीव उभारणीतही याच्या प्रतिभेचा व ज्ञानाचा मुख्य भाग आहे. तंत्र कौशल्य व सौंदर्य दृष्टी अशी अपूर्व देणगी याना लाभलेली होती. देशाला अनेक ठिकाणी याच्या तंत्रज्ञानाचा फायदा मिळालेला आहे. भारताच्या राष्ट्रपतींनी 'भारतरत्न' ही सर्वोच्च गौरव पदवी विश्वेश्वरय्याना १९५५ साली दिली. शतायुषी जीवन जगून ते १४ एप्रिल १९६२ रोजी बंगलोर येथे निधन पावले.


**सोमनाथपूर**

म्हैसूर पासून सुमारे २५ मैलावर हे गाव आहे. होय्सळ राजानी बाधलेल्या तीन मंदिरापैकी एक येथे आहे. तेराव्या शतकातील हे मंदिर नक्षत्राकृती असून याच्या भिंतीवर हत्ती, हंस, नर्तक, गायक इत्यादी विविध आकृती तसेच पुराणकथा शिल्पित केलेल्या आहेत.

**बेलूर**

होय्सळानी बाधलेले दुसरे विख्यात मंदिर येथे आहे. हसन व श्रवणबेळगोळ याच्यानजीक बेलूर शाहे.येथील मंदिराला चेन्नकेशव मंदिर म्हणतात. त्याचे शिल्पसौंदर्य अपूर्व आहे. हे मंदिरही नक्षत्राकृती असून एका चबुतऱ्यावर बाधलेले आहे. मंदिरातील भिंती देवदेवताच्या पुराणकथाच्या सुंदर शिल्पानी नटलेल्या आहेत. गायक, नर्तक, व विविध अलंकरण सर्वत्र कोरलेले आहेत. द्वारावरती गरुड

सर्प, देवता, दानव, पशू ही सर्व सृष्टीच शिल्पित झालेली आहे. बेलूरचे चेन्नकेशव मंदिर मानवी श्रमाचे व कलाकृतीचे विलक्षण सुंदर प्रतीक आहे.



चन्नकेशव मंदिर—बेलूर


**हळेबीड**

बेलूर पासून दहा मैलावरच हळेबीड आहे. हळेबीडु म्हणजे ‘ जुने घर ’ होयसळ राजाची ८०० वर्षांपूर्वी येथे राजधानी होती. बेलूरच्या चेन्नकेशव मंदिराची निर्मिती झाल्यानंतर दहा वर्षांनी येथल्या मंदिराच्या कामाला प्रारंभ झाला. ऐंशी वर्षे हे काम चालले होते. पण ते अपूर्णच राहिले. हे मंदिर देखील नक्षत्राकृती असून बेलूर व सोमनाथपुरच्या मंदिरापेक्षा दुप्पट मोठे आहे. येथील शिल्पकला पाहून मन थक्क होते ! कलाकारानी पाषाणात काव्य खोदले आहे, दगडाना बोलके केले आहे, असे वाटते ! हत्ती, घोडे, सिंह इत्यादी विविध पशू , पुराण-कथा, देवदेवता, अप्सरा, नाना तऱ्हेची अलंकरणे इत्यादींनी हे पत्थर जिवंत झालेले आहेत. सुमारे दोनशे ऐंशी मूर्ती या मंदिरात आहेत.

जवळच केदारेश्वराचे मंदिर आहे. तेही शिल्पसौंदर्याने नटलेले आहे !

**श्रीरंगपट्टण**

ही एक प्राचीन ऐतिहासिक नगरी आहे. सतराव्या व अठराव्या शतकात हैदरअली व टिपू सुलतान यांनी येथून राज्य केले. तत्कालीन किल्ला असून या



शिवमंदिर – हळेबीड


किल्ल्याच्या प्रवेश द्वारापुढेच इंग्रजांशी लढता लढता टिपूने आपले बलिदान केले. येथील श्रीरंगनाथ मंदिर फार प्रसिद्ध असून ते पाचशे वर्षांचे जुने आहे. शेषशायी भगवानाची प्रचंड प्रेक्षणीय मूर्ती येथे आहे. येथील जामा मशीदही प्रेक्षणीय आहे. टिपूचा उन्हाळी महाल, दरिया दौलतबाग महाल, ही स्थळे सुंदर आहेत.

**श्रवणबेळगोळ**

हे जैन धर्मियांचे प्रमुख तीर्थ स्थान आहे. येथील टेकडीवर जैन साधु गोमटेश्वर बाहुबलीची छप्पन्न फूट उंचीची भव्य मूर्ती आहे. एकाच अखंड शिलाखंडाची बनवलेली ही प्रमाणबद्ध आकृती पाहून पाहणारा आश्चर्यचकित होतो ! मानवी कलासामर्थ्यांच्या दर्शनाने थक्क बनतो ! गंग राजवटीत जैन धर्माला पुष्कळ राजाश्रय लाभला होता. दहाव्या शतकात राचमल्ल राजाचा मंत्री चावुंडराय याने ही मूर्ती अरिष्टनेमी नामक शिल्पकाराकडून घडविली. गोमटेश्वराच्या पायथ्याशी मराठी शिलालेख आहे. मराठीमधील हाच पहिला उपलब्ध शिलालेख मानला जातो.

गोमटेश्वराच्या मूर्तीला बारा वर्षांतून एकदा मूर्धाभिषेक केला जातो. त्यावेळी फार मोठा उत्सव होतो. हजारो जैन लोक येथे येतात. मूर्ती भोवती एक उंच मचाण

बनवतात व त्यावरून शेकडो घडे दूध, दही, मध यांचा अभिषेक केला जातो! एवढी उंच मूर्ती इजिप्तमध्येच काय, सर्व जगात नाही असे म्हणतात.



गोमटेश्वर — श्रवणबेळगोळ

येथील इंद्रगिरी पर्वतावरही बरीच मंदिरे आहेत. जैन साधूंच्या तपश्चर्येच्या जागाही आहेत. सम्राट चंद्रगुप्त मौर्य उत्तर वयात येथेच आला होता अशी आख्यायिका आहे.

**मेलुकोटे**

हे दक्षिणेतील एक प्रमुख तीर्थक्षेत्र मानले जाते. श्री. रामानुजाचार्य येथे

सोळा वर्षे राहात होते. याला यादवगिरी असेही म्हणतात. येथे स्वामी संपत्कुमार याचे मंदिर आहे. मंदिरात विष्णू–नारायणाची सुंदर मूर्ती आहे, जवळच ' पंचतरणी ' अथवा ' वेदपुष्करणी ' नामक तीर्थ आहे. पर्वतावर योग नरसिंहाचे मंदिर आहे.

**श्रृंगेरी**

तुंगभद्रेच्या काठी श्रृंगेरी मठ आहे. आद्य शंकराचार्यांनी प्रतिष्ठापित केलेल्या मठापैकी हे एक प्रमुख पीठ आहे. श्रीचंद्रमौलीश्वराची पूजा येथे होते. जवळच्या डोंगरावर विभाडकेश्वर नामक शिवमंदिर आहे. विभाडक ऋषींनी ह्या शिवलिंगाची स्थापना केली अशी आख्यायिका आहे

**उडुपी**

कर्नाटकातील हे आणखी एक प्रमुख तीर्थक्षेत्र आहे. याला जुन्याकाळी ' उडुपा ' असे म्हणत असत. याचा अर्थ ' नक्षत्राचा पालक चंद्र ' असा होतो. चंद्राने जेव्हा शिवाची तपस्या केली तेव्हा चंद्रमौलीश्वराच्या रूपात शिवाने दर्शन दिले अशी पुराणकथा आहे. याला ' रजतपीठपूर ', ' रौप्यपीठपूर ' अथवा ' शिवाली ' अशीही नावे आहेत. मध्वाचार्यांचे आठ मठ येथे असून मध्वसंप्रदायाचे हे धर्मपीठच मानले जाते.

**गोकर्ण**

एकदा ब्रह्माने सृष्टी निर्मितीचे कार्य रुद्रावर सोपविले. सात्त्विक प्रकृतीची सृष्टी निर्माण करण्याच्या उद्देश्याने रुद्र पाताळ लोकात तपश्चर्येसाठी गेला. कित्येक हजार वर्षे उलटली; पण रुद्र काही परतला नाही. तेव्हा ब्राह्मणानेच सृष्टी निर्माण करून टाकली. ही वार्ता कळताच रुद्राला राग आला. क्रुद्ध झालेला रुद्र ब्रह्मावर सूड उगवण्यासाठी निघाला. रुद्राचे ते भयंकर क्रुद्धस्वरूप पाहून भूमातेने त्याला शांत होण्याची प्रार्थना केली. महाबळेश्वर रुद्र मग सूक्ष्म रूप धारण करून भूमातेच्या कानातून बाहेर पडला. म्हणून या स्थानाला गो-कर्ण असे नाव पडले. भोलानाथाची रुद्रयोनी असेही या स्थानाला म्हटले जाते. या तीर्थ स्थानाबद्दल अशा अनेक आख्यायिका प्रचलित आहेत. आजही हजारो भक्त, यात्रिक येथे येत असतात. हिंदूंचे हे एक पवित्र तीर्थस्थान मानले जाते.


**ऐहोले**

जैन आणि हिंदू धर्मियांची मंदिरे येथे आहेत. ' मेगुती ' नामक पाषाणाचे

बनवलेले जैन मंदिर आहे. हे सातव्या शतकातील आहे असे सांगतात. हिंदूंचे दुर्गा मंदिर शिल्प व वस्तूकला या दृष्टीने काव्य व कलात्मक आहे. ही वास्तुकला मध्ययुगीन आहे. लेण्यातील मंदिरेही प्रेक्षणीय आहेत; व त्याची शिल्पशैली पल्लवकालीन आहे. शिल्प व वास्तूकलेच्या संदर्भात ऐहोले हे प्रेक्षणीय स्थळ आहे.

### विजापूर

बहामनी सुलतानाची येथे राजधानी होती. त्यामुळे पुष्कळशा मशिदी, मकबरे, महाल आजही येथे दिसतात. वस्तूवरही मुसलमानी छाप दिसते. येथील वास्तूकला पौर्वात्य मुसलमानी संप्रदायाची आहे. तिच्यावर तुर्की प्रभावही स्पष्ट दिसतो. काही वास्तूमध्ये हिंदू-मुस्लीम वातूकलेचे मिश्र रूप दिसते ' गोल-घुमट ' ही येथील विख्यात वास्तु आहे. मुहंमद आदिलशहाच्या कारकीर्दीत गोल-घुमटाची निर्मिती झाली. हा विशाल घुमट सर्व जगात दुसऱ्या क्रमांकाचा मानला जातो. याचा व्यास एकशेचोवीस फूट आहे. याच्या प्रवेशद्वारात अनेक कमानी असून आतही चार प्रचंड रंगीत कमानी आहेत. एका आवाजाचा सात वेळा प्रतिध्वनी येथे ऐकायला मिळतो.



गोलघुमट — विजापूर

आदिलशाहाचा पिता इब्राहिम याचाही एक मकबरा येथे आहे. याच्या भिंती, खिडक्या सुंदर आहेत.

'असर-ए-शरीफ', 'गगनमहाल', 'आनंद महाल', 'सात मजली महाल', 'चिनी महाल' इत्यादी जुने महाल पुष्कळ आहेत.

विजापूरची जुम्मा मशीदही फार प्रसिद्ध आहे. मशीदीवरील विशाल भव्य घुमट लक्ष वेधून घेतात.

**बादामी**

विजापूरनजीकच बादामी आहे. येथील शिल्पकलाही फार प्रसिद्ध आहे. बनशंकरी देवीचे तीर्थस्थानही येथे आहे.



नागमूर्ती — बादामी

**हंपी**

विजयनगर ऊर्फ 'हंपी' हे ऐतिहासिक स्थान होस्पेटपासून दहा मैलावर आहे. रामयणकाली या ठिकाणाला 'किष्किंधा' म्हणत असत, असे उल्लेख सापडतात. विजयनगरचे हिंदूसाम्राज्य म्हणजे दक्षिण भारतातील 'सुवर्णकाल' म्हणूनच प्रसिद्ध आहे. सुमारे चारशे वर्षे ही नगरी राजधानी होती. त्या काळातील या नगरीचे व त्या साम्राज्याचे वैभव येथील असंख्य अवशेषावरून लक्षात येते, व हळहळ वाटते.

इटालियन प्रवासी मार्को पोलो व फारस देशीचा राजदूत अब्दुल रजाक यानीही या नगरीच्या वैभवाची प्रशंसा केलेली आहे.

आज उभ्या असलेल्या भग्नावशेषातूनही राजवाडे, किल्ले, मंदिरे, मूर्ती ध्वस्त स्वरूपात दिसतात.

विरूपाक्ष मंदिर, माल्यवान पर्वत, ऋष्यमूक पर्वत, विठ्ठल मंदिर, हेमकूट पर्वत, अनेक लेणी, अखंड शिला-रथ, संन्याशाची टेकडी इत्यादी स्थळे प्रेक्षणीय आहेत.

विरूपाक्ष मंदिराच्यापुढे एक सुंदर मंडप असून गाभाऱ्यात शिवलिंग व पुढच्या मंडपात भुवनेश्वरीची मूर्ती आहे. जवळच पार्वती, गणपती व नवग्रह ह्या देवता आहेत. मंदिरापुढे तुगभद्रेचा प्रवाह खळाखळ वाहातो आहे. मंदिराच्या मागच्या भागात या नगरीचे संस्थापक स्वामी विद्यारण्य यांची समाधी व मूर्ती आहे. उत्तरेला हेमकूट पर्वत आहे. तेथे पुष्कळ लेणी आहेत. माल्यवान पर्वतावरील लेण्यात राममंदिर आहे. तेथे सप्तऋषींच्याही मूर्ती आहेत.

या परिसराजवळच ऋष्यमूकपर्वत, मातंगपर्वत, गंदमाधनपर्वत, चक्रतीर्थ, शीतकुंड इत्यादी प्रेक्षणीय स्थळे आहेत. ही सर्व स्थळे रामायणकालीन आहेत.

येथील विठ्ठलनाथ स्वामींचा महाल फारच कलात्मक आहे. त्यात अनेक मंदिरे व मंडप आहेत. एक शिलारथ आहे, तसेच एका शिळेतून सप्त स्तंभ कोरलेले असून त्यातून सप्तस्वर उमटतात! अद्‌भुत शिल्पकला पाहून मन स्तिमित होते!

सुमारे तीन मैलाच्या अंतरावर राजमहाल, स्नानागार, हजार– राममंदिर ही स्थळे पाहाण्यासारखी आहेत. मंदिराच्या भिंतींवर विष्णूच्या दशावताराची व रामलीलेची सुंदर चित्रे रेखलेली आहेत. जवळच एक टेकडी दिसते; तिथे विद्या-रण्यस्वामींनी तपस्या केली होती.

तुंगभद्रेच्या पैलतीरावर आनेगोंदी हे गाव दिसते. विजयनगर साम्राज्याचा पाया प्रथम येथे घातला गेला. आनेगोंदीपासून दोन मैलावर पंपा सरोवर आहे.

सुमारे चोवीस मैल क्षेत्रफळाच्या भूमीवर ही नगरी वैभवाने पसरलेली होती. आज फक्त अवशेष दिसतात!

कर्नाटकमध्ये अशी अनेक स्थळे पाहण्यासारखी आहेत. धारवाड, हुबळी, बेळगाव ही शहरे, जगप्रसिद्ध जोगचा धबधबा, कारापुरचे जंगल व तेथील हत्ती पकडण्याचा खेड्डा, कुर्ग, मंगलोर बंदर, तुंगभद्रा धरण, इत्यादी जुनी-नवी कितीतरी स्थळे आहेत!

□ □

# विकासोन्मुख कर्नाटक

स्वातंत्र्यानंतर देशात स्वराज्याचे सुराज्य करण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. नियोजन मंडळाची स्थापना झाली. पंचवार्षिक योजनाची आखणी झाली. कर्नाटकही विकासकार्यात मागे राहिला नाही.

कर्नाटकात शेती हाच प्रमुख व्यवसाय आहे. म्हणून शेतीमालाच्या उत्पादनावरच भर देण्यात आला. कर्नाटकात विविध प्रकारची व दर्जाची जमीन आहे. तसेच हवामान, पाऊस-पाणीही भिन्न भिन्न ठिकाणी भिन्न भिन्न प्रकारचे आहे. परंतु असे असले तरी शेती उत्पादनाच्या दृष्टीने जमिनीचे संरक्षण, तिची उपजक्षमता इत्यादी गोष्टींकडे लक्ष पुरविण्यात आले असून सुमारे वीस दशलक्ष एकर जमिनीची या पद्धतीने काळजी घेण्यात आली आहे. उत्पादनवाढीसाठी हायब्रीड ज्वारी, मेक्सिकन गहू इत्यादी पिकाखाली ३,६३,००० हेक्टर जमीन आतापर्यंत आणलेली आहे. खत, पाणी, जतु व रोगनाशके याचा पुरवठा व मार्गदर्शन शेतकऱ्यांना सुलभ रीतीने मिळण्याची सोय शासनाने केली आहे. जुनी, परंपरागत शेतीची पद्धत सोडून नव्या अवजारानिशी, नव्या बियाण्याची, खत-पाण्याची पद्धती शेतकऱ्याना आता पटली असून ते तिचा मोठ्या प्रमाणावर वापर करीत आहेत. त्याची यांत्रिक शेती-अवजाराची गरज भागवण्यासाठी राज्याने 'ॲग्रो-इंडस्ट्रीज कार्पोरेशन' ही संस्था स्थापन केली आहे. बँकाकडून कर्जपुरवठ्याचीही सोय केलेली आहे. या प्रयत्नामुळे १९६० साली अन्नधान्य उत्पादनाचे प्रमाण जे ३·८ दशलक्ष टन होते, ते १९७० मध्ये साडे पाच दशलक्ष टनावर गेले होते.

वीज ही एक उत्पादनातली, आजच्या काळातली मुख्य गरज झाली आहे; व ही भागवण्याचा समाधानकारक प्रयत्न राज्याने केला आहे. 'शरावती हैड्रो-इलेक्टिक प्रॉजेक्ट आशियातील मोठी अशी विद्युतनिर्मितीची योजना राज्यात झाली. वीज-

निर्मितीची दहा युनिटस् असून प्रत्येक युनिटची वीज निर्मितीची क्षमता ८९,१०० किलोवॅट इतकी आहे.

' कालिंदी प्रकल्प ' ही आकार घेत आहे.

१९५०-५१ साली केवळ ४७३ मोठ्या व मध्यम शहराना वीजेचा लाभ होत होता; पण आता नवीन प्रकल्पामुळे नवीन २३१ शहराना व ८,३२८ खेड्याना विद्युत दीपानी उजळून टाकले आहे. उरलेली सर्व गावे पुढील पाच वर्षांच्या अवधीत उजळून टाकण्याची महत्त्वाकांक्षी योजना आहे.

केवळ प्रकाशाच नव्हे तर शेतीसाठीही विजेचा वापर होत आहे. १९५६ साली राज्यात जिथे ७,९२३ पंप होते, तिथे आता १,३०,८२० पंप कार्यान्वित झालेले आहेत.

शेतीसाठी पाणीपुरवठा ही एक महत्त्वाची बाब लक्षात घेऊन राज्यात लहान-मोठे बंधाऱ्याचे प्रकल्प योजलेले आहेत.

तुंगभद्रा नदीवर मल्लापुरम येथे बांधलेल्या धरणामुळे कर्नाटक व आंध्र राज्यातील ४ २ लक्ष हेक्टर जमीन पाण्याखाली आली आहे.

याच बरोबर दोन विद्युतगृहेही उभारली असून त्याची वीजनिर्मितीची क्षमता १८,००० किलोवॅट इतकी आहे. या शिवाय या राज्यात ' घटप्रभा प्रकल्प ', ' हेमावती प्रकल्प ', ' भद्रा प्रकल्प ', ' अप्पर कृष्णा प्रकल्प ', ' कालिंदी प्रकल्प ', ' मलप्रभा प्रकल्प ' इत्यादी प्रकल्पही कार्यान्वित होत आहेत.

पहिल्या योजनेच्या प्रारंभी कालव्याच्या पाण्याखालील क्षेत्र ६·८९ लाख हेक्टर होते ते तिसऱ्या योजनेच्या अखेरीस १२ लाख हेक्टरपर्यंत वाढले आहे.

औद्योगिक क्षेत्रातही कर्नाटकने बरीच प्रगती केली आहे. अनेक लहान-मोठ्या कारखान्याचे जाळे बंगलोर, म्हैसूरसारख्या शहरामधून निर्माण झाले आहे. बंगलोरमधील ' इंडियन टेलिफोन इंडस्ट्री ', ' हिंदुस्तान मशीन टूल्स ', ' भारत इलेक्ट्रॉनिक्स ', ' हिंदुस्तान एरॉनॅटिक्स ' इत्यादी महत्त्वपूर्ण व प्रचंड कारखाने राज्यात अस्तित्वात आले आहेत.

राज्यात ११ साखर कारखाने, ५ सीमेंट फॅक्टरीज, ॲलुमिनियम फॅक्टरी, खत कारखाना इत्यादी किती तरी नवनवीन उद्योग उभे राहिलेले असून आणखीही उभे राहात आहेत. होस्पेटनजीक ' विजयनगर पोलाद कारखाना 'ही उभा राहात आहे.

शेती आणि उद्योगधंदे यांच्या विकासासाठी व माणसाच्या वाहतुकीसाठीही दळणवळणाची सोय हवी असते, हे लक्षात घेऊन राज्यात सर्वत्र चागल्या सडका झाल्या असून वाहनाचीही विपुलता आहे.

खनिज व जंगल संपत्तीचा उपयोग करून घेण्याचेही विविध प्रयत्न चालू आहेत.

शिक्षणाच्या क्षेत्रातही बरीच वाढ झाली असून सध्या राज्यात ( १ ) बंगलोर विद्यापीठ, बंगलोर, ( २ ) कर्नाटक विद्यापीठ, धारवाड, ( ३ ) म्हैसूर विद्यापीठ–म्हैसूर, व ( ४ ) युनिव्हर्सिटी ऑफ अ‍ॅग्रिकल्चरल सायन्सेस, बंगलोर अशी चार विद्यापीठे आहेत. कला-विज्ञान-वाणिज्य इत्यादी विषयांची १११ व धंदे-विषयक शिक्षणाची २२३ महाविद्यालये राज्यात आहेत. माध्यमिक व प्राथमिक शिक्षण सर्वत्र उपलब्ध होईल अशी सोय झालेली आहे.

या शिवाय आरोग्य, समाजकल्याण, सहकार, हस्तकला व ललितकला इत्यादी विविध क्षेत्रांतही विकासाची कामे झालेली आहेत व होत आहेत.

सर्वांगीण प्रगतीच्या दृष्टीने कर्नाटक वाटचाल करीत आहे.

□ □

# कन्नड लोकसाहित्य

लोकसाहित्य ही त्या त्या भाषेची एक अमूल्य अशी संपदा आहे. लोकभावना, लोकाचार, आणि लोकस्थिती यांचे दर्शन लोकसाहित्य घडवीत असते. प्रत्येक भाषेत असे साहित्य आहे. कन्नडमध्येही आहे. वर्णक, त्रण्णवाडु, हाडु, गव्व, इत्यादी कन्नड लोकसाहित्याच्या संज्ञा आहेत. 'गरतिय हाडु' नावाचा स्त्रीगीताचा संग्रह प्रसिद्ध आहे. 'गरति' म्हणजे कुलस्त्री व 'हाडु' म्हणजे गीत. निरनिराळ्या सण समारंभाची, विवाहादी मंगल कार्यांची, खेळ–मौजेची अशी अनेक प्रकारची गीते कन्नड लोकसाहित्यामध्ये आहेत. 'पॉप्युलर कल्चर इन् कर्नाटक' नावाच्या ग्रंथात श्री. मास्तीजींनी कन्नड लोकसाहित्याचा सर्वांगीण परिचय करून दिलेला आहे.

कन्नडमधील काही पारपरिक बालगीते, म्हणी व लोककथा याची ही वानगी. :

१

बा बा चंदामामा
मुत्तु कोडुबा
कब्बु हच्चि सिप्पे कोडुवे
माड हच्चि ओटे कोडुवे
बा बा चंदामामा
मुत्तु कोडुबा !

—चांदोबा चादोबा ये, मला पापा दे! तुला देतो उसाची चोय, तुला देतो आंब्याची कोय. चादोबा, चादोबा ये, मला पापा दे !

२

नविले नविले मळे बंदॉगा येल्लिद्दे !

तिरिमिंगरायन वनदल्लि आडुवा नाविद्दु !

यावा देशद नविलु ?

कोकण देशद नविलु !

—पाऊस आला धो धो तेव्हा होतास कुठे मोरा ? तिरिमिंगरायच्या बागेमध्ये नाचत होतो जरा ! मोरा, तू कुठल्या देशातला ? मी आहे कोकणातला !

म्हणी

- अत्तॅगॆ ऑन्दु काल सॉसॆगॆ ऑन्दु काल.

  —चार दिवस सासूचे, चार दिवस सुनेचे.

- ऑनॆ कॉट्टरू अडिकॆगॆ होद मान बरदु.

  —सुपारीने घालविलेली प्रतिष्ठा हत्ती देऊनही परत मिळविता येत नाही.

- दूरद बॆट्ट नुण्णगॆ.

  —दुरून डोंगर साजरे

- मुळुगुवनिगॆ जॉण्डे आधार.

  —बुडत्याला काडीचा आधार.

- ऑन्दे कैयिंद चप्पाळॆयागदु.

  —एका हाताने टाळी वाजत नाही.

कन्नड लोककथा

## सोन्याची थाळी

फार फार दिवसापूर्वीची गोष्ट. कर्नाटकात कतलनकेरी नावाचे एक गाव होते. सगळ्या गावाना असतो तसा याही गावाला एक सरपच होता. त्याचे नाव होते मतलन गौड. तो गावचा पुढारी होता.

कतलनकेरी गाव मात्र उजाड, भकास आणि सदा दुष्काळी होते. गावाला ना नदी, ना ओढा. कधी तरी पाऊस पडायचा, गावातल्या विहिरी ओल्या व्हायच्या.

एके वर्षी तर पावसाने तोंडही दाखवले नाही. दुष्काळाने उग्र रूप धारण केले. मतलन गौड विचार करीत बसला, काय करावे ?

विचार करता करता मतलन गौडाला एक गोष्ट पक्की पटली, आणि ती म्हणजे, नेहमीच्या या संकटाला तोंड द्यायचे तर गावाजवळ एक भला मोठा तलाव खोदला पाहिजे. मग त्यासाठी कितीका पैसा खर्च होईना, कितीका मेहेनत पडेना, एकदा हे काम केलेच पाहिजे. अशा तलावात बारामास पाणी साठेल, गावची तहान भागेल.

मतलन गौडाने आपला विचार गाववाल्यांना सांगितला सगळ्यांना तो पटला. दुसरे दिवशी घराघरातून कुदळी, फावडी बाहेर आली. गावची सेना तलाव खोदायला उभी राहिली.

खण खण खण घावावर घाव पडू लागले. दणकट खडक फुटू लागले. ऊन नाही, वारा नाही, घामाच्या धारा ओघळल्या. खण खण खण पाहारी खोल खोल चालल्या. पाताळाला भिडल्या. पण पाण्याचा पाझर लागला नाही. इवलासा थेंब दिसला नाही. सगळ्यांचे चेहेरे मलूल झाले. निराश झाले. सगळी मेहेनत फुकट जाणार ? सारे कष्ट मातीला मिळणार ? कतलनकेरीची तहान तशीच राहणार ? .. सगळी चिंताच चिंता !

अशा वेळी कतलन केरीची एक रीत होती. प्रथा होती. हिंमत धरून त्यांनी गावच्या ज्योतिष्याला बोलावले. ज्योतिषी बुवांनी पोथी उघडली. भुवया ताणून पाने वाचली. मग ज्योतिषीबुवा जमिनीकडे पाहत म्हणाले, “ हा देवाचा कोप नाही, भुताची बाधा नाही. धरतीची भेट धरतीला मिळाली नाही. तिच्या पोटातले पाणी वर आले नाही. ”

“ आता उपाय सांगा. चूक पदरात घेऊ. ” मतलन गौडा म्हणाला. ज्योतिष्याने उपाय सांगितला, “ धर्मग्रंथात लिहिले आहे की अशा वेळी गावच्या पुढाऱ्याने आपल्या सुनेचा बळी द्यावा, जलदेवीचा आशीर्वाद घ्यावा. जलदेवता प्रसन्न झाली तर मोत्यासारखे स्वच्छ, सुंदर पाणी उसळून येईल, सगळा तलाव भरून जाईल ! ”

धर्मग्रंथाची अवज्ञा कोण करणार ? मतलन गौडाला दोन सुना होत्या. धाकटी आणि थोरली. कुणाचा बळी द्यायचा ? थोरलीचा दिला तर मतलन गौडाच्या म्हातारपणी घरदार कोण सांभाळील ?

मग ठरले, की धाकटीचा बळी द्यायचा. धाकट्या भागीरथीला हे कळले. त्या वेळी तिचा पती मादेवराया फौजेत होता. रायाची फौज शत्रूशी लढण्यासाठी दूरदेशी गेलेली होती.

भागीरथी उठली. सासूकडे गेली. म्हणाली, " एकदा आईला भेटून येते ".

" लौकर जा, लौकर ये "

सासूने परवानगी दिली. पण बळी देण्याची गोष्ट बोलली नाही. पण तिच्या " लौकर ये, " या शब्दातच ती होती. भागीरथी समजून चुकली, ' हे अखेरचेच माहेरी जाणे ? ' ती माहेरचा निरोप घ्यायलाच निघाली.

माहेरी पोचली तेव्हा भागीरथीचा म्हातारा बाप सोप्यावर समोरच होता. भागीरथी अशी अचानक, न कळवता सवरता आली हे पाहून म्हाताऱ्याला आश्चर्य वाटले. बापाला पाहून भागीरथीचे डोळे भरून आले. म्हातारा म्हणाला, " पोरी, माहेरी आलीस, तर डोळे का गाळतीस ? "

' बापाला कशाला सांगायचे ? म्हातारपणी दुःख द्यायचे ? नकोच ते ' भागीरथीने मनाशी ठरवले. पण तिच्या चेहेऱ्यावरची उदासी मावळली नाही. डोळ्यातली दुःखाची छटा लपली नाही.

खरं तर तिला हेही कळत होतं, समजत होतं, की क्वचित कुणाला मिळणारा बहुमान तिला लाभला होता. त्या काळी अशी भावना होती की, व्यक्तीने कुटुंबासाठी, कुटुंबाने गावासाठी आणि गावाने देशाच्या भल्यासाठी पाहिजे ते मोल मोजले पाहिजे. प्राण देखील दिले पाहिजेत.

भागिरथी हे जाणून होती. पण तिला वाटत होते, पती जवळ नाही. ते येतील तेव्हा आपण असणार नाही. आपल्या आठवणीने ते बेचैन बनतील. हैराण होतील. त्यांना किती दुःख होईल ? ते किती आसवं गाळतील ?

भागीरथीनं मोठ्या कष्टानं डोळ्यातली आसवं पिऊन टाकली. बापाला म्हणाली, " मामजी माझ्यावर नाराज आहेत, घराबाहेर काढणार आहेत ". " पोरी त्याची एवढी काळजी कशाला करतीस ? घराबाहेर काढलं तर सरळ इकडं निघून ये. इथं मी तुला घर—जमीन देईन. हवं नको पाहीन. "

" हवीय कुणाला तुमची जमीन ? " ती मनाशी म्हणाली.

तेवढ्यात भागीरथीची आई बाहेर सोप्यावर आली. पोरीला अशी अचानक

आलेली पाहून तिलाही नवल वाटलं तिनंही दुःखी कष्टी दिसण्याचं कारण विचारलं. भागीरथीनं आईलाही तेच सांगितलं. आई धीर देत म्हणाली, "काळजी करू नकोस पोरी, मी तुला माझा दागिना देईन."

"चुलीत गेला तुझा दागिना. कुणाला हवाय तो?" भागीरथी मनाशी म्हणाली.

नंतर तिची थोरली बहीण आली. तिनंही तेच विचारलं आणि तिलाही तीच उत्तरं मिळाली.

"चिंता करू नकोस, ताई. तुझ्या सोबतीला मी माझा मुलगा धाडीन." बहीण म्हणाली.

"हवीय कुणाला सोबत?" भागीरथी मनाशी म्हणाली. तिचे हृदय वेदनेने घायाळ बनलेले होते. पण माहेरच्यांना सांगून कशाला दुःखी–कष्टी करा, या विचाराने ती कुणाशी बोलली नाही.

गावात तिची एक सखी राहात होती. लहानपणापासून दोघींची मैत्री होती. भागीरथी तिच्याकडं गेली. सखीने तिला तोच प्रश्न पुसला. भागिरथीने तिला खरं खरं सांगून टाकलं. दुःख हलकं केलं.

सखी तिला म्हणाली, "भागीरथी, दुःखी कष्टी होऊ नको, आली संधी दवडू नको. यात तुझी शान आहे, यात तुझा मान आहे. लाभता मान स्वीकारून घे, मातीचा देह फेकून दे! अशा पुण्याने स्वर्गात जाशील, जाताना गावाची तहान भागवशील! गावची जमीन, गावची माणसं, गावची गुरं, गावची झाडं, सगळ्यांचे चेहेरे हसरे करशील!"

सखीचं बोलणं खोटं नव्हतं. भागीरथी आली तशी सासरी परत गेली.

तिकडं बलिदान-सोहळ्याची तयारी चालली होती. गावात धमाल उडालेली होती. नेहमीप्रमाणं देवीची महापूजा बांधायची इतकाच सहज भाव सगळ्यांच्या मनीमानसी नांदत होता. धान्यधुन्य निवडण्यात आले. काहिली भरभरून, खीर, भात शिजला. लतापल्लवांनी गाव सजला.

भागीरथीनं आंघोळ उरकली. सोन्याच्या थाळीत पूजेचे साहित्य ठेवले. पुढं भागिरथी चालली, तिच्या मागं गावच्या सुहासिनी चालल्या. त्यांच्या मागं बाकीचे लोक चालले. गंभीर मौन सगळ्यांनी पाळले होते. जाता जाता सगळे तलावाच्या पाळीवर आले. तिथं जलदेवीची पूजा झाली. आरती झाली. महावस्त्र अर्पण केले.

सुगंधी फुलांच्या माळा घातल्या. सगळ्यांनी मग प्रसाद ग्रहण केला. भोजन झाल्यावर सगळे आपआपल्या वस्तू घेऊन परतले. तलावाच्या मध्यावर सोन्याची थाळी मात्र तशीच ठेवली.

गाववाल्यांची इच्छा अशी होती की, बलिदान एक पवित्र मंगल कार्य आहे, तर ते तसेच गंभीरपणाने झाले पाहिजे. रक्तमांस सांडू नये की दु:ख-शोक करू नये. जलदेवी स्वत: प्रकट होईल, आपला नैवेद्य गोड करून घेईल !

अर्धा रस्ता परतीचा संपला तेव्हा सोन्याच्या थाळीची आठवण काढण्यात आली. मग एकेका स्त्रीला परत जाऊन सोन्याची थाळी घेऊन येण्यास सांगितले, पण सगळ्याजणींनीच नकार दिला. शेवटी, भागीरथीला ह्या सूचनेतले मर्म कळले. ती गुपचुपपणाने परत फिरली. तलावाकडे गेली. तिच्या मुद्रेवर दु:खाची छटा नव्हती की डोळ्यात अश्रूही नव्हते. धीर गंभीर दिसत होती ती !

भागीरथी तलावात उतरली तेव्हा मध्यभागी ठेवलेली सोन्याची थाळी दुपारच्या उन्हात चकाकत होती.

भागीरथीने जाऊन थाळी घेतली आणि परत फिरली. तलावाच्या कडेला आली. वर काठावर चढण्यासाठी पायऱ्या केल्या होत्या. भागीरथी पहिल्या पायरीवर चढली तोच "खळखळ" "खळखळ" असा वाहत्या पाण्याचा आवाज कानावर आला. भागिरथीने वळून पाहिले. पाण्याचा एक मोठा झरा फुटला होता. स्रोतच्या स्रोत उफाळून वर आला होता. भरभर भरभर पाणी चोहोकडे पसरत होते. तलाव भरत होता. पाण्याचा ध्वनी इतका कोमल मधुर होता की जणू संगीताच्या गोड लहरीच !

भागीरथी स्तिमित होऊन पहिल्या पायरीवरच उभी होती. तेवढ्यात पाणी तिच्या पायाजवळ येऊन पोचले. भागीरथी झटकन दुसऱ्या पायरीवर चढली, पाठोपाठ पाणीही चढले. तिच्या गुडघ्यापर्यंत पोचले. ती तिसऱ्या पायरीवर गेली, पाणी वेगाने चढले. तिच्या कमरेइतके झाले. चवथ्या पायरीवर जाईतोवर गळाभर झाले आणि पाचव्या पायरीवर ती जाऊच शकली नाही. तोवर तलाव काठोकाठ भरूनही गेला होता. जलदेवीने आपला नैवेद्य घेतला होता.

तिकडे रणांगणातल्या राहुटीत पडला असताना मादेवरायाला अनेक अशुभ स्वप्नं पडली. एका स्वप्नात त्यानं पाहिलं की, अंगावरचा अंगरखा जळून गेला आहे. तलवारीचे दोन तुकडे झाले आहेत !

मादेवराया खडबडून जागा झाला. ह्या स्वप्नाचा अर्थ काय? अवश्य काही दुर्घटना घडली असावी. तो अस्वस्थ झाला. तत्काळ त्यानं आपला घोडा काढला आणि भरधाव वाऱ्यासारखा उधळीत कतकलन केरीला घरी येऊनच थांबला.

मुलगा आला याचा आनंद मतलन गौडाला आणि त्याच्या बायकोला बहूत झाला. मादेवरायाची आई घरात वळून म्हणाली, " गंगव्वा, हात पाय धुवायला पाणी घेऊन ये ! "

रायाला राग आला. रागारागानेच तो म्हणाला, " भागीरथी कुठं आहे ? तिला पाणी आणायला सागाचं सोडून गंगव्वा नू गंगोरव्वा कशासाठी ? " बिचारा मतनल गौड ! काय सागणार या मुलाला ? सून गेली याचा का त्याला आनंद वाटत होता ? त्याला का दुःख नव्हते ? पण गावाच्या भलाईपुढं त्याला का आडवं जाता येत होतं ?

पण आता मादेवरायाला काय आणि कसं सागणार होता तो ? म्हातारा खोटं बोलून गेला, " भागिरथी माहेरी गेली आहे, पोरा ! "

एकही क्षण उसंत न घेता मादेवरायाने आपला घोडा भागिरथीच्या माहेर-गावी पिटाळला.

तिथेही घरचेच दृश्य त्याला दिसले.

भागिरथीच्या आई-वडिलाना काय घडले, कसे घडले हे नंतर कळलेले होते; पण जावयाला कसे सागणार ?

म्हातारा सासराही खोटं बोलला, " भागीरथी गेली आहे तिच्या मैत्रिणीकडं."

मादेवराया तडक मैत्रिणीच्या घरी गेला. मैत्रिणीनं मात्र घडली गोष्ट खरीखरी सागून टाकली !

मादेवरायाला दुःख झालं.

पण राया आदर्श पत्नीचा आदर्श पती होता म्हणूनच सारं सहन करून शात राहिला. नाही तर घरी जाऊन त्याने आई-बापाची हजेरी घेतली असती.

पण त्याला हेही कळले होते की भागीरथीने खुषीने बलिदान स्वीकारलेले होते.

मादेवराया तिथून तडक तलावाच्या काठी आला. तलाव काठोकाठ पाण्यानं भरलेला होता. भागीरथीचा जीव गमावला होता, पण गावाला नवे जीवन लाभले होते !

झुळझुळत्या पाण्याच्या लाटांकडे पाहत राया म्हणाला, " भागीरथी, मला सोडून कुठं एकटीच गेलीस ? तुझ्यासाठी मोत्याच्या बागड्या आणल्या आहेत मी. त्या न घालताच गेलीस ? "

रायाचे डोळे भरभरून वाहत होते. भरभरून वाहत होते !

त्यानं निर्धारानं डोळे पुसले. घोड्यावर स्वार झाला. घोड्याला टाच दिली आणि भरल्या तलावात घोडा पिटाळला.

□ □

# संभाषण

कन्नड भाषेतील काही प्रथम परिचयात्मक वाक्ये येथे देवनागरीत दिली आहेत एखाद्या कानडी माणसाशी प्रारंभी बोलण्यासाठी आणि कन्नड भाषेचाही अल्पसा परिचय होण्यासाठी याचा उपयोग होईल.

| मराठी | कन्नड |
|---|---|
| ◻ नमस्कार | — नमस्कार |
| ◻ आपले नाव काय ? | — तम्म हॅसरु अेनु ? |
| ◻ माझे नाव रंगाचार. | — नन्न हॅसरु रंगाचार. |
| ◻ आपले आडनाव काय ? | — तम्म मनॅ हॅसरु अेनु ? |
| ◻ आपल्या वडिलाचे नाव काय ? | — तम्म तंदॅयवर हॅसरु एनु ? |
| ◻ आपण राहाता कोठे ? | — तावु ऑल्लि वासिसुत्तीरि ? |
| ◻ मी हुबळीला राहातो. | — नावु हुबळीदल्लि वासिसुत्तेनॅ. |
| ◻ आपला पूर्ण पत्ता सांगा. | — तावु तम्मपूर्ति विळासवन्नु हेळिरि. |
| ◻ लिहून घ्या. | — बरॅदु कोळ्ळि. |
| ◻ आपण कोठून येत आहात ? | — तावु ऑल्लिंद बरुत्तिद्दीरि ? |
| ◻ मी सरळ बंगलोरहून येत आहे. | — नानु बंगळोरिंद नेरवागि बरुत्तिद्देनॅ. |
| ◻ आपण कोठे जाणार आहात ? | — तावु ऑल्लि होगुत्तिरि ? |
| ◻ मी आता विजापूरला जाणार आहे. | — नानु ईग वीजापुरिग होगुवॅनु. |
| ◻ तिथे आपले कोणी नातेवाईक आहेत ? | — यारादरु तम्म बंधुगळु अल्लि इद्दारॅये ? |
| ◻ माझ्या नात्यागोत्याची माणसे तिथे आहेत. | — नन्न सम्बंधिगळु बंधुगळु अल्लि अनेकरु इद्दारॅ. |
| ◻ तिथे माझे काही मित्रही आहेत. | — अल्लि ननगॅ कॅल्वु मित्ररु इद्दारॅ. |

| | |
|---|---|
| ¤ ठीक. | — सरि. |
| ¤ बसा. इथे असे बसा. | — कुळ्ि. इल्ली हीगॅ कुळितु कॉळ्ि. |
| ¤ तुमची प्रकृती कशी आहे ? | — निम्म आरोग्य हेगिदॅ ? |
| ¤ माझी प्रकृती ठीक आहे. | — अन्न आरोग्य सरियागिदॅ. |
| ¤ हे काय केलेस ? | — इदु एनु ! |
| ¤ इथून बाजार किती दूर आहे ? | — पेटे इल्लिन्द एष्टु दूर ? |
| ¤ बराच दूर आहे. | — बहळ दूर. |
| ¤ वाट दाखवा. | — दारि तोरिसु. |
| ¤ किती पैसे झाले ? | — हण एष्टु ? |
| ¤ माझ्याजवळ मोड नाही. | — नन्नलि चिल्लरे इल्ल. |
| ¤ ह्या शहराचे नाव काय आहे ? | — ई ऊरिन हेसरेनु ? |
| ¤ ह्या शहराचे नाव म्हैसूर. | — ई ऊरिन हेसरु म्हैसूर. |
| ¤ मला थोडे पाणी प्यायला देता का ? | — स्वल्प नीरु तदु कोडुत्तीरा ? |
| ¤ हो, हो, अवश्य. | — हॉ. अवश्य. |
| ¤ एखादे गाणे म्हणा ना. | — ओंदु हाडु हेळि. |
| ¤ मला गाता येत नाही. | — ननगे हाडलु बरुवुदिल्ल. |
| ¤ ही बस कुठे जाते ? | — ई बस्सु एल्लिगे ओगुत्तदे ? |
| ¤ तुमचे शिक्षण किती झाले ? | — नीवु एल्लि वरेगे ओदिद्दीरि ? |
| ¤ मी पदवीधर आहे. | — नानु ग्राजुएट. |
| ¤ मी फिरायला जात आहे. | — सुम्मने तिरुगाडिकोंडु बरलु होरटिद्देने. |
| ¤ चला, चहा घेऊ या. | — बन्नि, चा कुडियोण. |

¤ ¤

# कर्नाटक-गीत

उदयवागलि नम्म चेलुव कन्नडनाडु ।
वदुकु बलुहिन नुडियु सदाभिमानद गूडु ॥ ध्रु ॥

राजन्यरिपु परशुधरनु जनिसिद नाडु ।
आजलधियने जिगिद हनुमनुदिसिद नाडु ॥

ओजेयिं मेरेदरसुगल साहसद बीडु ।
तेजवनु नमगीव वीरवृन्दद बीडु ॥ १ ॥

लेक्किगमिताक्षररु मेरेदुमेरेदिह नाडु ।
जक्कन शिल्पकले यच्चरिय नलुनाडु ॥

चोक्कमत गळ सारिदवरिगि डु नेलेवीडु ।
बोक्कसद् कणजवै विद्वत्तेगळ काडु ॥ २ ॥

पावनेयराकृष्णे भीमेयर ताय्याडु ।
कावेरिगोदेयस मैदालेव नलुनाडु ॥

आवगं स्फूर्तिसुव कविवगर नडेनाडु ।
काव गदुगिन वीर नारायण बीडु ॥ ३ ॥

अर्थ : आमच्या सुंदर कन्नडनाडूचा ( कर्नाटकचा ) उदय होवो ! कन्नड भाषा ही आमच्या जीवनाची व उन्नतीची भाषा आहे. त्याचप्रमाणे हा प्रदेशही आमच्या महत् अभिमानाचा विषय आहे !

ह्या भूमीत, राजराजेश्वरांचा रिपू परशुराम जन्मला, ह्याच भूमीत ज्याने सागर उल्लंघन केले त्या हनुमानाचाही उदय झाला ! अनेक महान राजे येथे होऊन गेले आणि त्यांनी पराक्रम गाजवला. आमची भूमी ही आम्हाला प्रेरणा देणाऱ्या त्या वीरांची भूमी आहे.

कित्येक विद्वान येथे एकत्रित आले आणि नांदले. जक्कणाची मंत्रमुग्ध करणारी शिल्पकला याच सुंदर भूमीत आहे आणि भिन्न, भिन्न विचारप्रवर्तकांनी या भूमीतच वास करून तिला पुनीत केलेले आहे.

येथे संपत्तीची उणीव नाही की विद्वत्तेची वानवा नाही. कावेरी, गोदावरी ह्यांनी न्हाऊ घातलेली ही भीमेची व कृष्णेची पावनभूमी आहे. सदैव स्फूर्ती देत राहणाऱ्या श्रेष्ठांची ही भूमी आहे. गदगदचे वीर नारायण प्रतिपाळ करीत असलेली ही भूमी आहे.

□ □

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 20119 दि.
क्र. ५५५५
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 20119
REFBK-0020111
REFBK-0020111


भारत
अफगानिस्तान
जम्मू और कश्मीर
पाकिस्तान
पंजाब
राजस्थान
जयपुर
गुजरात
अहमदाबाद
तिब्बत
नेपाल
सिक्किम
भूटान
आसाम
मणिपुर
त्रिपुरा
ब्रह्मदेश
उत्तर प्रदेश
बिहार
मध्य प्रदेश
ओरिसा
भुवनेश्वर
महाराष्ट्र
बंबई
आंध्र प्रदेश
गोआ
मैसूर
बंगलौर
मद्रास
तमिलनाडु
श्रीलंका